सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शिक्षक मार्गदर्शिका
# पूरक साहित्य : २०२०
## इयत्ता : चौथी

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम
संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.

# शिक्षक मार्गदर्शिका – पूरक साहित्य : २०२० (इयत्ता : चौथी)


- **प्रवर्तक :**
  शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन :**
  **वन्दना कृष्णा,** (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
  **विशाल सोळंकी,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक :**
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक :**
  **दिनकर पाटील**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक :**
  **विकास गरड,** प्र. प्राचार्य (समन्वय)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **मनिषा यादव,** वरिष्ठ अधिव्याख्याता,
  आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **मुख्य समन्वयक (अभ्यासगट) :**
  **डॉ. चंद्रशेखर मुरुमकर,**
  अध्यक्ष, विषय समिती, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.
- **संपादन साहाय्य :**
  **विवेक गोसावी**
  संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.
  **राजीव पाटोळे,** समन्वयक,
  विद्या विभाग, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.
  **वर्षाराणी भोपळे,**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, समग्र शिक्षा विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर २०२०
- **प्रती :** –
- **मुद्रक :** रुना ग्राफिक्स, पुणे.
- **आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

# प्रास्ताविक



शिक्षक मित्रांनो,

राज्यातील महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळात विलीन करण्यात आल्याने राज्यातील ८१ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना आता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून समग्र शिक्षा अभियान अंतर्गत एकात्मिक व द्विभाषिक पाठ्यपुस्तके पथदर्शी प्रकल्पांन्वये पुरविण्यात आलेली आहेत. या ८१ शाळांमधील इयत्ता पहिली ते पाचवीसाठीच्या शिक्षकांसाठी सदर पाठ्यपुस्तके साधन म्हणून वापरताना राज्यस्तरावरून प्रचलित अभ्यासक्रमावर आधारित आपणांस उपयुक्त अशी शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२० आपल्या हाती देत असताना आम्हांला आनंद होत आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या ६६०३३ शाळा आहेत. या शाळांसाठीचा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने आंतरराष्ट्रीय दर्जाचा करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे यांच्या समन्वयाने प्रचलित अभ्यासक्रमविषयक पूरक साहित्य तयार करण्यात आलेले आहे.

एकविसाव्या शतकातील कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात होणे तसेच दैनंदिन जीवनात येणाऱ्या विविध आव्हानांना आत्मविश्वासाने, समर्थपणे सामोरे जाणे हे अभ्यासक्रमाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांसाठीची अध्ययन-अध्यापन प्रक्रिया तणावरहित, आनंददायी व प्रभावी होण्यासाठी आणि शिकणे अधिक समृद्ध करण्यासाठी, समाविष्ट करावयाच्या वैविध्यपूर्ण अध्यापनशास्त्रीय ज्ञानाच्या संदर्भात चांगले आकलन होण्यासाठी विविध अध्ययन अनुभव तसेच विविध उपक्रम व कृती सदर पूरक साहित्यामध्ये सुचविण्यात आलेल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना स्वयं-अध्ययनाला प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने आपणांस अधिकाधिक मार्गदर्शन होण्यासाठी सदर पूरक साहित्य समृद्ध करण्यात आले आहे. आपल्या विषयातील ज्ञान आणि कौशल्ये यांमध्ये वाढ करण्यासाठी सदर साहित्याचा निश्चितच उपयोग होईल याची आम्हांला खात्री आहे.

सदर पूरक साहित्याचा दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये प्रभावी वापर करण्यासाठी संबंधित पूरक साहित्याच्या अनुषंगाने इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गास अध्यापन करणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. अभ्यासक्रमातील उद्दिष्टे साध्य करण्याच्या अनुषंगाने अध्ययन- अध्यापन प्रक्रिया सहजसुलभ व आनंददायी होण्यासाठी सदर पूरक साहित्याचा व प्रशिक्षणाचा निश्चितच उपयोग होईल.

**दिनकर पाटील**
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र.

# पूरक साहित्याचा वापर - मार्गदर्शक सूचना

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये सर्वांचे स्वागत. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्यास गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. तसेच येणाऱ्या काळात समाजात आणि जागतिक अर्थव्यवस्थेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक मुलाला तयार करणे, हा सार्वत्रिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्देश आहे. हे साध्य करीत असताना शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

दैनंदिन अध्ययन–अध्यापनात येणाऱ्या समस्या सोडवून गुणवत्ता वाढविण्यासाठी नवनवीन प्रयोग करणे आवश्यक असते. तसेच विद्यार्थ्यांना स्वयं–अध्ययनाला प्रवृत्त करण्यासाठी व त्यांच्यातील सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी शिक्षकांनी नेहमीच नाविन्याचा शोध घेणे व आवर्जून अध्ययनपूरक साहित्याचा वापर करणे आवश्यक आहे. आपण करीत असलेल्या ज्ञानदानाच्या या प्रयत्नांना अधिक बळ प्राप्त व्हावे म्हणून ही शिक्षक मार्गदर्शिका – पूरक साहित्य : २०२० निर्मिती करण्यात आली आहे. आपणा सर्वांना ज्ञात आहेच की माहितीचे रूपांतर कृतीत होते तेव्हाच ज्ञाननिर्मिती होत असते. तद्नुषंगिक माहितीचे रूपांतर कृतीत कसे करावे याचे मार्गदर्शन करणारी ही मार्गदर्शिका तुम्हांला उपयुक्त ठरेल याची आम्हांस खात्री आहे.

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ नुसार ही शिक्षक मार्गदर्शिका – पूरक साहित्य : २०२० इयत्तानिहाय तयार करण्यात आलेली आहे.

**या मार्गदर्शिकेची उद्दिष्टे :**

१) सुलभक आणि शिक्षक यांना प्रचलित अभ्यासक्रमाच्या अध्ययन निष्पत्तीप्रमाणे पूरक अनुभव देण्यासाठी व विद्यार्थ्यांची अधिक प्रगती करण्यासाठी नवीन अध्यापनशास्त्रीय ज्ञानाच्या संदर्भात योग्य आकलन आणि आवश्यक कौशल्ये निर्माण करणे.

२) मुख्य विषयातील प्रत्येक इयत्तेसाठी निश्चित करण्यात आलेल्या अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शिक्षकांच्या क्षमता विकसित करणे.

३) मुख्य विषय म्हणून इयत्ता पहिली ते पाचवीसाठी अध्यापन करणाऱ्या अध्यापकांना त्या संबंधित विषयाचे स्वरूप व व्याप्ती समजून घेण्यास मदत करणे.

४) पाठ्यपुस्तक हे साध्य नसून साधन आहे, यास्तव पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या घटकाप्रमाणे परिसरीय कृतीपूर्ण व सर्वांगीण सहभाग विकासाचे अध्ययन अनुभव देणे.

५) पाठ्यपुस्तकातील उपक्रमांव्यतिरिक्त अध्यापनतंत्रासह अध्ययन अनुभवाला पूरक असे उपक्रम विद्यार्थ्यांना देणे आणि ते त्यांच्याकडून करून घेणे.

६) आशयाच्या विश्लेषणानंतर शिक्षकाला विद्यार्थ्यांकडून जे वर्तनबदल अपेक्षित असतात, त्या अध्ययन निष्पत्तीची ओळख करून देऊन समर्पक मूल्यमापन तंत्राची माहिती करून देणे.

७) वरील सर्व घटकांचे परिपूर्ण ज्ञान प्राप्त होण्यासाठी अपेक्षित व घटकांना अनुसरून संदर्भ साहित्य व संदर्भ स्रोत यांची माहिती देणे. या उद्देशास अनुसरून मार्गदर्शिकेची निर्मिती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ व राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० तसेच प्राथमिक शिक्षण

अभ्यासक्रम २०१२ समोर ठेवून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे निर्मित पाठ्यपुस्तकांचे अध्यापन करताना आपणांस मार्गदर्शक ठरेल अशी पुस्तिका तयार करण्यात आली आहे. सदर पुस्तिका इयत्तानिहाय सर्व विषय समाविष्ट असलेली तयार करण्यात आली आहे, यास्तव आपणांस सर्व विषयांचा समवाय साधता येईल. प्रत्येक विषयाचे पाठ्यपुस्तक एकमेकांस कसे पूरक आहे याची ओळख आपणास होईल.

मार्गदर्शिकेमधील प्रत्येक घटकाची रचना विशिष्ट क्रमाने करण्यात आली आहे. प्रत्येक विषयाच्या सुरुवातीला प्राथमिक शिक्षण धोरण २०१२ ची उद्दिष्टे दिली आहेत, विषयाच्या व्याप्तीचे आकलन होण्यास त्याची मदत होईल. त्यानंतर **घटक, उपघटक, तासिका, उपघटकाच्या अंतर्गत स्पष्ट करावयाच्या संकल्पना व संबोध, संबंधित घटकांची उद्दिष्टे, परिसरीय कृतीपूर्ण व सर्वांगीण सहभागाचे अध्ययन–अनुभव, अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम, मूल्यमापन, विषय समवाय, संदर्भ व स्रोत, अध्ययन निष्पत्ती** या क्रमाने आपले अध्यापन आणि विद्यार्थ्यांचे अध्ययन ज्या क्रमाने पुढे जात असते त्या क्रमाने सदर पुस्तिकेत प्रस्तुत घटक समाविष्ट केलेले आहेत.

उपरोक्त क्रमाने केलेली रचना देखील विशिष्ट हेतूने केलेली आहे. उपघटकामध्ये पाठाचे शीर्षक असेल परंतु त्याचबरोबर प्रस्तुत पाठातून स्पष्ट करावयाचा संबोध निदर्शनास येईल. आपण मनात निश्चित केल्याप्रमाणे संबोध आहे की नाही हे पुढच्या टप्प्यात पहावयास मिळेल, काय संबोध स्पष्ट करावयाचे हे ज्ञात होत असतानाच संबंधित घटकाविषयीची उद्दिष्टे पुढे आलेली असतील, जी उद्दिष्टे रुजवायची आहेत त्यासाठी पूरक असे अध्ययन–अनुभव द्यावे लागतील, ते फक्त पूरक असतील असे नाही तर ते विद्यार्थ्याच्या परिसरातून उपलब्ध होतील आणि विशेष करून ते कृतिपूर्ण आणि सहाध्यायी यांना सामावून घेणारे असतील यासाठी तो अध्ययन–अनुभव देताना ज्ञानरचनावादाचे कोणते तंत्र वापरावे हेही नमूद करण्यात आले आहे. अर्थात आपणांस ते वापरण्याचे निश्चितच स्वातंत्र्य असेल. पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटक हे आपणांस संबोध स्पष्ट करण्यासाठी पूरक असले तरी ते अधिक स्पष्ट होण्यासाठी पूरक उपक्रम कोणते घ्यावे याची माहिती प्रस्तुत पुस्तिकेत दिली आहे.

**उद्दिष्टे → पूर्वज्ञान → अध्ययन–अध्यापन प्रक्रिया → अपेक्षित वर्तन मूल्यमापन = अध्ययन निष्पत्ती.**
याप्रमाणे प्रत्येक विषयाची रचना केलेली आहे.

एका विषयाचे अध्यापन करताना आपणांस ज्ञात आहे की, इतर विषयही संबंधित विषयाच्या अनुषंगाने येत असतात. भाषा विषयाचे अध्यापन करताना फक्त तो विषयच अध्यापन केला जातो असे नाही, तर इतर विषयांशीही समवाय कसा साधला जातो याचेही मार्गदर्शन प्रस्तुत मार्गदर्शिकेत होणार आहे. विद्यार्थी ज्ञानी करायचा असेल तर फक्त पाठ्यपुस्तकातील माहितीवर अवलंबून राहता येणार नाही, त्यास पूरक असे संदर्भ आपणांस द्यावे लागतील, विद्यार्थ्यांची वाटचालही त्या दिशेने होईल, यासाठी प्रत्येक विषयात संबंधित घटकाला अपेक्षित कोणते संदर्भ आहेत याची माहिती मार्गदर्शिकेतून प्राप्त होईल.

ज्ञानग्रही, नवनिर्माणशील, विकसित, चिकित्सक तसेच दुर्दम्य आत्मविश्वास असणारा विद्यार्थी तयार करण्यासाठी ही मार्गदर्शिका आपणांस नक्कीच उपयुक्त ठरेल.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पाठ्यक्रमाचे घटक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | मराठी | • संवाद शिक्षक मित्रांशी | १ |
| | | • विषयाची उद्दिष्टे | ३ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती | ४ |
| २. | इंग्रजी | • Talk with Teachers | ३१ |
| | | • General Objectives | ३३ |
| | | • Topic | ३५ |
| | | • References/Resources | ४१ |
| ३. | गणित | • संवाद शिक्षक मित्रांशी | ४३ |
| | | • उद्दिष्टे | ४६ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती | ४७ |
| ४. | परिसर अभ्यास : भाग १ | • संवाद शिक्षक मित्रांशी | ६५ |
| | | • उद्दिष्टे | ६७ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती | ६८ |
| | परिसर अभ्यास : भाग २ | • संवाद शिक्षक मित्रांशी | ९० |
| | | • उद्दिष्टे | ९२ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती | ९३ |
| ५. | आरोग्य व शा. शिक्षण | • संवाद शिक्षक मित्रांशी | १०२ |
| | | • अभ्यासक्रमाची ध्येय, उद्दिष्टे व क्षेत्रे | १०६ |
| | | • आरोग्य व शारीरिक शिक्षणाचा इतर विषयांशी समवाय | १०८ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती | ११० |
| | | • पूरक उपक्रम | १२१ |
| | | • विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी | १२२ |
| | | • नियोजन/मूल्यमापन/संदर्भ सूची | १२४ |
| ६. | कार्यानुभव | • संवाद शिक्षक मित्रांशी | १२८ |
| | | • कार्यानुभव विषयाची ठळक उद्दिष्टे, उपक्रमांचे स्वरूप व आराखडा | १३० |
| | | • पाठ्यक्रमातील अनिवार्य उपक्रम | १३२ |
| | | • मूल्यमापन निर्देश/संदर्भ सूची | १४६ |
| ७. | कला शिक्षण | • संवाद शिक्षक मित्रांशी | १४९ |
| | | • कला शिक्षण अभ्यासक्रमाची ध्येय व उद्दिष्टे | १५० |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक, अध्ययन निष्पत्ती, अध्ययन अनुभव, मुक्त अभिव्यक्ती व इतर विषयांशी समवाय | १५२ |
| | | • मूल्यमापन निर्देश/संदर्भ सूची | १६७ |
| | | • पूरक साहित्य विकसन निर्मिती गट : यादी | १६९ |

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय – मराठी

### संवाद शिक्षक मित्रांशी

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ ने आपणा सर्वांनाच प्रत्यक्ष शाळेत न जाता औपचारिक व अनौपचारिकरित्या बरेच काही शिकविले आहे परंतु संकटाला खंबीरपणे सामोरे जाणे, त्याचा सामना करणे हा मनुष्याचा स्थायीभाव आहे. संपूर्ण जग कोविड–१९ या अस्मानी संकटाशी झुंज देत आहे. संकट येते तेव्हा एकटे येत नाही, तर अनेक संकटे बरोबर घेऊन येत असते परंतु हार मानणे हे मनुष्य स्वभावातच नाही. संकटाला संधी समजून महाराष्ट्र शासनाने शाळा बंद परंतु शिक्षण चालू या माध्यमातून आपण विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू दिले नाही. अतिशय योग्य पद्धतीने ज्ञानदानाचे हे कार्य तुम्ही चालू ठेवलेले आहे. तुमच्या या प्रयत्नांना अधिक बळ प्राप्त व्हावे म्हणून ही इयत्ता चौथीची मराठी विषयाची मार्गदर्शिका तुमच्या हातात देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे. माहितीचे रूपांतर कृतीत कसे करावे याचे मार्गदर्शन करणारी ही मार्गदर्शिका तुम्हांला उपयुक्त ठरेल याची आम्हांला खात्री वाटते.

**मार्गदर्शिकेची उद्‌दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तराप्रमाणे भाषा विषयाची मूलभूत कौशल्ये विकसित करण्यासाठी आवश्यक कृतींची माहिती देणे.

२) इयत्ता चौथी (प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२) च्या भाषा विषयाच्या उद्‌दिष्टानुसार निश्चित करण्यात आलेल्या अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शिक्षकांच्या क्षमता विकसित करणे.

३) पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या साहित्य प्रकाराची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे. तसेच त्या साहित्य प्रकारात आलेले संवेदनशील मुद्दे, समस्या यांची वैयक्तिक जीवनाशी सांगड घालून त्या सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

४) वर्गातील विद्यार्थ्यांच्या बोलीचे निरीक्षण कसे करावे व त्यांना बोलीकडून प्रमाणभाषेकडे नेण्यासाठी कोणते प्रयत्न करावे याविषयी मार्गदर्शन करणे.

५) ज्ञानरचनावादी तंत्राचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांचे विकसन, मूल्यांची रुजवणूक अध्यापनातून करण्यासाठी विशेष कृतींची निर्मिती करणे.

६) इतर विषय, परिसरात असणारे छोटे, मोठे व्यवसाय यांबद्‌दल जाणून घेण्यास, त्या संबंधित शब्दसंग्रह करून संदर्भानुसार त्याचा वापर करणे, या प्रकारच्या अनेक उद्‌दिष्टपूर्तीसाठी मार्गदर्शिकेची निर्मिती केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती), पुणे निर्मित इयत्ता चौथीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकाचे अध्यापन करण्यास मदत करेल अशी ही अध्यापन पुस्तिका विषयाच्या व्याप्तीचे आकलन करून देण्यासही तुम्हांला मदत करेल. पाठ्यपुस्तकाशी संबंधित असलेले **घटक, उपघटक, उपघटकाच्या अंतर्गत स्पष्ट करावयाच्या संकल्पना व संबोध, संबंधित घटकाची उद्दिष्टे, परिसरीय कृतीपूर्ण व सर्वांगीण सहभागाचे अध्ययन अनुभव, अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम, मूल्यमापन, विषय समवाय, संदर्भ व स्रोत, अध्ययन निष्पत्ती** या क्रमाने आपले अध्यापन आणि विद्यार्थ्यांचे अध्ययन ज्या क्रमाने पुढे जात असते त्या क्रमाने प्रस्तुत घटक समाविष्ट केलेले आहेत.

मराठी विषयाचे अध्यापन करताना आपणांस ज्ञात आहे की, इतर विषयही संबंधित विषयाच्या अनुषंगाने येत असतात. भाषा विषयाचे अध्यापन करताना फक्त तो विषयच अध्यापन केला जातो असे नाही, तर इतर विषयही त्याच्याशी जोडले गेलेले असतात, ते कसे? याचेही मार्गदर्शन प्रस्तुत मार्गदर्शिकेत होणार आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर फक्त पाठ्यपुस्तकातील माहितीवर अवलंबून राहता येणार नाही. त्यास पूरक असे संदर्भ आपणांस द्यावे लागतील, विद्यार्थ्यांची वाटचालही त्या दिशेने होईल, यासाठी प्रत्येक विषयात संबंधित घटकाला अपेक्षित कोणते संदर्भ आहेत याची माहिती मार्गदर्शिकेतून प्राप्त होईल.

विद्यार्थी ज्ञानग्रही, नवनिर्माणशील, विकसित, चिकित्सक, तसेच दुर्दम्य आत्मविश्वास असणारा तयार करण्यासाठी ही मार्गदर्शिका तुम्हांला नक्कीच उपयुक्त ठरेल.

■■■

## विषयाची उद्दिष्टे : प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ प्रमाणे

१) घरी वा परिसरात चालणाऱ्या अनौपचारिक वा औपचारिक संभाषणात भाग घेऊन ऐकलेली, पाहिलेली, अनुभवलेली माहिती सांगणे.

२) दैनंदिन व्यवहारासाठी आवश्यकतेनुसार प्रमाणभाषेचा उपयोग करणे.

३) सूचनांवर आधारित खेळ खेळणे.

४) कविता, गाणी, समूहगीते तालासुरात व लयीत म्हणणे.

५) शाळेतील वा परिसरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेताना स्वतःवर सोपविलेली जबाबदारी समजून घेणे. मित्रांना त्यांची जबाबदारी समजावून देणे.

६) सार्वजनिक ठिकाणी दिलेल्या, श्रवण केलेल्या तसेच लिखित सूचना आणि संदेश समजणे.

७) पाठ्य व पुरवणी वाचन साहित्यांतील, कथांमधील आशय आणि कवीने केलेल्या कल्पना सांगणे.

८) गाणी व कवितांमधील आशय तसेच कवीने केलेल्या कल्पना सांगणे.

९) अचूक, स्पष्ट शब्दोच्चार, अर्थानुसार आरोह–अवरोह तसेच विरामचिन्हे लक्षात घेऊन प्रकटवाचन करणे.

१०) एका मिनिटात सुमारे ७० शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करणे.

११) एकापेक्षा अधिक अर्थ असणारे शब्द, म्हणी आणि वाक्प्रचार यांचा वाक्यांत उपयोग करणे.

१२) अर्थ समजून वाक्यांमध्ये योग्य उपसर्ग व प्रत्यय लावणे.

१३) योग्य आकाराची अक्षरे, शब्द यांच्यात उचित अंतर ठेवून व विरामचिन्हांचा योग्य उपयोग करून लेखन करणे.

१४) सातत्याने नवीन शब्द गोळा करणे आणि 'आमचा शब्दसंग्रह' विकसित करण्यासाठी त्यांची अर्थासह नोंद करणे.

१५) वाचन शब्दसंपत्तीत सुमारे ३००० शब्दांपर्यंत वाढ करणे.

१६) आवडलेली कथा, कविता, विनोद साभिनय सादर करणे.

१७) अपरिचित मजकुराचे अनुलेखन आणि श्रुतलेखन करणे.

१८) परिचित विषयावर मुद्देसूद व सुसंगत भाषण करणे.

१९) परिचित विषयावर सुसंगतपणे सुमारे आठ ते दहा वाक्यांचा निबंध लिहिणे.

■■■

## पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती

**घटक :** पद्य (देशभक्तीपर गीत) **उपघटक :** १) धरतीची लेकरे. **अंदाजे तासिका :** ३

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • स्थल वर्णन, निसर्ग वर्णन

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. कविता व्यक्तिगत चालीवर म्हणता येणे.<br>२. कवितेचे सामूहिक सादरीकरण करणे.<br>३. भाषिक वैशिष्ट्यांचा शोध घेणे.<br>४. रूपकांची ओळख करून घेणे.<br>५. कवितेत येणाऱ्या बोली भाषेतील शब्दांचा शोध घेणे.<br>६. कवितेच्या आशयासंदर्भाने स्वतःच्या अनुभवाची मांडणी करणे, कठीण शब्दांचे अर्थ सांगणे.<br>७. शेतकऱ्याची कष्टाविषयी माहिती सांगणे.<br>८. शेतकरी शेतात कोणकोणती कामे करतो ते सांगणे. | १. परिसरातील शेतात कोणकोणती पिके घेतात? चांगले पिक घेण्यासाठी शेतकरी काय काय करतो?<br>२. भाषिक वैशिष्ट्यांचा शोध घेण्याचा सराव घ्यावा.<br>३. रूपकांची ओळख द्यावी.<br>४. कवितेतील बोलीभाषेतील शब्दांचा शोध घ्यावा.<br>५. कवितेच्या आशयाच्या संदर्भाने स्वतःच्या अनुभवांची मांडणी करण्यास सांगावी. | १. प्रगतशील शेतकऱ्याची मुलाखत आयोजित करणे.<br>२. शेतीच्या आशयावरील कवितांचे संकलन करणे.<br>३. शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याचे चित्र काढून माहिती लिहिणे.<br>४. कवितेत आलेल्या शब्दांना आपल्या परिसरातील शब्द शोधणे.<br>५. पाठातील कठीण शब्दांचे अर्थ शब्दकोशातून शोधणे.<br>६. कवितेच्या संदर्भाने स्वानुभवाची मांडणी करणे.<br>७. शब्दभेंड्या सराव. | मुलाखत तंत्र, प्रकल्प, कृती, संकल्पना चित्र, सहयोगी अध्ययन, शब्दजाल | परिसर अभ्यास, कला | दीक्षा ॲपवरील व्हिडिओ | १, ३, ५, १३, १६, १८ |

**घटक :** गद्य (आत्मकथन) **उपघटक :** २) बोलणारी नदी **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- चर्चा, प्रश्न, माहिती, भाषिक खेळ, स्थलवर्णन, म्हणी, वाक्प्रचार, अनौपचारिक संभाषण.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पाठाचे प्रकटवाचन करणे<br>२. गोष्टीतील आशय, विनोद समजणे.<br>३. गोष्टीतील पात्र आणि त्यांची वैशिष्ट्ये जाणणे.<br>४. पाठातील घटनाक्रम जाणून घेणे.<br>५. गोष्टीचे नाट्यीकरण सादर करणे. | १. पाठाचे प्रकटवाचन करून घ्यावे.<br>२. यमक-स्वरूपांची उदाहरणे सांगावीत.<br>३. तुमच्या परिसरातील नदीशी तुम्ही काय बोलाल विद्यार्थ्यांना त्यांचे या स्वरूपाचे अनुभव सादर करण्यास सांगावे.<br>५. कवितेच्या ओळी पूर्ण करण्यास सांगाव्यात.<br>६. मध्येच शाळा सोडलेल्या मित्र-मैत्रिणींच्या पालकांची भेट घेऊन अडचणी समजून घेण्याची संधी द्यावी.<br>७. गावातील सरपंचांची मुलाखत घेण्यास सांगावी.<br>८. परिसरातील बोलीभाषेतील शब्द आणि पाठ्यपुस्तका-तील शब्द यांचा संग्रह करण्यास सांगावा. | १. तुम्ही नदीशी बोलत आहात, असा प्रसंग सादर करणे.<br>२. नदी तुम्हांला काय सांगत असेल? अशी कल्पना करणे.<br>३. नदी नसती तर काय झाले असते? या विषयावर गटचर्चा करणे.<br>४. स्वतःच्या तालुक्यातील नद्यांची व धरणांची माहिती मिळवणे.<br>५. नदीचे उपयोग या विषयावर माहिती सांगणे/ चर्चा करणे. | मुलाखत तंत्र, पृच्छा तंत्र, शब्दजाल, व्यष्टी अभ्यास | परिसर अभ्यास, कला | दीक्षा ॲपवरील व्हिडिओ | १, २, ३, ९, १३, १५, १७ |

**उपघटक :** ३) आम्हांलाही हवाय मोबाईल (नाट्यछटा) — **अंदाजे तासिका :** ३

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- चर्चा, प्रश्न, माहिती, भाषिक खेळ, स्थलवर्णन, म्हणी, वाक्प्रचार, अनौपचारिक संभाषण.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पाठाचे प्रकटवाचन करणे.<br>२. गोष्टीतील आशय, विनोद समजणे.<br>३. गोष्टीतील पात्र आणि त्यांची वैशिष्ट्ये जाणणे.<br>४. पाठातील घटनाक्रम जाणून घेणे.<br>५. गोष्टीचे नाट्यीकरण सादर करणे. | १. पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे.<br>२. पाठाचे नाट्यीकरण, सादरीकरण करून घ्यावे.<br>३. मोबाईलचे फायदे यावर चर्चा घ्यावी.<br>४. मोबाईल वापरण्याचा शिष्टाचार लक्षात आणून द्यावा.<br>५. पाठातील कठीण शब्दाचे अर्थ सांगावेत. | १. मोबाईल कशासाठी वापरतात याबाबत घरातील व्यक्तींशी संवाद साधणे.<br>२. मोबाईलवर कोण कसे बोलते याची नक्कल सादर करणे.<br>३. मोबाईलसंदर्भाने अधिकची माहिती मिळविणे.<br>४. मोबाईलच्या विविध भाषांविषयी गटात चर्चा करणे.<br>५. मोबाईलच्या कंपन्यांची यादी तयार करणे.<br>६. मोबाईलचे फायदे व तोटे याविषयावर लेखन करणे.<br>७. प्रस्तुत नाट्यछटेचे वर्गात किंवा स्नेहसंमेलनात गटात किंवा एकट्याने सादरीकरण करणे. | मुक्त प्रश्न, प्रायोगिकता, संकलन, गटचर्चा, विश्लेषण | परिसर अभ्यास, कला | दीक्षा ॲपवरील व्हिडिओ, क्यू आर कोड | १, २, ५, ९, १३, १५, १६ |

**घटक :** पद्य | **उपघटक :** ४) या भारतात माझ्या... | **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- चर्चा, प्रश्न, माहिती, भाषिक खेळ, स्थल वर्णन, निसर्ग वर्णन

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. कवितेचे सामूहिक गायन करणे.<br>२. कवितेचे वैयक्तिक गायन करणे.<br>३. कवितेचा आशय बोलीत सांगता येणे.<br>४. कवितेतील आशया–संबंधीने स्वतःचे अनुभव जोडून सांगणे. | १. कवितेचे सामूहिक गायन घ्यावे.<br>२. कवितेचे वैयक्तिक गायन घ्यावे.<br>३. कवितेचा आशय बोलीत सांगण्याचा सराव द्यावा.<br>४. कवितेचा आशय व आपला परिसर यांची तुलना करण्यास सांगावी.<br>५. कवितेचा भावार्थ सांगावा.<br>६. कवितेतील कठीण शब्दांना स्वभाषेतील शब्द शोधण्यास सांगावे.<br>७. अपूर्ण कविता पूर्ण करण्यास सांगावी. | १. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचे ग्रामगीतेतील बोध घरच्यांकडून समजून घेणे.<br>२. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या जीवन चरित्रावरील सिनेमा पाहणे व त्यावर वर्गात चर्चा करणे.<br>३. विद्यार्थी जीवनाला उपयोगी होतील अशा ग्रामगीतेतील ओव्या संकलित करणे.<br>४. ग्रामगीतेतील वचने ऐकणे.<br>५. ग्रामगीतेतील वचनाचा आधार घेऊन संवाद करणे.<br>६. ग्रामगीतेतील ओवीवर वर्गात–कीर्तन, प्रवचन स्वरूपात सादरीकरण करणे. | सहयोगी अध्ययन, गटचर्चा, संकलन, मुक्त प्रश्न, प्रायोगिकता | परिसर अभ्यास, कला | दीक्षा ॲप, ध्वनीचित्रफीत | ९, १०, ११, १७, १६ |

**घटक :** गद्य **उपघटक :** ५) मला शिकायचंय **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- चर्चा, प्रश्न, माहिती, भाषिक खेळ, स्थलवर्णन, वाक्प्रचार.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पाठाचे प्रकटवाचन करणे.<br>२. बोलीतील शब्दांचा अर्थ जाणणे.<br>३. पात्रांची वैशिष्ट्ये जाणणे.<br>४. पाठातील घटनाक्रम जाणून घेणे.<br>५. बोलीतील संवादाचे साभिनय सादरीकरण करणे. | १. पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे.<br>२. पाठाचे नाट्यीकरण करून वर्गात सादरीकरण घ्यावे.<br>३. पाठातील कठीण शब्दाचे अर्थ शब्दकोशातून माहिती करून घेण्यास सांगावे.<br>४. शिक्षणामुळे जीवनात काय फायदे होतात ते सांगावेत.<br>५. बोलीतील शब्दांचा संग्रह करण्यास सांगावा. | १. तुमच्या वर्गातील मुलांच्या शिक्षणातील अडचणी समजून घेणे.<br>२. मधेच शाळा सोडलेल्या मित्र-मैत्रिणींच्या पालकांची भेट घेऊन अडचणी समजून घेणे.<br>३. गावातील सरपंचांची शाळा बाह्य मुलांच्या संदर्भात मुलाखत घेणे.<br>४. परिसरातील बोलीतील शब्द व पाठ्यपुस्तकातील शब्द यांचा संग्रह करणे.<br>५. तुमच्या शाळेतून शिक्षण घेऊन मोठे झालेल्या मुलांच्या मुलाखती घेणे.<br>६. बालरक्षक चळवळीबद्दल गटाने माहिती घेणे. | पृच्छा तंत्र, प्रकल्प, व्यष्टी अभ्यास, सहध्यायी अभ्यास | परिसर अभ्यास, कला | दीक्षा ॲप, ध्वनीचित्रफीत | ९, १०, ११, १७, १६ |

**घटक :** गद्य (चरित्रात्मक पाठ) **अंदाजे तासिका :**

**उपघटक :** ६) मायेची पाखर

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- लेखन, वसतिगृहातील मुलांचे भावविश्व चरित्र म्हणजे सातत्याने सत्याचे भान राखून एखाद्या कर्तृत्ववान व्यक्तीच्या जीवनाचा कालानुसारी, घटनानुसारी वा विषयानुरूप साधार विश्लेषणात्मक वा परिचयात्मक इतिहास व त्या आधारे संबंधित व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा आलेख म्हणजे चरित्र होय.

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. साहित्य कृतीचा आस्वाद घेणे<br>२. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्राची ओळख करून घेणे.<br>३. आपल्या आजूबाजूच्या परिसरातील घटना किंवा प्रसंग यावर तोंडी/ लेखी वर्णन करता येणे.<br>४. आरोहावरोहांसह प्रकट/ मौन वाचन करता येणे.<br>५. पाठातील भाषिक सौंदर्य स्थळांचा आस्वाद घेता येणे.<br>६. अपरिचित शब्दांचा शोध/अर्थ शब्दकोशातून मिळविणे. | १. प्रश्न विचारून चरित्रनायक यांच्या आयुष्यातील घटनांकडे, त्यांच्या बोलण्याकडे लक्ष वेधावे.<br>२. गटचर्चा-परिसरातील सामाजिक कार्य करणाऱ्या कोणत्याही दोन व्यक्तींची तुलनात्मक चर्चा घडवून आणावी.<br>३. पाठातील प्रसंगांचा क्रम लावून घ्यावा.<br>४. सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींची तुम्हांला अपेक्षित असलेली वैशिष्ट्ये यांवर चर्चा घडवून आणावी. | १. विद्यार्थ्यांच्या परिसरातील त्यांना आवडणाऱ्या व्यक्तींचे गुण सांगता येणे.<br>२. परिसरातील सामजिक कार्य करणाऱ्या व्यक्ती कोणते सामाजिक काम करतात या विषयी माहिती घेणे.<br>३. परिसरातील सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींची गटाने मुलाखत घ्या.<br>४. सातारा जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेला भेट देणे.<br>५. पाठ्यपुस्तकात दिलेले उपक्रम करणे. | गटचर्चा, प्रकल्प, गटकार्य, क्षेत्रभेट, उपक्रमांनुसार तंत्र | परिसर अभ्यास भाग १, भाग २<br>**भूगोल :** सातारा जिल्ह्याची प्रादेशिक माहिती,<br>**इतिहास :** सातारा या जिल्ह्याचा इतिहास | दीक्षा ॲप | १, २, ३, ९, १३, १५, १७ |

**घटक :** पद्य (शेतकरी गीत) **उपघटक :** ७) धूळ पेरणी **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- काव्य, काव्य या साहित्य प्रकाराची ओळख – काव्य म्हणजे उत्कट परंतु कमीत कमी रमणीय शब्दात जास्तीत जास्त सूचित व सर्वार्थ प्रकट करणारी अद्‌वितीय असे कवीने मानवी जीवनावर केलेले भाष्य. अध्यापकांनी काव्याच्या वरील वैशिष्ट्याप्रमाणे कविता उलगडून दाखवावी. पाठाच्या शीर्षकाची समर्पकता, कासावीस डोळे, कोरडे नक्षत्र. आभूट, पापणीला पूर हे संबोध प्रत्यक्ष अनुभव किंवा उदाहरणे स्पष्ट करावेत.

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. कविता, गाणी, तालासुरात म्हणणे.<br>२. साहित्यिक अभिव्यक्तींचा आस्वाद. ग्रामीण काव्य, बोली भाषेतील काव्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेणे उत्तम अभिरुची व सौंदर्यदृष्टी विकसित करणे.<br>३. परिचित कविता, नाट्य प्रवेश, कथा यांचे अर्थ समजून प्रकट वाचन करणे.<br>४. ऐकलेल्या, वाचलेल्या कथा–कवितांचा आनंद घेणे त्यातील कल्पना स्वत:चे शब्दात स्पष्ट करणे.<br>५. शब्दकोश व ज्ञानकोशाचा योग्य तेथे उपयोग करणे. | १. कवींनी वर्णन केलेली वस्तुस्थिती व त्यांच्या कल्पना याकडे तसेच निसर्गाचा लहरीपणा लक्षात आणून द्यावा, त्यावर आधारित प्रश्न विचारावेत.<br>२. पावसाळा सुरू होण्याआधी व संपेपर्यंत शेतात कोण–कोणती कामे केली जातात याची गटात चर्चा घडवून आणावी.<br>३. सुगीच्या हंगामातील कामांची चित्रे काढून विद्यार्थ्यांना ओळखण्यास सांगावीत. | १. बोलीभाषेतील कवितांचा संग्रह करणे.<br>२. अपरिचित शब्दांचा अर्थ शब्दकोशातून शोधणे.<br>३. कवितेतील तुम्हांला आवडलेल्या काव्यपंक्ती आवडण्याची कारणे लिहिणे.<br>४. कवितेतील यमक साधलेल्या शब्दांच्या जोड्या शोधणे. तशा शब्दांच्या इतर जोड्या तयार करणे.<br>५. पाठ्यपुस्तकातील सर्व उपक्रमांची पूर्तता करणे. | प्रकल्प, शब्दजाल, विश्लेषण, उपक्रमानुसार तंत्र | परिसर अभ्यास भाग १, भाग २<br>**भूगोल :** पर्जन्याचा प्रादेशिक असमतोल, दुष्काळ व कोरडा दुष्काळ याची कारणे व माहिती. | शेतकरी जीवनावरील कविता संग्रह ना. धो. महानोर, बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा संग्रह, दीक्षा ॲप वरील व्हिडिओ | ९, १०, ११, १७, १६ |

**घटक :** गद्य (चरित्रात्मक पाठ) **उपघटक :** ८) गुणग्राहक राजा **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- चरित्र, व्यक्तिचित्र, प्रसंग लेखन, वसतिगृहातील मुलांचे भावविश्व चरित्र म्हणजे सातत्याने सत्याचे भान राखून एखाद्या कर्तृत्ववान व्यक्तीच्या जीवनाचा कालानुसारी, घटनानुसारी वा विषयानुरूप साधार विश्लेषणात्मक वा परिचयात्मक इतिहास व त्या आधारे त्या त्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा आलेख म्हणजे चरित्र होय. चरित्र या साहित्याच्या वरील वैशिष्ट्यांचा प्रस्तुत पाठाच्या आधारे परिचय.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. साहित्य कृतीचा आस्वाद घेणे.<br>२. सयाजीराव गायकवाड यांच्या गुण वैशिष्ट्यांची ओळख करून घेणे.<br>३. आपल्या आजूबाजूच्या परिसरातील घटना किंवा प्रसंग यावर तोंडी/लेखी वर्णन करता येणे.<br>४. आरोहावरोहासह प्रकट/ मौन वाचन करता येणे.<br>५. पाठातील भाषिक सौंदर्य स्थळांचा आस्वाद घेता येणे.<br>६. अपरिचित शब्दांचा शोध/ अर्थ शब्दकोशातून मिळविणे. | १. **पृच्छा तंत्र :** प्रश्न विचारून श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या आयुष्यातील घटनांकडे त्यांच्या वागण्या-बोलण्याकडे लक्ष वेधावे.<br>२. **गटचर्चा :** परिसरातील सामाजिक कार्य करणाऱ्या कोणत्याही दोन व्यक्तींची तुलनात्मक चर्चा करावी.<br>३. **प्रकट वाचन :** गट तयार करून गटातील कोणत्याही एका विद्यार्थ्यास प्रकट वाचन करण्यास सांगावे.<br>४. **सहाध्यायी अध्ययन :** मित्रांच्या मदतीने पाठातील घटनांचा क्रम लावण्यास सांगावे. | १. पुढील मुद्द्यांच्या आधारे श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याविषयी माहिती लिहा. - वडिलांचे/आईचे नाव, सयाजीराव गायकवाड यांचा कालखंड, पाठाव्यतिरिक्त त्यांच्या जीवनातील इतर प्रसंग, त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य, पाठातील प्रसंगातून मिळणारा संदेश.<br>२. पारंपरिक खेळांच्या माहितीचा व चित्रांचा संग्रह करा.<br>३. चरित्रकथेचे नाट्यात रूपांतर करून त्याचे | प्रकल्प- व्यष्टी अभ्यास, गट कार्य, प्रायोगिकता | **क्रीडा :** गावाकडचे खेळ,<br>**कला :** खेळांची चित्रे काढणे, संग्रह करणे. परिसर अभ्यास भाग १, भाग २.<br>**इतिहास :** थोरांची चरित्रे. | दीक्षा ॲपवरील व्हिडिओ, पूरक वाचन पुस्तके | १, २, ३, ८, ९, १७ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ७. गावाकडच्या पारंपरिक खेळाची माहिती घेणे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव देणे.<br>८. विद्यार्थ्यांमध्ये समानानुभूतीचा अनुभव देऊन संवेदनशीलता जागृत करणे. | **सहकारशील अध्ययन :** गावाकडच्या पारंपरिक खेळाविषयी चर्चा घडवून आणावी.<br>प्रत्यक्ष अनुभव सूचनांवर आधारित खेळ खेळून घ्यावा. | वर्गात सादरीकरण करण्यास सांगावे. | | | | |

**घटक :** गद्य (कथा) **उपघटक :** ९) इदगाह **अंदाजे तासिका :** ३

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- कथा या साहित्य प्रकाराविषयी माहिती घेणे. कथा म्हणजे काय – कमीतकमी पात्र प्रसंगाच्या साहाय्याने साधलेला एकच एक साहित्य क्षेत्रांतर्गत कलात्मक अनुभवाचा गद्य आकृतिबंध. कथेचे घटक – कथानक, घटना पात्रे, मांडणी भाषा शैली, लेखकाचा हेतू, हेतूनुसार पात्रांची संख्या, मानवी जीवनदर्शन.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. साहित्यिक अभिव्यक्तींचा आस्वाद. खेळ, उत्सव वा मनोरंजनाच्या क्षेत्रासंबंधात ऐकलेल्या, वाचलेल्या पाहिलेल्या घटनांबद्दल मित्रांबरोबर चर्चा करणे.<br>२. खेळ, उत्सव,मनोरंजनाच्या क्षेत्रासंबंधात ऐकलेल्या, वाचलेल्या, पाहिलेल्या घटनांबद्दल मित्रांबरोबर चर्चा करणे. | १. **पृच्छा तंत्र :** भारतातील विविध सण व ते कसे साजरे केले जातात ते प्रत्येक विद्यार्थ्याकडून माहिती घेऊन सादरीकरण करण्यास सांगणे व त्यावर आधारित प्रश्न विचारावेत.<br>२. **गटचर्चा :** कथा या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये पाठाच्या आधारे तयार करण्यास सांगावा. | १. हमीदमध्ये तुम्हांला कोणते गुण दिसून येतात ते मित्रांशी चर्चा करून लिहा.<br>२. हमीदच्या आईला कोणता आजार असेल?<br>३. तुम्हांला खाऊसाठी दिलेल्या पैशाचे तुम्ही काय करता ते लिहा.<br>४. तुमच्या परिसरातील उत्सवाचे वर्णन करा. | व्यष्टी अभ्यास, गटचर्चा, प्रत्यक्ष अनुभव, स्वअभिव्यक्ती लेखन कौशल्य, प्रायोगिकता | परिसर अभ्यास भाग १ व भाग २<br>**विज्ञान :** आईच्या आजाराची वैशिष्ट्ये. | पूरक वाचनास दिलेल्या पुस्तकातील कथा वाचणे. इसापनीती मधील कथा वाचणे. दीक्षा ॲपवरील व्हिडिओ पाहणे. | १, २, ३, ४, ७, ८, ९, १५, १७ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे परिचित विषयावर आठ ते दहा वाक्यांचे लेखन करणे.<br>४. शब्दकोश व ज्ञानकोशाचा योग्य तेथे उपयोग करणे.<br>५. समानानुभूतीचा अनुभव देऊन, संवेदनशीलता जागृत करणे.<br>६. सर्वधर्मसमसहिष्णुता जोपासण्यास मदत करणे. | ३. **ओघतक्ता :** कथेतील प्रसंगांचा क्रमवार ओघतक्ता तयार करण्यास मदत करावी.<br>४. **मुक्त प्रश्न :** कथेत आलेल्या पात्रांची नावे सांगण्यास सांगावी. | ५. तुमच्या जीवनातील एखाद्या प्रसंगाचे कथेत रूपांतर करा.<br>६. कथेचे नाट्यात रूपांतर करा. | | | | |
| **घटक :** गद्य (मुलाखत) **उपघटक :** १०) धाडसी हाली **अंदाजे तासिका :** ३<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• मुलाखत – लेखन कौशल्य, प्रसंग लेखन, चरित्र म्हणजे-सातत्याने सत्याचे भान राखून एखाद्या कर्तृत्ववान व्यक्तीच्या जीवनाचा कालानुसारी, घटनानुसारी वा विषयानुरूप साधार विश्लेषणात्मक वा परिचयात्मक इतिहास व त्या आधारे त्या त्या व्यक्तिमत्वाच्या विकासाचा आलेख म्हणजे चरित्र होय. चरित्र या साहित्याच्या वरील वैशिष्ट्यांचा प्रस्तुत पाठाच्या आधारे परिचय करून द्यावा. | | | | | | |
| १. साहित्य कृतीचा आस्वाद घेणे.<br>२. महत्त्वाकांक्षी व धारिष्ट्यवान व्यक्तींच्या गुणवैशिष्ट्यांची ओळख करून घेणे.<br>३. आपल्या आजूबाजूच्या परिसरातील घटना किंवा | १. **पूर्वज्ञान जागृती :** बालभारती संपादित इयत्ता आठवीच्या पुस्तकातील 'वीर बापू गायधनी' या पाठाचे वाचन करून घ्यावे.<br>२. **पृच्छा तंत्र :** प्रश्न विचारून धाडसी हालीच्या | १. पुढील मुद्द्यांच्या आधारे धाडसी हाली विषयी माहिती लिहा. आईचे नाव, पाठाव्यतिरिक्त तिच्या जीवनातील इतर प्रसंग, पाठातील प्रसंगांतून मिळणारा संदेश. | व्यष्टी अभ्यास, प्रकल्प, मुलाखत तंत्र, उपक्रमानुसार तंत्र | **परिसर अभ्यास भाग १ व २ :** आदिवासी भागाची ओळख<br>**इतिहास :** वीर बापू गायधनी चरित्र. | बालभारती संपादित इ. आठवीचे पुस्तक, दीक्षा ॲपवरील व्हिडिओ | १, २, ३, ४, ७, ८, ९, १५, १७ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रसंग यावर तोंडी/लेखी वर्णन करता येणे.<br>४. आरोहावरोहासह प्रकट/मौन वाचन करता येणे.<br>५. पाठातील भाषिक सौंदर्यस्थळांचा आस्वाद घेता येणे.<br>६. शब्दकोशातून अपरिचित शब्दांचा शोध/अर्थ मिळविणे.<br>७. गावाकडच्या पारंपरिक खेळाची माहिती घेणे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव देणे.<br>८. विद्यार्थ्यांमध्ये समानानुभूतीचा अनुभव देऊन संवेदनशीलता जागृत करणे. | आयुष्यातील घटनांकडे तिच्या वागण्या–बोलण्याकडे लक्ष वेधावे.<br>३. **गटचर्चा :** हालीने केलेले धाडस व तुमचे धाडस यांत तुलनात्मक चर्चा घडवून आणावी.<br>४. **प्रकट वाचन :** गट तयार करून गटातील कोणत्याही एका विद्यार्थ्यास प्रकट वाचन करण्यास सांगावे.<br>५. **सहाध्यायी अध्ययन :** मित्रांच्या मदतीने तुमच्या परिसरातील कोणत्याही क्षेत्रात धाडस दाखविलेल्या व्यक्तीची मुलाखत तुम्हाला घ्यायची आहे. त्यासाठी मित्राच्या मदतीने प्रश्न तयार करण्यास सांगावेत. | २. वीर बापू गायधनी हा पुरस्कार मिळालेल्या इतर पुरस्कार्थींचे माहितीचा संग्रह करा.<br>३. इंटरनेटच्या मदतीने लहान मुलांसाठी असणाऱ्या पुरस्काराविषयी माहिती मिळवा.<br>४. तुमच्या शाळेतील विशेष धाडस केलेल्या विद्यार्थ्यांची मुलाखत घ्या.<br>५. पाठ्यपुस्तकातील सर्व उपक्रमपूर्तता करणे. | | | | |

**घटक :** पद्य निसर्ग वर्णन **उपघटक :** ११) नाखवा रे दादा नाखवा **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• भाषिक सौंदर्यस्थळे अधिक माहिती मिळवणारे प्रश्न, संवाद, चर्चा.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. कविता तालासुरात म्हणणे.<br>२. कवितेचा आनंद घेऊन त्यातील कल्पना स्वतःच्या शब्दात स्पष्ट करणे.<br>३. कवितेचा अर्थ समजून प्रकट वाचन करणे.<br>४. कवितेतील पात्रांच्या भावनांशी समरस होणे.<br>५. कवितेतील प्रसंग आपल्या अनुभवाशी जोडून आपले मत व्यक्त करता येणे. | १. कविता साभिनय ताला-सुरात सादर करण्यास सांगावी.<br>२. कवितेतील आशय स्पष्ट होण्यासाठी विविध प्रश्नांच्या माध्यमातून चर्चा घडवून आणावी.<br>३. कठीण शब्दांचा अर्थाचा शोध घेण्यास सांगावा.<br>४. निसर्गातील विविध सौंदर्य स्थळांचा शोध घेण्यास सांगावे.<br>५. कोकणाचे सौंदर्य व तेथील व्यवसाय यावर आधारित विविध व्हिडिओ दाखवून चर्चा घडवून आणावी.<br>६. कवितेतील आशयाशी संबंधित विषयावर चित्र रेखाटण्यास सांगून त्यावर आधारित गप्पा माराव्यात. | १. कवितेतील संवाद गद्य स्वरूपात लिहिणे.<br>२. कवितेतील चित्रावरून सुचलेले काव्य तयार करून लिहिणे.<br>३. पानावरील दवबिंदू रंगीत फुलपाखरे, इंद्रधनुष्य यांची चित्रे काढणे.<br>४. वाहनचालकाची भेट घेऊन त्याची मुलाखत घेणे.<br>५. कवितेतील आशय स्वतःच्या शब्दांत सांगणे.<br>६. वाहनचालक व नावाडी यांच्या कामाच्या फरकातील गटात चर्चा करणे. | मुक्त संवाद, प्रायोगिकता, संकल्पना चित्र, प्रकल्प, विश्लेषण, गटचर्चा | **भूगोल :** खाडीविषयी माहिती<br>**परिसर अभ्यास :** परिसरातील प्राणी, कीटक, इंद्रधनुष्य, दवबिंदू यावर चर्चा | दीक्षा ॲप : क्यू आर कोड, निसर्ग वर्णनात्मक विविध कवितांचा अभ्यास. | २, ३, ६, ८, १०, १२, १३, १४ |

**घटक :** गद्य पाठ (प्रसंगाधारित) **उपघटक :** १२) वाटाड्या **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- औपचारिक/अनौपचारिक चर्चा, संवाद, अधिक माहिती मिळविणारे प्रश्न, घटनाक्रम, भाषिक सौंदर्यस्थळे, अभिव्यक्ती समानार्थी विरुद्धार्थी शब्द, वाक्प्रचार.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. परिसरातील सभेत भाषणा वेळी आपले मत व्यक्त करता येणे.<br>२. पाहिलेल्या घटनांबद्दल आपल्या मित्रांसोबत चर्चा करणे.<br>३. अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारणे.<br>४. परिसरातील अनौपचारिक संभाषणातही प्रमाण भाषेचा सहज उपयोग करणे.<br>५. अर्थ समजून पाठाचे प्रकट वाचन करणे.<br>६. परीक्षेत दिलेल्या विषयावर आधारित आठ-दहा वाक्यांचे लेखन करणे. | १. पाठाशी संबंधित विषयावर मुलांशी अनौपचारिक चर्चा घडवून आणावी.<br>२. चित्रावर आधारित तसेच मुलांच्या अनुभव विश्वाशी संबंधित पाठाच्या आशयाशी संलग्न असे प्रश्न विचारावेत.<br>३. रस्त्यावरून चालताना पाळावयाचे नियम, चर्चा व प्रश्नांच्या माध्यमातून स्पष्ट करावे.<br>४. मुलांकडून पाठातील संवादाचे सादरीकरण करून घ्यावे.<br>५. मूकबधिर अंध, अपंग शाळेतील वातावरणा-विषयी मुलांशी चर्चा करणे व अशा शाळेसाठी काम करणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावे. | १. चित्र निरीक्षण करून मुलांनीच आपापसांत प्रश्न विचारणे.<br>२. स्वावलंबनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध व्यक्तींची उदाहरणे व्हिडिओ संदर्भ पुस्तकांच्या माध्यमातून शोधणे.<br>३. रस्त्यावरून चालताना पाळावयाचे नियम मित्रांशी चर्चा करून लिहिणे.<br>४. दिलेल्या प्रसंगावर आधारित संवाद लेखन करणे.<br>५. अनाथालय, मूकबधिर शाळा अशा संस्थांना भेट देऊन तेथील अनुभव वर्गात सांगणे. | सहयोगी अध्ययन, व्यष्टी अभ्यास, गटचर्चा, विश्लेषण | **विज्ञान :** स्पर्श समजणे. रहदारीचे नियम सांगता येणे. **इंग्रजी शब्द :** प्लीज, क्रॉस, टीव्ही यांचे मराठीत अर्थ सांगता येणे. | दीक्षा ॲप : क्यू आर कोड, विविध संदर्भ पुस्तके | २, ४, ६, ८, १०, ११, १६ |

**घटक :** पद्य (चिंतन गर्भकाव्य) **उपघटक :** १३) चवदार तळ्याचे पाणी **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- कविता, अनौपचारिक/औपचारिक संभाषण, प्रमाण भाषा, अनुभव कथन.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. कविता व्यक्तिगत चालीवर म्हणता येणे.<br>२. कवितेचे सामूहिक सादरीकरण करणे.<br>३. कवितेतील कठीण शब्दांचे अर्थ सांगणे.<br>४. गाणी व कवितांमधील आशय तसेच कवीने केलेल्या कल्पना सांगणे.<br>५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वंचित घटकांसाठी केलेल्या कामाची माहिती घेणे.<br>६. समाजातील स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी असलेली परिस्थिती आणि वर्तमान परिस्थिती यांचा तुलना करणे.<br>७. कवितेतील काव्यसौंदर्य जाणून घेणे. | १. कविता सर्व विद्यार्थ्यांना एकत्रित तालासुरात म्हणण्यास सांगावी.<br>२. चवदार तळ्याचा सत्याग्रह याविषयी असलेली माहिती प्रश्नोत्तरे विचारून जाणून घ्यावेत.<br>३. कवितेतील अपरिचित शब्द शब्दकोशातून शोधण्यास सांगावेत.<br>४. कवीने वर्णन केलेली वस्तुस्थिती व इतिहासातील प्रसंग यांची तुलना करण्यास सांगावी.<br>५. मुक्यास दिधली वाणी, करुणेची आर्त विराणी... यांसारख्या काव्यपंक्तीचा विद्यार्थी काय अर्थ लावतात, ते जाणून घ्यावी. | १. स्वातंत्र्य कालखंडातील प्रसिद्ध **(महाड)** असलेल्या ऐतिहासिक स्थळास भेट देणे.<br>२. पुढील मुद्द्यांच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी माहिती लिहा. आईचे नाव, त्यांचा कालखंड, पाठा व्यतिरिक्त त्यांच्या जीवनातील इतर प्रसंग, त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य, पाठातील प्रसंगातून मिळणारा संदेश.<br>३. कवितेतील आवडलेल्या काव्यपंक्ती किंवा शब्दाविषयी गटात चर्चा करणे. | क्षेत्रभेट, संकल्पना चित्र, अभ्यास, गटचर्चा | परिसर अभ्यास, इतिहास | क्यू आर कोड दीक्षा ॲप | १, २, ५, ६, ७, ८, १५, १७ |

**घटक :** गद्य (अद्‌भुत कथा) **उपघटक :** १४) मिठाचा शोध **अंदाजे तासिका :** ५

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- औपचारिक व अनौपचारिक चर्चा, स्व–अभिव्यक्ती, भाषिक सौंदर्यस्थळे, अधिक माहिती मिळणारे प्रश्न, घटनाक्रम, कार्यकारणभाव, अनुभव, घटनेचा परिणाम.

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पाठ समजून घेऊन चर्चा करणे.<br>२. अधिक माहितीसाठी प्रश्न विचारणे.<br>३. आपले मत व्यक्त करता येणे.<br>४. अर्थ समजून प्रकट वाचन करणे.<br>५. घटनेमागील कार्यकारणभाव समजणे.<br>६. शाळेतील विविध कार्यक्रमांसाठी निमंत्रण पत्रिका तयार करणे. | १. पाठाच्या आशयाशी संबंधित चर्चा घडवून आणावी.<br>२. आशयाशी संबंधित विविध व्हिडिओज दाखवावेत व मुक्तोत्तरी प्रश्न विचारावेत<br>३. अश्मयुगातील मानवी जीवनाविषयी व्हिडीओज दाखवून किंवा लेख वाचून चर्चा घडवून आणावी.<br>४. घटनाक्रम सांगून त्यामागील कार्यकारणभावाविषयी चर्चा करावी.<br>५. निमंत्रण पत्रिका तयार करण्यासाठी विविध मुद्द्यांवर चर्चा करून प्रश्नोत्तरे सराव घ्यावा. | १. पाठातील कठीण शब्द, वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे.<br>२. अनुभव लक्षात घेऊन दिलेली सारणी पूर्ण करणे.<br>३. पाठावर आधारित पात्रे घेऊन संवाद लेखन करणे.<br>४. अश्मयुगातील मानवाच्या इतिहासातील घटनांचा क्रम लिहिणे.<br>५. मिठाच्या शोधाचा घटनाक्रम तयार करणे.<br>६. शाळेतील स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी निमंत्रण पत्रिका तयार करणे. | कृती (उपयोजन), पृथक्करण, प्रायोगिकता, ओघतक्ता, | **इतिहास :** आदिमानव कथा<br>**भूगोल :** खनिज मीठ समुद्र माहिती<br>**विज्ञान :** चवींची ओळख पाण्याची वाफ होणे. | क्यू आर कोड, दीक्षा ॲप, अश्मयुगीन इतिहास, संदर्भ ग्रंथ | १, २, ५, ६, ७, ८, १५, १७ |

**घटक :** गद्य (ललित लेख) **उपघटक :** १५) आनंदाचे झाड **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- औपचारिक व अनौपचारिक चर्चा, अधिक माहिती मिळणारे प्रश्न, कार्यकारण भाव, भाषिक सौंदर्यस्थळे, अनुभव लेखन.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. स्वमत व्यक्त करणे.<br>२. पाठाचे संबंधित विषया–वरील चर्चेत सहभाग घेणे.<br>३. प्रसंग किंवा घटनेविषयी पडणारे प्रश्न मित्र शिक्षकांना विचारणे.<br>४. अर्थ समजून पाठाचे प्रकट वाचन करणे.<br>५. दिलेल्या विषयावर आठ ते दहा ओळी माहिती लिहिणे.<br>७. विविध कल्पनांची मांडणी करणे, तसेच कल्पनांवर आधारित लेखन करता येणे.<br>८. वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करणे, अपूर्ण कवितेच्या ओळी पूर्ण करणे. | १. पाठातील आशयाशी संबंधित चर्चा घेऊन मुक्तोत्तरी प्रश्न विचारावेत.<br>२. पाठातील वर्णनासंबंधी इतर अनुभवांची उदाहरणे द्यावीत.<br>३. आशयाशी संबंधित समजुती, गैरसमजुती याविषयी चर्चा घ्यावी.<br>४. शेवग्याच्या झाडाचे विविध उपयोग सोदाहरण स्पष्ट करावे.<br>५. ललित लेखनाच्या अनुषंगाने पाठात वापरलेल्या विशेषणामुळे भाषेला सौंदर्य कसे प्राप्त झाले आहे याची ओळख करून द्यावी. | १. पाठातील कठीण शब्द, वाक्प्रचार शोधून वाक्यात उपयोग करणे.<br>२. पाठाचे संबंधित नाट्यीकरणाचे संवाद लेखन तयार करून घेणे.<br>३. दिलेल्या प्रसंगावर – आधारित चित्र काढून चार ते पाच वाक्ये माहिती लिहिणे.<br>४. झाडे–आपले मित्र या विषयावर निबंध लिहिणे.<br>५. वृक्षदिंडी, वृक्ष लागवड यांसारखे उपक्रम घेणे.<br>६. पर्यावरणातील झाडांचे महत्त्व समजण्यासाठी घोषवाक्ये कविता लेखन करून घेणे. | उपयोजन, प्रायोगिकता, विश्लेषण, प्रत्यक्ष कृती, समस्या निराकरण | परिसर अभ्यास, कला, कार्यानुभव | दीक्षा ॲप, क्यू आर कोड व विविध संदर्भ ग्रंथ | १, २, ६, ८, ९, १०, १३, १६, १७, १८ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | ६. भाषिक सौंदर्य स्थळांचा शोध घेऊन त्यासंबंधी विविध भाषेत खेळ घ्यावा.<br>७. 'अलगद' हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ फुलचुख्यांची झुंबड मला दिसली. यासारखी एकापेक्षा अधिक विशेषणे असलेली वाक्य शोधण्यास सांगावीत. | | | | | |
| **घटक :** पद्य **उपघटक :** १६) झुळूक मी व्हावे **अंदाजे तासिका :** ४<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • कविता | | | | | | |
| १. कविता, गाणी, समूहगीते तालासुरात व लयीत म्हणणे.<br>२. गाणी व कवितांमधील आशय आणि कवीने केलेल्या कल्पना सांगणे.<br>३. आवडलेली कथा, कविता विनोद साभिनय सादर करणे. | १. परिसरात असलेला कोणताही मानवेतर घटक तुम्ही आहात अशी कल्पना करण्यास सांगावी. काय अनुभव घ्याल? याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.<br>२. कल्पनांवर आधारित लेखन करण्यास सांगावे. | १. परिसरातील कोणत्याही जलाशयाला, ऐतिहासिक स्थळ, भेट द्या.<br>२. निसर्गातील इतर कोणताही सजीव घटकांची माहिती मिळविणे.<br>३. आपण कोण होणार व का याविषयी गटात चर्चा करणे. | क्षेत्रभेट, प्रकल्प, गटचर्चा, विश्लेषण, प्रायोगिकता | परिसर अभ्यास, कला, कार्यानुभव | क्यू आर कोड, दीक्षा ॲपवरील व्हिडिओ. | १, २, ५, ६, ७, ८, १५, १७ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. कवींनी वर्णन केलेली वस्तुस्थिती व त्यांच्या कल्पना याकडे तसेच निसर्ग आणि मानव यांच्या नात्याकडे लक्ष वेधणे.<br>५. गाणी व कवितांमधील आशय तसेच कवीने केलेली कल्पना सांगणे.<br>६. काव्यसौंदर्य निर्माण होण्यासाठी कवीने योजलेल्या शब्दांची निवड व त्याची योग्य ठिकाणी मांडणी लक्षात घेणे. | ३. अपूर्ण कवितेच्या ओळी पूर्ण करण्यासाठी कोणते शब्द निवडावे लागतील याविषयी गटात चर्चा करावी.<br>४. झुळूक ज्या ज्या ठिकाणी जाईल ते ठिकाण व झुळूक यांच्यामध्ये होणाऱ्या संवादाची कल्पना करून लिहण्यास सांगावी.<br>५. तुम्ही झुळूक झाला तर... गटात चर्चा करावी. | ४. मी.... झालो तर, यासारख्या विषयावर लेखन करण्यास देणे व त्याचे वर्गात सादरीकरण करण्यास सांगणे.<br>५. मी, झुळूक, माझे मित्र... संवादलेखन करणे. | | | | |

**घटक :** गद्य (विनोदी) **उपघटक :** १७) म्हणींच्या गमती **अंदाजे तासिका :** ४

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • व्याकरण – म्हणी, चित्रकथा

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | मिळाले याची नोंद ठेवा. अपूर्णांक समजावून सांगा.<br>• दिलेल्या समूहाच्या दिलेल्या अपूर्णांकाएवढ्या भागाला रंगवा व वाचन करा. | | | | | |

| अपूर्णांक | समूह | वजन |
|---|---|---|
| $\frac{२}{३}$ |  | दोन छेद तीन |
| $\frac{१}{४}$ |  | एक छेद चार |
| $\frac{३}{५}$ |  | तीन छेद पाच |
| $\frac{१}{२}$ |  | एक छेद दोन |
| $\frac{४}{६}$ |  | चार छेद सहा |

**घटक :** नाणी व नोटा **अंदाजे तासिका : ४**

**उपघटक :** (१) नाणी व नोटा मोड (सुटे) करणे (२) नाणी व नोटा बंदे करणे.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- नाणी व नोटा वाचन व लेखन.
- नाणी व नोटा ओळख.
- नाणी व नोटा वापर.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) नाणी व नोटा वाचन व लेखन करता येणे.<br>२) नाणी व नोटा यांची ओळख होणे.<br>३) नाणी व नोटा यांचा व्यवहारात वापर करता येणे. | • बाजारातून खेळण्यातील/प्रतीकात्मक नाणी व नोटा घेऊन येणे. ते वेगवेगळ्या कार्डांवरती चिटकविणे. वर्गातील विद्यार्थ्यांना विविध रकमांची कार्डे देणे. समोरासमोरील विद्यार्थ्यांना कार्ड दाखवून रक्कम ओळखण्यास सांगा. त्याचे वाचन करण्यास सांगा.<br>• मध्यभागी एकाने १०० रु. ची नोट घेऊन उभे राहणे. त्याच्या सभोवताली प्रत्येकाने १०० रु. ची मोड/सुटे होईल असे गट करून एकत्र येणे. काही वेळेस ५०० रुपये, तर कधी २००० रुपये घेऊन | • सूचक कृती प्रमाणे उदाहरणे तयार करून विद्यार्थ्याला मोड/सुटे समजावून सांगा. विद्यार्थ्यांचे गट करून विविध नाणी व नोटा यांचे वाचन व लेखन घ्यावे. शाळेत बाजार दिवस साजरा करून व्यवहार समजावून सांगा. | दैनंदिन, निरीक्षण, वर्गकार्य | **इतिहास :** प्राचीन काळातील चलन व्यवस्था अभ्यासणे. | | ०४.७१.०८ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | मध्यभागी उभे राहून हा खेळ पुन्हा खेळावा.  | | | | | |
| | • नाणी व नोटा घेऊन मोड/ सुटे करणे हा खेळ खेळा.  ५००+१०००+५००← →१००+२००+२००+५००+५००+५०० अशा प्रकारे मोड/सुटे करता येतात हे समजावून सांगा. • वर्गातील विद्यार्थ्यांचे गट करा. एक गटप्रमुख बनवा. गटप्रमुखाकडे १०० रु., २०० रु. ५०० रु., २००० रु. च्या नोटा द्या. इतर विद्यार्थ्यांकडे ५ रु., १० रु., २० रु., ५० रु., १०० रु., २०० रु. ५०० रु. यांची कार्डे द्या. प्रत्येकाने आपल्या गटप्रमुखाकडून आपली रक्कम बंदे करून | | | | | |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | घ्या. अशा प्रकारे कृतीतून व्यवहार समजावून सांगा. उदा. २०० रुपयांचे बंदे करणे.  • ५ रुपयाची चार नाणी, १० रुपयाची तीन नाणी घेऊन मुलाला द्यावीत. याचे बंदे विद्यार्थ्याकडे मागावेत. असे सुटे बंदे करण्याचा सराव घ्यावा. अजून काही मुलांना काही नाणी देऊन बंदे करण्याचा अनुभव द्या. | | | | | |

**घटक :** मापन

**अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** वस्तुमान

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- वस्तुमानाचे वाचन व लेखन.
- वस्तुमानाची ओळख.
- वस्तुमानाचा वापर.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) वस्तुमानाचे वाचन व लेखन करता येणे.<br>२) वस्तू मोजता येणे.<br>३) वस्तुमानाचा वापर करता येणे. | • वजन करा. ते वजन किलोग्रॅम व ग्रॅम मध्ये लिहून वाचन करा.<br>साहित्य – वजन<br>स्वत:चे वजन –<br>दप्तर –<br>४ वह्या –<br>२ पुस्तके –<br>कंपासपेटी –<br>पाण्याची बाटली –<br>शाळेमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटा आणा. प्रत्येक विद्यार्थ्यास ही कृती करण्यास सांगा. त्यांना किलोग्रॅम व ग्रॅम समजावून सांगा. | • सूचक कृती सारखी उदाहरणे तयार करून विद्यार्थ्याला वस्तुमान मापन समजावून सांगा. शाळेतील वेगवेगळ्या वस्तू घेऊन त्यांचे वजन करून वाचन व लेखन घ्या.<br>• शाळेमध्ये बाजार दिवस साजरा करून भाजीपाला, फळभाजी, अन्नधान्य यांचा व्यवहार सांगा. | उपक्रम,<br>प्रकल्प | **भूगोल :** दळणवळणमध्ये वजनावरून भाडे आकार सांगणे.<br>**इतिहास :** धान्याची कोठारे, साठवणूक सांगणे. | | ०४.७१.२१ |

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | • विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीसाठी किराणा मालाच्या दुकानात घेऊन जा. त्या ठिकाणच्या व्यवहारांचे निरीक्षण करण्यास सांगा. त्या नोंदी आपल्या वहीत लिहून ठेवण्यास सांगा.<br>१ किलोग्रॅम = १००० ग्रॅम, १/२ किलोग्रॅम (अर्धा किलो) = ५०० ग्रॅम या गोष्टी समजावून सांगा.<br>१०० रु. देऊन किराणा दुकानातून बाजार (साखर, तांदूळ, गूळ इ.) खरेदी करायला लावा.<br>•  = ५०० ग्रॅम<br> = २ किग्रॅ<br> = २५० ग्रॅम<br> = १ किग्रॅ<br> = ४ किलोग्रॅम<br>याप्रमाणे बाजारातील वजने किलोग्रॅम, ग्रॅम समजावून सांगून अनुभव द्या. | | | | | |

**घटक :** कालमापन **अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** (१) घड्याळात दिसणारी वेळ लिहिणे (२) वेळ वाचून काट्याची स्थिती दाखविणे.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- घड्याळाच्या वेळेचे वाचन व लेखन.
- घड्याळाची ओळख.
- घड्याळाचा वापर.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) घड्याळाच्या वेळेचे वाचन व लेखन करता येणे.<br>२) घड्याळाची वेळ ओळखता येणे.<br>३) घड्याळाचा वापर करता येणे. | • वर्गातील विद्यार्थ्यांचे गट तयार करा. त्यांचा एक प्रमुख बनवा. प्रमुखाकडे घड्याळाची प्रतिकृती द्या. लाल रंगामध्ये १ ते १२ पर्यंतच्या संख्या असणारी कार्डे किती तास झाले यासाठी तर पिवळ्या रंगामध्ये ० ते ५९ पर्यंतच्या संख्या असणारी कार्डे किती मिनिटे झाली यासाठी तयार करा. (एका कार्डावर एकच संख्या घ्या. लाल, पिवळ्या रंगाऐवजी आपण वेगवेगळे रंग घेऊ शकता.) ही कार्डे विद्यार्थ्यांना वाटा. प्रमुखाने दाखविलेली वेळ कार्डाच्या साहाय्याने दाखवा. | • सूचक कृतीप्रमाणे उदाहरणे तयार करून विद्यार्थ्याला घड्याळ समजावून सांगा.<br>• घड्याळात वेगवेगळ्या वेळा देऊन वेळेचे वाचन व लेखन घ्या. | दैनंदिन निरीक्षण, वर्गकार्य, तोंडी काम | **भूगोल :** पृथ्वीचे परिवलन/ परिभ्रमण, दिवस–रात्र सांगणे.<br>**इतिहास :** राजे – महाराजे यांची कालगणना सांगणे. | | ०४.७१.२३ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | वेळेचे वाचन–लेखन करून घ्या.<br><br>• शाळेच्या मैदानामध्ये एक उभी काठी जमिनीत रोवा. त्याच्या सावलीवरून वेळेची नोंद ठेवा. दररोज त्याचे निरीक्षण करून वेळ समजावून सांगा.<br>• प्रथम वेळ सांगणाऱ्या कागदी पट्ट्या तयार करा. त्या भिंतीला लावा. घड्याळाच्या प्रतिकृती तयार करा. पट्टीवरील वेळ असणारी नोंद मिनिट काटा व तास काटा यांच्या साहाय्याने दाखवा. (काट्यांची स्थिती करून दाखवा.)<br>१) २ वाजून ४० मिनिटे,<br>२) ९ वाजून १५ मिनिटे,<br>३) ११ वाजून ०५ मिनिटे |  | | | | |

**घटक :** भौमितिक आकृत्या — **अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** कोन

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

**कोनाचे प्रकार :** • लघुकोन • काटकोन • विशालकोन

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) लघुकोन ओळखता येणे.<br>२) काटकोन ओळखता येणे.<br>३) विशालकोन ओळखता येणे. | • ज्यात कोन दिसतो. अशी चित्रे जमा करा व त्यातील कोन दाखवा.<br>• हाताच्या कोपराजवळ तयार होणारे कोन पाहा.<br>• खिडकी, पुस्तक व घड्याळाच्या साहाय्याने काटकोन स्पष्ट करा.<br>• कात्रीच्या साहाय्याने लघुकोन, विशालकोन स्पष्ट करा.<br>• ठिपके काढून व ते जोडून कोनाचे प्रकार स्पष्ट करा. | • शाळेमध्ये अनेक ठिकाणच्या कोनांचा अनुभव द्या. उदा. झाडांच्या फांद्यांमधील कोन, पाण्याचा उभा नळ, भिंत व फळा यामध्ये तयार होणारे कोन यांचा अनुभव द्या.<br>• चौकांमध्ये रस्त्यांनी तयार केलेल्या कोनांचा, अनुभव द्या.<br>• कागदाच्या, लाकडाच्या पट्ट्या घेऊन कोनाच्या प्रकारांचा अनुभव द्या.<br>• कागद कापून घड्या घालून होणाऱ्या विविध कोनांची चर्चा करा. | दैनंदिन, निरीक्षण, वर्गकार्य, प्रात्यक्षिक | **परिसर अभ्यास :** वृक्ष, मानवी शरीर-अवयव यांचा अभ्यास.<br>**कार्यशिक्षण :** कागदकाम. | | ०४.७१.१३ |

**घटक :** भौमितिक आकृत्या

**अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** वर्तुळ

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• वर्तुळाकार वस्तूंची ओळख • वर्तुळ काढणे. • वर्तुळ केंद्र, त्रिज्या, व्यास व जीवा • कंपासच्या साहाय्याने वर्तुळ काढून वर्तुळ केंद्र, त्रिज्या, व्यास व जीवा दर्शविणे.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) वर्तुळाकार वस्तू ओळखणे.<br>२) वर्तुळ काढता येणे.<br>३) वर्तुळकेंद्र, त्रिज्या, व्यास व जीवा ओळखणे.<br>४) कंपासच्या साहाय्याने वर्तुळ काढून वर्तुळकेंद्र, त्रिज्या, व्यास व जीवा दर्शविणे. | • बांगडी, सायकलचे चाक, बैलगाडीचे चाक दाखवा.<br>• वाटीच्या मदतीने, कंपासच्या साहाय्याने वर्तुळ काढणे.<br>• वर्तुळाकार कागद कापून त्याला घडी घालून जीवा, व्यास, त्रिज्या व वर्तुळ-केंद्र स्पष्ट करा.<br>• कागदावर कंपासचे टोक ठेवून वर्तुळ काढा व केंद्र, जीवा, त्रिज्या, व्यास स्पष्ट करा. | • स्वयंपाकघरातील वर्तुळाकार वस्तूंची यादी करण्यास सांगा.<br>• खेळण्यामध्ये, शाळेमध्ये वर्तुळाकार वस्तूंचे गट करण्यास सांगा.<br>• पेनचे टोपण, ग्लास, बांगडी, नाणी यांच्या साहाय्याने वर्तुळ काढण्याचा अनुभव द्या.<br>• मैदानावर खुंटी ठोका, त्याला दोरीचे टोकबांधा. दुसऱ्या बाजूस काठी अडकवून वर्तुळ काढण्याचा अनुभव द्या व वर्तुळाचे भाग चर्चेद्वारे, समजून घ्या. | उपक्रम,<br>प्रकल्प,<br>वर्गकार्य | **आरोग्य शिक्षण :** मैदानावर खेळाच्या माध्यमातून वर्तुळ स्पष्ट करणे. | | ०४.७१.१४ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | • खुंटी तीच ठेवून दोरीचे अंतर कमी-जास्त करून अनेक वर्तुळे काढण्याचा अनुभव द्या. | | | | |
| **घटक :** भौमितिक आकृत्या<br>**उपघटक :** शिरोबिंदू व बाजू<br>**उपघटकात समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• आयत, चौरस व त्रिकोण यांच्या कडा व कोपरे | | | | | | **अंदाजे तासिका :** ३ |
| १) आयत, चौरस, त्रिकोण यांच्या कडा मोजता येणे. | • आयत, चौरस व त्रिकोण काढून त्यांच्या कडा व कोपरे स्पष्ट करा. | • काड्या, साबणाचे खोके, प्लॅस्टिक काड्या घेऊन आयत, चौरस, त्रिकोण तयार करण्याचा अनुभव द्या. त्यांच्या कोपऱ्यावर नावाचा कागद चिकटवा व कडा आणि टोके यांची नावे सांगण्याचा अनुभव द्या. | प्रकल्प, वर्गकार्य | **परिसर अभ्यास :** परिसरातील वस्तूंचे निरीक्षण करणे. | | ०४.७१.१९ |

**घटक :** परिमिती

**अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** चौरस, आयत व त्रिकोण

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- चौरस, आयत व त्रिकोण यांची परिमिती

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) चौरस, आयत व त्रिकोण यांची परिमिती काढता येणे. | • हातरुमालाची परिमिती दोऱ्याच्या साहाय्याने काढून दाखवा.<br>• चौरस, आयत व त्रिकोण काढून त्यांच्या कडांची लांबी लिहा व परिमिती स्पष्ट करा. | • १० सेमी, १५ सेमी, २० सेमी व २५ सेमी अशा बाजू असणारे चौरस, आयत व त्रिकोण तयार करून त्यांची परिमिती काढण्याचा अनुभव द्या.<br>• १० सेमी रुंदी व २० सेमीची लांबी असणारा आयत तयार करून परिमिती ६० सेमी येते. याचा अनुभव घ्या.<br>• गट तयार करून विविध आकाराच्या परिमितीचा अनुभव द्या. | उपक्रम, वर्गकार्य | **चित्रकला :** कलेमध्ये विविध आकार काढतो. | | ०४.७१.१९ |

**घटक :** आकृतिबंध **अंदाजे तासिका :** ४

**उपघटक :** आकृत्या

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • भौमितिक आकृत्यांचा आकृतिबंध

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) आकृतिबंध तयार करता येणे.<br>२) मुक्त हस्तचित्रातील आकृतीचे निरीक्षण करता येणे. | • आपल्या परिसरातील विविध ठिकाणांवरील आकृत्यांचे निरीक्षण करून आकृतिबंध समजावून द्या. | • शाळेच्या खिडकीच्या जाळ्या, साडीच्या काठावरील नक्षी, मंदिरामधील नक्षी यांच्या निरीक्षणाचा अनुभव द्या.<br>• बोटे, पाने, फळांचे आडवे काप (भेंडी, कांदा) रंगात बुडवून आकृतिबंध तयार करण्याचा अनुभव द्या.<br>• पानांची, फुलांची रचना यांच्या आकृतिबंधांचा अनुभव द्या.<br>• कवायत करताना जो ड्रम वाजविला जातो तेव्हा निर्माण होणाऱ्या ध्वनीतील आकृतिबंधाचा अनुभव द्यावा.<br>• ABBABBABB, 135135 135 या प्रकारच्या आकृतिबंधाचा अनुभव द्या. | दैनंदिन, निरीक्षण, कृती, प्रकल्प | **परिसर अभ्यास :** पाने, फुले आकारांचा अभ्यास<br><br>**मराठी :** कविता गायन करणे. | | ०४.७१.२७ |

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय – परिसर अभ्यास : भाग १

### संवाद शिक्षक मित्रांशी

आजची शिक्षण प्रणाली २१ व्या शतकाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून शिक्षणात सतत नाविन्यपूर्ण बदल करीत आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षक म्हणून आपण सर्व स्वत:च्या कल्पकतेतून असे सुजाण आणि सक्षम भावी नागरिक घडविण्याचे काम आज अतिशय निष्ठापूर्वक करीत आहात. आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला विद्यार्थी ज्ञान, कौशल्ये, वृत्ती, इ. बाबतीत सक्षम व्हावा, व्यवसाय आणि जीवनात येणाऱ्या समस्यांना सक्षमपणे, सकारात्मक आणि आत्मविश्वासाने सामोरे जाऊन यशस्वी व्हावा व त्यासाठी आपल्या सभोवतालच्या परिसराशी त्यांच्या अनुभवांची घट्ट नाळ जोडावी आणि या मार्गे विद्यार्थ्यांचा स्व–विकास साधण्याकरिता, अभ्यासक्रमातील इतर विषयांप्रमाणेच, परिसर अभ्यास विषयाचे देखील विशेष महत्त्व आहे.

अभ्यासक्रमात इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत ‘परिसर अभ्यास’ विषय असून परिसर अभ्यास : भाग १ आणि परिसर अभ्यास : भाग २ असे भाग समाविष्ट आहेत. इयत्ता चौथीच्या परिसर अभ्यास या पाठ्यपुस्तकामध्ये विज्ञान, नागरिकशास्त्र आणि भूगोल या विषयांचे आशय असून त्यांची आंतरविद्याशाखीय दृष्टीने मांडणी करण्यात आलेली आहे. या विषयाच्या माध्यमातून मुलांना नैसर्गिक आणि सामाजिक पर्यावरणातील आंतरसंबंध ओळखणे व तो समजण्यास सक्षम बनविणे, नैसर्गिक विविधता व सामाजिक विविधता यांतील साधर्म्याची ओळख करून देणे अशा अपेक्षा NCF २००५ मध्ये उल्लेखिलेल्या आहेत. म्हणजेच या स्तरावरील अध्ययन हे प्रत्यक्ष पाहणे आणि अनुभव घेणे यांद्वारे मुलांच्या जाणण्याच्या क्षमतेचा आणि कल्पकतेचा विकास करणे तसेच विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षणात गुंतवून ठेवणाऱ्या कृती जसे– निरीक्षण, शोधक वृत्ती, संशोधन, विश्लेषण, चिकित्सक चिंतन इत्यादींचा विकास करणे ही शैक्षणिक उद्‌दिष्टे परिसर अभ्यासाच्या अध्ययनातून साध्य करणे आवश्यक आहे. यासाठी अध्ययन अनुभवांच्या रचनेतून मुलाला कुटुंबापासून परिसर ते पुढच्या व्यापक स्तरावरील जग या सामाजिक वास्तवाबाबत कुतूहल निर्माण करणे, आयुष्यातील विविध टप्प्यांवर शैक्षणिक आशयाची नाळ जोडणे, त्यांच्या जिज्ञासेला, सर्जनशीलतेला परिसराशी जोडत, पोषक अशा पद्‌धती व प्रक्रियांद्वारा त्यांना कसे प्राप्त करता येईल या दृष्टिकोनातून अध्ययन कृतींची रचना करावी. पूरक वातावरण निर्मितीद्वारे अपेक्षित उद्‌दिष्टे साध्य करावीत.

यावरून जागतिक स्तरावर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम घडवून आणणाऱ्या आपल्या प्रत्येकाच्या स्थानिक कृतींचा विचार केल्यास परिसर आणि त्यामधील प्रत्येक घटकांचे महत्त्व लक्षात येते.

वर्गाध्यापनात परिसरातील घटकांसंदर्भात अनुभवांची जोड दिल्यास त्या अनुभवांचे परीक्षण, विश्लेषण, त्याबाबत जाणीव, शोधातून शिकणे, पर्यावरण सुसंगत जीवनशैली स्वीकारणे आणि स्व– पर्यावरण, स्थानिक ते जागतिक परिस्थिती यांचा सुयोग्य मेळ साधणे या शैक्षणिक उद्दिष्ट प्राप्तीसाठी विविध कृती, उपक्रम राबविणे महत्त्वपूर्ण ठरते. अशा स्वरूपाच्या अनेक कृती या पुस्तिकेत सुचविण्यात आलेल्या आहेत. मुलांनी त्यांच्या कुतूहल, शोधक वृत्ती, सातत्यपूर्ण चौकसवृत्तीचा आनंद घेत परिसर अभ्यास या विषयातील आशय शिकण्यासाठी या दृष्टीने या पुस्तिकेतील कृतींचा त्याचबरोबर आपल्यातील नवनिर्मिती, कल्पकताद्वारे नाविन्यपूर्ण कृतींचीही यांस जोड देऊन आंतरराष्ट्रीय स्तरासाठी सक्षम असे विद्यार्थी घडवाल अशी आम्हांस खात्री आहे. या आनंददायी प्रवासासाठी आपणांस खूप शुभेच्छा...

■■■

## विषयाची उद्दिष्टे : प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ प्रमाणे

१) स्वत:ला जाणून घेऊन परिसराशी स्वत:चे असलेले नाते समजून घेण्याचा प्रयत्न करणे.

२) परिसराविषयी जिज्ञासा निर्माण करणे.

३) मानवा–मानवांतील तसेच मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्परावलंबित्व समजून घेण्यास मदत करणे.

४) नैसर्गिक, सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरण आणि समुचित विकास यांचा एकमेकांशी असणारा संबंध शोधण्यास व समजून घेण्यास मदत करणे.

५) नैसर्गिक साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर करून पर्यावरण संवर्धन करण्याची क्षमता विकसित करणे.

६) परिसरातील घटनांचे निरीक्षण करून सामाजिकरीत्या न्याय आणि शास्त्रीयदृष्ट्या अचूक अशा निष्कर्षाप्रत येण्यासाठी आवश्यक त्या कौशल्यांचा विकास करण्यास मदत करणे.

७) पर्यावरण समस्या व संकटाची ओळख, निवारण आणि प्रतिबंध यांसाठी सक्षम बनण्यास मदत करणे.

८) लोकशाही तत्त्वांना अनुसरून समाज आणि पर्यावरणसंबंधी प्रश्न सोडवण्यासाठी संवेदनशील, जबाबदार व कृतिशील असे नागरिकत्व जोपासणे.

९) प्रदेशांच्या अभ्यासातून प्रादेशिक भिन्नता समजून घेऊन एकात्मतेची भावना वाढीस लावणे.

१०) आधुनिक संपर्क साधने व माध्यमांच्या उपयुक्ततेचे ज्ञान आणि या साधनांनी विश्वबंधुत्व वाढण्यास कशी मदत होते याची जाणीव करून देणे.

■■■

## पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती

**घटक :** १) प्राण्यांचा जीवनक्रम | **अंदाजे तासिका :** ४

**उपघटक :** १) जीवनक्रम (प्राणी, पक्षी, कीटक)

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• रूपांतरण, अंडी उबविणे, कात, कोषावस्था (फक्त निरीक्षण)

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. जन्माच्या विविध पद्‌धती व त्यांचा जीवनक्रम स्पष्ट करणे.<br>२. सभोवतालच्या प्राण्यांच्या जीवनक्रमाचे निरीक्षण करणे. | १. अंडी घालणारे प्राणी शोधणे.<br>२. उबविणे या प्रकियेचे निरीक्षण करणे.<br>३. गोदाम किंवा अन्नधान्य साठविण्याच्या ठिकाणी कीटकांची अंडी असल्यास त्यांचे निरीक्षण करणे.<br>४. स्वत: फुलपाखरू आहे व इतर मुले त्रास देत आहेत याचा अभिनय करणे. | १. फुलपाखरांचा जीवनक्रम चित्रांच्या साहाय्याने तयार करणे.<br>२. ध्वनिचित्रफितीच्या साहाय्याने प्राण्यांचा जीवनक्रम मित्रांना समजावून सांगणे. | चित्ररेखाटन, स्वाध्याय, प्रकल्प, अभिव्यक्ती | मराठी | विकिपीडिया, ई–पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.०१<br>**मूल्ये :**<br>१. विविध प्राणी पक्षी व कीटक यांचा जीवनक्रम स्पष्ट करतात.<br>२. भोवतालच्या सजीवांच्या जीवनक्रमांचे निरीक्षण करतात. |

**घटक :** २) सजीवांचे परस्परांशी नाते **अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** १) सजीवांच्या गरजांची पूर्तता २) प्राण्यांचे उपयोग ३) परस्पर पूरक सहजीवन ४) ऋतूमानाप्रमाणे सजीवात होणारे बदल.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- वृक्षवासी, पालवी, परस्पर सहसंबंध

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. सजीवांच्या गरजा जेथे पूर्ण होतात. तेथेच ते राहतात. हे उदाहरणाद्‌वारे स्पष्ट करणे, प्राण्यांचे उपयोग समजून घेणे.<br>२. ऋतूमानाप्रमाणे सजीवात होणारे बदल समजून घेणे. | १. ग्रामीण व शहरी भागातील प्राण्यांच्या उपयोगाची चर्चा करा.<br>२. एकमेकांस मदत करणारे प्राणी व मदत यांचा चार्ट तयार करणे. | १. जंगलतोड झाली तर तेथील प्राण्यांच्या संख्येवर काय परिणाम होईल याचे वर्गात सादरीकरण व चर्चा करा.<br>२. ऋतूमानानुसार सभोवतालच्या प्राण्यांत होणाऱ्या बदलांची चर्चा करा. | चर्चा, प्रकल्प, निरीक्षण, नोंदी, सादरीकरण, संकलन | मराठी, भूगोल | विकिपीडिया, ई-पाठशाला दीक्षा ॲप | ०४.९५A.०३<br>**मूल्ये** :<br>१. कुटुंबातील सदस्यांप्रमाणे इतर सजीवां-बद्‌दल संवेदना बाळगतात.<br>२. सजीवांतील परस्पर संबंध समजून घेतात.<br>३. निसर्गात होणाऱ्या बदलाचे आपल्या जीवनाशी असलेले नाते समजून घेतात. |

**घटक :** ३) साठवण पाण्याची **अंदाजे तासिका :** ७

**उपघटक :** १) जुने जलसाठे (पारंपरिक पद्धती), नव्या व्यवस्था २) पाण्याचा काटकसरीने वापर.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- विहीर, किल्ल्यांवरचे तलाव व टाक्या, आड नदीवरील बंधारा, तलाव, धरण, विंधन विहिरी, जलसाठे

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पाणी कोठून मिळते हे स्पष्ट करणे.<br>२. पाणी साठविण्याच्या जुन्या व नव्या जलव्यवस्था सांगणे.<br>३. पाण्याचा काटकसरीने वापर करणे.<br>४. पाण्याच्या साठ्यांचे संवर्धन करण्यासाठी उपाय सांगणे. | १. विहीर, आड, विंधन विहीर यांना भेट देऊन यातील फरकाविषयी चर्चा करा.<br>२. बंधारे, तलाव व धरणे यातील फरकाविषयी चर्चा करा.<br>३. आठवडाभर नळाला पाणी आलेच नाही तर! चर्चा करा.<br>४. जलसाठ्यांचे संवर्धन करण्यासाठी काय करावे? | १. विहीर, आड, व धरण यांचे चित्र रेखाटन.<br>२. जुने जलसाठे पुनर्जिवित करण्यासाठी काय करता येईल? याकरिता वडिलधाऱ्यांशी चर्चा करणे. इंटरनेटवरील माहिती संकलन करणे. | तोंडीकाम, चित्र, रेखाटन, स्वाध्याय, प्रकल्प, निरीक्षण, सादरीकरण | **मराठी :** बोलणारी नदी, आम्ही सहलीला जातो, चवदार तळ्यातील पाणी या पाठातील उपक्रम.<br>**चित्रकला :** पाणी–साठ्यांचे चित्र रेखाटन. | विकिपीडिया, ई–पाठशाला दीक्षा ॲप | ०४.९५A.०५<br>**मूल्ये :**<br>१. स्रोतापासून ते घरापर्यंत जीवनावश्यक वस्तूंच्या निर्मिती आणि प्राप्तीची प्रक्रिया विषद करतात. |

**घटक :** ४) पिण्याचे पाणी | **अंदाजे तासिका :** ६

**उपघटक :** १) द्रावण २) तरंगणे ३) निवळणे ४) गढूळ पाणी ५) निर्धोक पाणी ६) सूक्ष्मजीव ७) पाण्याद्वारे होणारे आजार.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- काही पदार्थ पाण्यात विरघळतात तर काही विरघळत नाहीत.
- काही वस्तू पाण्यात तरंगतात तर काही पाण्यात बुडून तळाशी जमा होतात.
- तुरटी फिरविल्यास गढूळ पाणी स्वच्छ होते.
- आरोग्यासाठी निर्धोक पाणी गरजेचे आहे.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. विरघळणारे व न विरघळणारे पदार्थ यातील फरक स्पष्ट करणे.<br>२. द्रावणाचा अर्थ स्पष्ट करणे.<br>३. हलके व जड वस्तू तरंगण्यावरून स्पष्ट करणे.<br>४. पाणी निवळण्याची क्रिया प्रयोगातून स्पष्ट करणे.<br>५. निर्धोक पाण्याचा आरोग्याशी संबंध स्पष्ट करणे. | १. पाण्यात विरघळणारे व न विरघळणारे पदार्थ घेऊन प्रयोग-कृती करणे. चर्चा करणे.<br>२. पाण्यात मीठ, साखर सोडा यांसारखे पदार्थ मिसळून त्या पदार्थाची चव घेणे व बदललेल्या चवीविषयी चर्चा करणे.<br>३. पाण्यात तरंगणाऱ्या हलक्या व पाण्यात बुडणाऱ्या जड वस्तूंचे प्रयोगाद्वारे वर्गीकरण करणे.<br>४. तुरटीच्या साहाय्याने गढूळ पाणी निवळून स्वच्छ होते या कृती-विषयी चर्चा करणे. | १. इंटरनेटच्या साहाय्याने दूषित पिण्याच्या पाण्यामुळे होणारे आजार शोधणे.<br>२. निर्धोक पाणी मिळविण्याच्या विविध पद्धतींची माहिती मिळविणे. | निरीक्षण, तोंडीकाम, मुलाखत, उपक्रम, प्रकल्प, प्रात्यक्षिक, स्वाध्याय. | भूगोल | विकिपीडिया, ई-पाठशाला दीक्षा ॲप | ०३.९५A.०५<br>**मूल्ये :**<br>पाण्याची उपलब्धता आणि परिसरातील व घरातील पाण्याच्या उपयोगाचे वर्णन करू शकतात.<br>०४.९५A.०५<br>**मूल्ये :**<br>स्रोतापासून ते घरापर्यंत जीवनावश्यक वस्तूंच्या निर्मिती आणि प्राप्तीची प्रक्रिया विषद करतात. |

**घटक :** ५) घरोघरी पाणी

**अंदाजे तासिका :** ७

**उपघटक :** १) पाण्याची गरज २) पिण्याच्या पाण्याची काळजी ३) घरातील नळ व्यवस्था ४) गावातील पाणी पुरवठा ५) उंचावरील पाण्याच्या टाक्या ६) जलसाठ्यापासून घरापर्यंत पाण्याचा प्रवास

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- पाणी साठविण्याची भांडी व त्याचा वापर.
- शिळे पाणी
- उंच टाकीवरून इमारतीमधील सर्व भागात पाणी
- पाण्याचे स्रोत – तलाव, नद्या, धरणे, जल शुद्धीकरण योजना
- मानव जगण्यासाठी पाणी, पाण्याची काटकसर

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पिण्याचे पाणी निर्धोक ठेवण्यासाठी विशेष पाणी–साठवण भांडी वापरणे, चर्चा करणे<br>२. शिळे पाणी हा गैरसमज चर्चेतून दूर करणे.<br>३. घरातील नळ व्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट करणे. (पिण्याचे पाणी मिळविणे. हे श्रमाचे व खर्चाचे काम)<br>४. पाणी निर्धोक करण्याकरिता जलशुद्धी–करणाचे महत्त्व याविषयी चर्चा करणे.<br>५. पाण्याच्या काटकसरीची गरज स्पष्ट करणे. | १. पिण्याचे पाणी योग्य भांड्यात साठवले गेले नाही किंवा योग्य रीतीने झाकून ठेवले नाही तर काय होईल? चर्चा करणे.<br>२. घरातील व शाळेतील नळ व्यवस्थेमुळे वाचणारे श्रम याविषयी चर्चा करा. उदा. झाडांना नळीने पाणी देणे. | १. जलशुद्धीकरण केंद्रास भेट देणे.<br>२. संगणकावर गावातील पाणी पुरवठा योजनेचे रेखाटन करणे.<br>३. गावामध्ये होणारा पाण्याचा गैरवापर टाळण्याकरिता उपाय सांगणे.<br>४. जलशुद्धीकरण यंत्रणा दृक्श्राव्य माध्यमातून स्पष्ट करणे. | निरीक्षण, तोंडीकाम, मुलाखत, उपक्रम, प्रकल्प, प्रात्यक्षिक, स्वाध्याय | भूगोल, भूमिती, चित्रकला | विकिपीडिया<br>ई–पाठशाला<br>दीक्षा ॲप | ०३.९५A.०५<br>**मूल्ये :** पाण्याची उपलब्धता आणि परिसरातील व घरातील पाण्याच्या उपयोगाचे वर्णन करू शकतात.<br>०४.९५A.०५<br>**मूल्ये :** स्रोतापासून ते घरापर्यंत जीवनावश्यक वस्तूंच्या निर्मिती आणि प्राप्तीची प्रक्रिया विषद करतात. |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३. घरी, शाळेत पाण्याची काटकसर कशी करता येईल त्याविषयी चर्चा करणे.<br>४. पाणीपुरवठा योजनेचे कर्मचारी यांची मुलाखत. | | | | | |
| **घटक :** ६) अन्नातील विविधता **अंदाजे तासिका :** ६<br>**उपघटक :** १) प्रमुख अन्न पदार्थ २) अन्न पदार्थातील विविधता ३) अन्न पदार्थाची पौष्टिकता टिकविणे ४) विविध चवींचा आस्वाद.<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• बाजारातून आणलेले धान्य, भाजीपाला त्यापासून बनविलेले पदार्थ एकाच अन्नघटकापासून विविध अन्नपदार्थ बनविणे.<br>• प्रदेशानुसार खाद्यान्न पिके, ऋतूनुसार फळे व विविधता. • महाराष्ट्र व शेजारी राज्यातील प्रसिद्ध खाद्यपदार्थ. | | | | | | |
| १. धान्य व भाजीपाला यापासून विविध अन्नपदार्थ बनविता येतात हे स्पष्ट करणे.<br>२. अन्नपदार्थात विविधता असली तरीही त्यांतील मुख्य अन्नघटक समान असतात हे स्पष्ट करणे.<br>३. विविध प्रदेशातील वेगवेगळ्या अन्नपदार्थाची माहिती घेणे. | १. नकाशाच्या आधारे विविध ठिकाणी पिकाच्या तसेच खाद्यान्नाच्या उपलब्धतेनुसार आहारात पदार्थ कसे बदलतात याची चर्चा करणे.<br>२. अन्नघटकापासून तयार होणाऱ्या विविध अन्नपदार्थांची यादी बनविणे. | १. संगणकाचे साहाय्याने विविध प्रदेशातील अन्नपदार्थांची माहिती संकलित करणे.<br>२. दूरदर्शनवरील पर्यटनविषयक कार्यक्रम पाहणे.<br>३. पौष्टिक व जंकफूड याबाबत वर्गात चर्चा करणे. | निरीक्षण, तोंडीकाम, मुलाखत, उपक्रम, प्रात्यक्षिक, प्रकल्प, स्वाध्याय | भूगोल, चित्रकला, संगणक | विकिपीडिया, ई-पाठशाला दीक्षा ॲप | ०४.९५A.०५<br>**मूल्ये :** स्रोतापासून ते घरापर्यंत जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती आणि प्राप्तीची प्रक्रिया विषद करतात. |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. एखाद्या प्रदेशात एक अन्नघटक मुख्य असणे. किंवा प्रदेशानुसार मुख्य अन्नघटकात विविधता आढळण्याचे कारण शोधणे. | ३. विविध प्रदेशांत सण–उत्सव प्रसंगी केल्या जाणाऱ्या विविध पदार्थांची माहिती मिळविणे.<br>४. ऋतू आणि आरोग्य यांनुसार खाद्यपदार्थ ओळखणे उदा. मकर संक्रांतीला तिळाचे खाद्यपदार्थ (हिवाळा).<br>५. अन्नपदार्थांच्या विविधतेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी घरचे डबे आणून एकत्र जेवणे (उपक्रम) सहभोजन, फूड स्टॉल उपक्रम. | ४. नकाशा वापरून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांतील रोजच्या जेवणातील पदार्थांच्या ताटाचे चित्र (संगणकावर) दाखवून चर्चा करणे. | | | | |

**घटक :** ७) आहाराची पौष्टिकता **अंदाजे तासिका :** ६

**उपघटक :** १) प्रमुख अन्न पदार्थ २) अन्न पदार्थातील विविधता ३) अन्नपदार्थांची पौष्टिकता टिकविणे ४) विविध चवींचा आस्वाद

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- जेवणातील अन्नपदार्थ
- विविध अन्नपदार्थ
- शरीराच्या गरजा पूर्ण करणारे अन्नघटक
- अन्न शिजविणे
- अन्नाची पौष्टिकता वाढविणे.
- जिभेवरील रुचीकलीकेच्या मदतीने चव ओळखणे.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. अन्नपदार्थ तयार करताना उपयुक्त ठरणारे अन्नघटक नष्ट न होऊ देणे.<br>२. अन्नपदार्थापासून आहाराची पौष्टिकता वाढविणे.<br>३. विविध चवींची मजा घेऊन आरोग्य जोपासणे. | १. अन्न शिजविण्याच्या विविध पद्धतींविषयी चर्चा करणे.<br>२. अन्नातील पोषणतत्त्वे कमी होऊ नये याकरिता स्वयंपाक करताना आई कोणती काळजी घेते. त्याविषयी चर्चा करणे.<br>३. शालेय पोषण आहारातील साप्ताहिक मेनूविषयी चर्चा करणे.<br>४. शालेय पोषण आहार शिजविणाऱ्यांशी चर्चा/मुलाखत घेणे.<br>५. सलाद सजावट स्पर्धा घेणे.<br>६. सलाद/उसळ बनविण्याची कृती/ प्रात्यक्षिक घेणे. | १. आईच्या मदतीने अन्न शिजवून निरीक्षण करणे.<br>२. इंटरनेट (आंतरजाल) चे सहाय्याने विविध पौष्टिक अन्नपदार्थाची माहिती मिळविणे.<br>३. जिभेच्या कोणत्या भागावर विविध चवी समजतात? त्याविषयी खेळ घेणे.<br>४. डोळे बंद करून चवीनुसार मुद्राभिनय करून पदार्थ ओळखणे. | निरीक्षण, तोंडीकाम, मुलाखत, उपक्रम, प्रात्यक्षिक, स्वाध्याय | भूगोल | विकिपीडिया<br>ई-पाठशाला<br>दीक्षा ॲप | ०४.९५A.०५<br>**मूल्ये :** स्रोतापासून ते घरापर्यंत जीवनावश्यक वस्तूंच्या निर्मिती आणि प्राप्तीची प्रक्रिया विषद करतात. |

**घटक :** ८) मोलाचे अन्न **अंदाजे तासिका :** ५

**उपघटक :** १) भाकरीची गोष्ट (बिजारोपणापासून तर ताटाकडे अन्नाचा प्रवास)

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- शेतीची मशागत
- पेरणी
- आंतर मशागत
- कापणी
- मळणी
- उफणणी
- धान्य विक्री
- इतर अन्नपदार्थ

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. अन्नपदार्थ कशापासून तयार होतात? ते स्पष्ट करणे.<br>२. अन्ननिर्मितीमधील विविध टप्पे स्पष्ट करणे.<br>३. अन्न ताटात येण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या विविध टप्प्यांवरील कष्टांची जाणीव करून देणे.<br>४. इतर अन्नपदार्थांची माहिती देणे. | १. शेतीकामाबद्‌दल चर्चा करणे.<br>२. शेतकरी दाम्पत्याला वर्गात सन्मानाने बोलावून शेतीविषयी चर्चा करणे/मुलाखत घेणे.<br>३. शेतावर क्षेत्रभेट घेणे/ शेतमजुरांशी चर्चा करणे.<br>४. इतर अन्नपदार्थांकरिता पूरक व्यवसायाची माहिती देणे.<br>उदा. कुक्कुटपालन. | १. शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञान याविषयी इंटरनेटवरून माहिती घेणे.<br>२. शेतीपूरक व्यवसायाची माहिती गोळा करणे.<br>३. 'ताटातल्या पदार्थाचा उलटा प्रवास' लेखन किंवा चित्रांकन करणे. | निरीक्षण, तोंडीकाम, मुलाखत, उपक्रम, प्रात्यक्षिक, स्वाध्याय | भूगोल, कार्यानुभव | विकिपीडिया, ई-पाठशाला, दीक्षा ॲप | ४.९५A.०४<br>**मूल्ये :**<br>दैनंदिन जीवनातील कौशल्याधारित कामे (शेती),त्यांचा वडीलधाऱ्यांकडून मिळणारा वारसा व प्रशिक्षण संस्थांची भूमिका यांचे वर्णन करतात.<br>०४.९५A.०५<br>**मूल्ये :**<br>स्रोतापासून ते घरापर्यंत जीवनावश्यक वस्तूंच्या निर्मितीची व प्राप्तीची प्रक्रिया विषद करतात. |

**घटक :** ९) हवा — **अंदाजे तासिका : २**

**उपघटक :** १) वातावरण २) हवेचे घटक ३) हवेचे गुणधर्म.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • ऑक्सिजन • नायट्रोजन • हवा एक मिश्रण

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. वातावरण ही संकल्पना स्पष्ट करणे.<br>२. हवेचे घटक कोणते आहेत ते समजून घेणे, प्रयोगाद्वारे हवेचे गुणधर्म समजून घेणे. | १. वातावरणाचे महत्त्व इंटरनेटच्या साहाय्याने समजून घेणे. | १. हवा मिश्रण आहे. हे तुमच्या मित्राला उदाहरण देऊन समजावून सांगणे. | प्रयोग, निरीक्षण, भेद करणे, चर्चा व सादरीकरण. | भूगोल | विकिपीडिया, ई-पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.०३,१२<br>**मूल्ये :**<br>१. वातावरण ही संकल्पना स्पष्ट करतात.<br>२. हवेचे गुणधर्म प्रयोगाद्वारे समजून घेतात. |

**घटक :** १०) वस्त्र — **अंदाजे तासिका : ८**

**उपघटक :** १) कापडाची रचना, कापड तयार करण्याचे घटक २) कापडाचे विविध नमुने ३) कपडे धुण्यासाठी नैसर्गिक व आधुनिक साधने ४) कपड्याचा पुनर्वापर ५) वस्त्रामधील विविधता.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- सूत
- सुती कपडे
- नायलॉन
- रेयॉन
- लोकर
- नैसर्गिक साधने
- पुनर्वापर
- भौगोलिक कारणे
- सांस्कृतिक कारणे

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे | घटकावर आधारित सूचक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. वस्त्रनिर्मितीची प्रक्रिया समजणे.<br>२. वस्त्राची निगा व स्वच्छता कशी करावी हे सांगणे. | १. आपल्या परिसरातील शिंप्याच्या दुकानात जाऊन विविध कपड्यांची चर्चा करणे. | १. घोंगडी, सतरंजी, स्वेटर बनविणाऱ्यांना भेट द्या व या वस्तू तयार करण्याची प्रक्रिया समजून घ्या. | तोंडी काम, मुलाखत, स्वाध्याय, प्रकल्प लेखन, | चित्रकला, कार्यानुभव, भूगोल. | विकिपीडिया, ई-पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.०५<br>**मूल्ये :**<br>स्रोतापासून ते घरापर्यंत जीवनावश्यक |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. कपड्याचा पुनर्वापर करण्याविषयी उदाहरणासह सांगणे.<br>४. कपड्यांच्या विविधतेमागील भौगोलिक व सांस्कृतिक कारणे स्पष्ट करणे. | २. जुन्या कापडापासून विविध वस्तूंची निर्मिती करणे.<br>३. भारतातील विविध पोशाखांची चित्रे जमा करा व यातील फरकाची कारणे सांगणे. | २. कपडे स्वच्छ करण्याच्या आधुनिक व पारंपरिक पद्धतींची माहिती मिळवा. | निरीक्षण, सादरीकरण. | | विकिपीडिया, ई–पाठशाला, दीक्षा ॲप | वस्तूंचा निर्मिती आणि प्राप्तीची प्रक्रिया विषद करतात. ०४.९५A.१८<br>**मूल्ये :** भौगोलिक व सांस्कृतिक कारणांमुळे वस्त्रा–मधील विविधता सांगतात. |
| **घटक :** ११) पाहू तरी शरीराच्या आत. **अंदाजे तासिका : ३**<br>**उपघटक :** १) आंतरेंद्रिय – फुप्फुस, ग्रासनलिका २) बाह्येंद्रिय – बाह्येंद्रिय (स्थूल ओळख व रचना)<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• हृदयाचे आकुंचन व शिथिलीकरण • प्रत्येक इंद्रियांच्या संरक्षणासाठी निर्गता • शरीरातच असलेल्या विशिष्ट रचना | | | | | | |
| १. आंतरेंद्रिय व बाह्येंद्रिय यांची ओळख करून घेणे.<br>२. प्रत्येक इंद्रियासाठी शरीरात पोकळ्या असतात हे समजून घेणे.<br>३. थंड व गरम पदार्थ खाऊन त्याचा घसा ते पोट प्रवास अनुभवणे. | १. अवयव व त्यांची कार्य समजून घेणे.<br>२. झोपलेल्या प्राण्यांच्या श्वासोच्छ्वासामुळे होणाऱ्या हालचालींचे निरीक्षण करणे. | १. प्रत्येक अवयवाचे महत्त्व सांगा.<br>२. आंतर व बाह्य अवयवांचे वर्णन चार्ट किंवा मॉडेलच्या मदतीने करा.<br>३. स्टेथोस्कोपचा वापर करणे. | कृती, प्रयोग, निरीक्षण | भाषा | विकिपीडिया, ई–पाठशाला दीक्षा ॲप | ०४.९५A.०३<br>**मूल्ये :**<br>१. विविध इंद्रियांचे स्थान अनुभव व खेळाद्वारे समजून घेतात.<br>२. विविध इंद्रियांचे कार्य समजून घेतात. |

**घटक :** १२) छोटे आजार घरगुती उपाय — **अंदाजे तासिका :** २

**उपघटक :** १) आजारपण २) घरगुती उपचार.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- छोटा आजार
- योग्य व अयोग्य कृती
- वैद्यकीय सेवा.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. आजार म्हणजे काय ते स्पष्ट करणे.<br>२. छोटे आजार झाल्यानंतर कोणत्या कृती योग्य व कोणत्या अयोग्य ते ठरविण्यास मदत करणे.<br>३. घरगुती उपचाराच्या मर्यादा समजून घेणे. | १. शिक्षकांच्या मदतीने रोग व त्यांची लक्षणे यांची यादी तयार करा.<br>२. काही कृती देऊन छोटे आजार झाल्यानंतर काय केल्यास बरे वाटेल याबाबत चर्चा करा. | १. प्राथमिक आरोग्य केंद्रात भेट देऊन अधिक माहिती घेणे.<br>२. प्रथमोपचार पेटी तयार करणे.<br>३. आजारी व्यक्ती किंवा वृद्ध यांची मुलाखत घेणे. | क्षेत्रभेट,<br>प्रकल्प,<br>निरीक्षण,<br>चर्चा,<br>निबंध लेखन | भूगोल | विकिपीडिया,<br>ई–पाठशाला,<br>दीक्षा ॲप<br>विकिपीडिया,<br>ई–पाठशाला,<br>दीक्षा ॲप | ०४.९५A.१३<br>**मूल्ये :**<br>१. आजारी व्यक्ती व वृद्धांबद्दल सहानुभूती दाखवितात.<br>२. दैनंदिन जीवनातील वैद्यकीय सेवेचे महत्त्व जाणतात.<br>३. घरगुती उपचाराच्या मर्यादा समजून घेऊन अवैज्ञानिक कृती टाळतात. |

**घटक :** १३) दिशा व नकाशा **अंदाजे तासिका :** ७

**उपघटक :** १) मुख्य दिशा २) दिशाचक्र ३) प्रमाणबद्धता ४) नकाशातील अंतर व जमिनीवरील अंतर या संबंधी जाणून घेणे.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- उपदिशा
- प्रमाण
- प्रमाणबद्धता

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. मुख्य व उपदिशा ओळखता येणे.<br>२. दिशाचक्राचा वापर करता येणे.<br>३. नकाशाची प्रमाणबद्धता समजणे.<br>४. नकाशातील अंतर व जमिनीवरील अंतर या संबंधी जाणून घेणे.<br>५. नकाशा वाचनात दिशा व प्रमाण यांचा वापर करता येणे. | १. दिशाचक्राचा वापर करून वर्गातील शाळेच्या सभो–वतालच्या परिसरातील बाबींची नोंद करणे.<br>२. दिशाचक्रानुसार आपले गाव, तालुका, जिल्हा, राज्य व देश या संदर्भाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या. | १. संपूर्ण शाळेचा परिसर मोजून योग्य प्रमाण घेऊन दिशा चक्राचा वापर करून शाळेचा नकाशा तयार करा.<br>२. गावातील/परिसरातील महत्त्वाची ठिकाणे घेऊन दिशा चक्रानुसार व प्रमाण यानुसार नकाशा तयार करा.<br>३. गावाचा/परिसराचा गुगल नकाशा काढा व त्याचा स्क्रीनशॉट घेऊन त्यातील प्रमाण व प्रत्यक्ष अंतर पहा. | तोंडीकाम, स्वाध्याय, प्रकल्प, निरीक्षण | मराठी, परिसर अभ्यास, गणित, कला, कार्यानुभव | विकिपीडिया, ई–पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.१०<br>**मूल्ये :**<br>नकाशाचा वापर करून स्थान, ठिकाणे ओळखणे. |

**घटक :** १४) नकाशा आणि खुणा **अंदाजे तासिका :** ८

**उपघटक :** १) चित्र आराखडा व नकाशा यातील फरक २) विशिष्ट खुणा व त्यांचा अर्थ.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• आराखडा • नकाशा • शीर्षक • प्रमाण • सूची • खुणा.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. आपल्या परिसरातील नैसर्गिक व मानवनिर्मित गोष्टी ओळखतो.<br>२. नकाशातील नैसर्गिक व मानवनिर्मित गोष्टी सांगणे.<br>३. चित्र आराखडा व नकाशा यातील तुलनात्मक फरक सांगणे.<br>४. नकाशा वाचन खुणांच्या अर्थाने करतो.<br>५. नकाशा तयार करताना विशिष्ट खुणांचा वापर करतो. | १. नकाशा आराखड्यात माहिती भरण्यास सांगा व सूची तयार करा.<br>२. जिल्हा, राज्य, देश अशा विविध नकाशाचा वापर करून नकाशा वाचन करा. | १. आपल्या शाळेचा/ परिसराचा/गावाचा नकाशा तयार करा व त्याचे गटात सादरीकरण करा. | तोंडी,<br>प्रकल्प,<br>निरीक्षण,<br>सादरीकरण | परिसर भाग २,<br>कला,<br>कार्यानुभव | विकिपीडिया,<br>ई–पाठशाला,<br>दीक्षा ॲप | ०४.९५A.१०<br>**मूल्ये :**<br>नकाशाचा वापर करून ठिकाणे स्थान यांच्या खुणा ओळखतो.<br>०४.९५A.१६<br>**मूल्ये :**<br>नकाशातील चिन्हे, खुणा व सूची यांचा वापर करून नकाशाचे वाचन करतात. |

**घटक :** १५) माझा जिल्हा, माझे राज्य **अंदाजे तासिका :** १२

**उपघटक :** १) गाव, तालुका, जिल्हा व राज्य निर्मिती स्वरूप २) महाराष्ट्र : प्राकृतिक ३) महाराष्ट्र पर्जन्यमान ४) महाराष्ट्र : मुख्य पिके ५) महाराष्ट्र : प्रमुख फळे व व्यापारी पिके ६) महाराष्ट्र : प्रशासकीय विभाग ७) भाषा व बोली भाषा ८) महाराष्ट्रातील सण व उत्सव.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• गाव • तालुका • जिल्हा • राज्य • प्राकृतिक • पर्जन्यमान • व्यापारी पिके • प्रशासकीय विभाग • राज्य भाषा • बोली भाषा

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. गाव ते राज्य अशी मांडणी झाडाच्या संकल्पनेतून करणे.<br>२. विविध प्रकारच्या नकाशाचे वाचन करणे.<br>३. दोन वेगवेगळ्या नकाशातील माहितीचा उपयोग करून सहसंबंध सांगणे.<br>४. राज्य भाषा व बोलीभाषा यातील फरक स्पष्ट करणे.<br>५. महाराष्ट्रातील विविध सण, उत्सव व परंपरा यांविषयी माहिती सांगणे. | १. आपल्या वहीत आपले गाव ते राज्य अशी नकाशा साखळी तयार करा.<br>२. महाराष्ट्र राज्य नकाशा आराखड्यातील सर्व जिल्हे ओळखणे.<br>३. महाराष्ट्रातील प्राकृतिक घटक नकाशात दाखवा.<br>४. महाराष्ट्रातील पाऊस व पिके यांचा नकाशा एकत्रित करा.<br>५. महाराष्ट्र राज्य नकाशात प्रशासकीय विभाग रंगवा. | १. बोलीभाषा विषयाची माहिती जमा करणे व त्या भाषेतील एखादी कविता, गाणे वर्गात सादर करणे.<br>२. सण व उत्सव यांच्या विषयाची सचित्र माहिती जमा करून सादर करणे. | निरीक्षण, तोंडीकाम, प्रकल्प, स्वाध्याय | भाषा, इतिहास, कला | विकिपीडिया, ई–पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.१०<br>**मूल्ये :** नकाशाचा वापर करून वस्तू/ ठिकाणे ओळखणे.<br>04.95A.1 7 आपला जिल्हा व राज्य यांची प्राकृतिक व मानवनिर्मित या अनुषंगाने तुलना करतो. |

**घटक :** १६) दिवस आणि रात्र | **अंदाजे तासिका :** ५

**उपघटक :** १) पृथ्वीचे परिवलन २) दिवस व रात्र ३) लहान व मोठा दिवस

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- परिवलन • दिवस • रात्र • सूर्योदय • ऋतू

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. दिवस व रात्र का होतात हे स्पष्ट करणे.<br>२. दिवस व रात्र यांतील कालावधीच्या फरकावरून लहान–मोठा दिवस स्पष्ट करणे<br>३. दिवस लहान–मोठा होत जाणे याचा संबंध ऋतू बदलाशी लावणे. | १. जुलैपासून मार्चपर्यंत प्रत्येक महिन्याच्या काही तारखांना सूर्योदय व सूर्यास्त यांच्या नोंदी घेणे. | १. दररोज सकाळी, दुपारी, संध्याकाळी ठराविक वेळी आपल्या स्वतःच्या सावलीचे निरीक्षण करणे. | निरीक्षण,<br>तोंडीकाम,<br>प्रकल्प,<br>स्वाध्याय | गणित,<br>कला | विकिपीडिया,<br>ई–पाठशाला,<br>दीक्षा ॲप | ०४.९५A.०९<br>**मूल्ये :**<br>निरीक्षण/ अनुभव यावरून विभिन्न प्रकारची नोंद ठेवतात. विविध घटनांच्या आकृतिबंधाचे अंदाज देण्यासाठी कारण व परिणाम यांच्यातील संबंध प्रस्थापित करतात. |

**घटक :** १७) माझी जडणघडण — **अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** १) जडणघडण म्हणजे काय? २) अनौपचारिक शिक्षण ३) निरीक्षण व शिक्षण ४) समाज व शिक्षण

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- कुटुंब व शेजारी यांचा जडण–घडणीत सहभाग, सहकार्य व संस्कार

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. आपल्या जडणघडणीत कुटुंबाचा सहभाग समजून घेणे.<br>२. सहकार्य भावना या मूल्याचे महत्त्व व परिणाम स्पष्ट करणे.<br>३. समाज शिक्षणाची उपयुक्तता. | १. परस्पर सहकार्य यासंबंधी नाट्यीकरण.<br>**उपक्रम –**<br>नातेवाईक किंवा नातेवाईकांकडून सुट्टीत काही तरी नवीन शिकणे. | १. मानवाच्या जडणघडणीच्या कथा वाचणे. | दैनंदिन निरीक्षण, तोंडीकाम | भाषा | विकिपीडिया, ई–पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.०२ |

**घटक :** १८) कुटुंब आणि शेजाऱ्यांमध्ये होत असलेले बदल — **अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** १) कुटुंबाचे बदलत जाणारे स्वरूप, कारणे – स्थलांतर २) आपला शेजार व आनंददायी समूहजीवन.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- संयुक्त कुटुंब म्हणजे काय?
- समूहजीवनाची आवश्यकता

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे | घटकावर आधारित सूचक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम | मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. कुटुंबाचे बदलते स्वरूप समजून घेणे.<br>२. समूह भावना व परस्पर सहकार्य यांचे महत्त्व जाणून घेणे. | १. दहा वर्षानंतर तुमचे कुटुंब आणि शेजार कसा असेल याविषयी कल्पना विस्तार करणे.<br>२. शेजारच्या पाच कुटुंबाची माहिती संकलित करणे, | १. मुलांनी पालकांच्या मदतीने आपल्या कुटुंबाची वंशावळ तयार करणे. | दैनंदिन निरीक्षण, माहिती संकलन, प्रकल्प | भाषा | विकिपीडिया/ ई–पाठशाला/ दीक्षा ॲप | ०४.९५A.०३ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| | यात मूळ, गाव, राज्य, भाषा, सण उत्सव, खाद्यपदार्थ, व्यवसाय यांचा समावेश असावा. | | | | | |
| **घटक :** १९) माझी आनंददायी शाळा **अंदाजे तासिका :** ४<br>**उपघटक :** १) शाळा व शिक्षण २) एकमेकांना मदत करणे ३) शिक्षणाचा अधिकार ४) मुलींचे शिक्षण ५) वर्गमित्रांची मातृभाषा<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• आपल्या शिक्षणात शाळा व शिक्षकांची भूमिका • एकमेकांच्या गरजा व अडचणी समजून घेणे. | | | | | | |
| १. औपचारिक शिक्षणात शाळा व शिक्षक यांचे योगदान.<br>२. विविध समूहाच्या गरजा समजून घेणे.<br>३. सहकार्य भावना<br>४. विविध भाषांची ओळख.<br>५. आनंददायी शिक्षणातील टप्पे | १. गटचर्चा या माध्यमातून विविध भाषा व संस्कृतीची ओळख. | १. विविध सांघिक खेळांच्या माध्यमातून समूह भावना व एकमेकांना मदत करण्याची सवय वाढीस लावणे. | दैनंदिन निरीक्षण, गटकार्य, प्रश्नावली सोडविणे. | भाषा | विकिपीडिया, ई–पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.१२ |

**घटक :** २०) माझी जबाबदारी आणि संवेदनशीलता **अंदाजे तासिका : ४**

**उपघटक :** १) आजी आजोबा यांना मदत करणे २) विशेष गरजा असलेल्या व्यक्तींविषयी जबाबदारी ३) ब्रेल लिपीची ओळख.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- समाजात व कुटुंबात वावरत असताना ज्येष्ठांना सहकार्य करणे अपेक्षित.
- विशेष गरजा असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत सहकार्याची भावना व संवेदनशीलता आवश्यक.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. मुलांमध्ये ज्येष्ठांविषयी आपुलकी व आदराची भावना वाढीस लावणे.<br>२. विशेष गरजा असलेल्या सहकाऱ्यांबाबत सहकार्य करणे. | १. वृद्धाश्रमास भेट देऊन तेथील आजी-आजोबांशी संवाद साधणे.<br>२. विशेष गरजा असलेल्या मुलांशी संवाद साधून, त्यांच्या गरजा लक्षात घेणे. | १. कुटुंब व्यवस्थेतील बदलाची जाणीव करून देणे.<br>२. विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांची ओळख करून देणे. | दैनंदिन निरीक्षण, गटकार्य, प्रश्नावली सोडविणे. | भाषा | विकिपीडिया, ई-पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.१४ |

**घटक :** २१) समूह जीवनासाठी व्यवस्थापन **अंदाजे तासिका : ४**

**उपघटक :** १) व्यवस्थापन म्हणजे काय? २) नियोजनाची आवश्यकता ३) नियम का असावेत? ४) शाळा व्यवस्थापन समिती ५) स्थानिक शासन संस्थांची ओळख.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- व्यवस्थापन का व कुठे?
- कुटुंबातील व्यवस्थापन
- शाळेतील कार्यक्रमांचे नियोजन

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे | घटकावर आधारित सूचक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. क्षेत्रभेट<br>२. मुलाखत | १. ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन तेथील कामाचे स्वरूप समजून घेणे.<br>२. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांची मुलाखत घेणे. | १. एखाद्या कंपनी व्यवस्थापकाची भेट घेऊन अधिक माहिती जाणून घेणे. | दैनंदिन निरीक्षण, गटकार्य, अहवाल लेखन | भाषा | विकिपीडिया, ई-पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.१२ |

**घटक :** २२) वाहतूक व संदेशवहन — **अंदाजे तासिका :** ८

**उपघटक :** १) वाहतुकीची साधने २) चाकाचा शोध ३) संदेशवहन साधने ४) मनोरंजनाचे कार्यक्रम

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- वाहतूक
- वाहतूक साधने
- संदेशवहन
- चाकाचा शोध
- जलमार्ग
- मनोरंजनाची साधने

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. वेगवेगळ्या काळातील वाहतूक साधनांची तुलना सांगणे.<br>२. चाकाच्या शोधाचे महत्त्व विशद करणे.<br>३. संदेशवहनाची विविध साधने सांगणे.<br>४. संदेशवहनाची आधुनिक साधने व पूर्वीची साधने यांची तुलना करणे.<br>५. मनोरंजनाची स्थानिक व प्रक्षेपित साधने समजून घेणे. | १. आधुनिक व पूर्वीच्या वाहतूक व संदेशवहनाच्या साधनांची माहिती गोळा करा व वर्गात चर्चा करा.<br>२. काही प्राणी व पक्षी यांच्या हालचालींवरून एखाद्या घटनेचा बोध याविषयी वडीलधाऱ्यांशी चर्चा करा. | १. वाहतूक व संदेशवहन साधनांची चित्रे काढा.<br>२. स्थानिक कलावंताची मुलाखत घेणे.<br>३. प्रक्षेपित माध्यमांची ओळख व फायदे आणि मर्यादा याविषयी चर्चा करा. | निरीक्षण, तोंडीकाम, प्रकल्प, स्वाध्याय | मराठी, कला | विकिपीडिया, ई–पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.०६<br>**मूल्ये :** भूतकाळातील आणि सध्याच्या काळातील साधनांमधील फरक सांगतात. |

**घटक :** २३) नैसर्गिक आपत्ती **अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** आपत्ती, अवकाळी पाऊस, पूर, भूकंप, त्सुनामी

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- वळीव
- प्रशिक्षित वर्ग आपत्तीच्या वेळी घ्यावयाची काळजी.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. नैसर्गिक आपत्तीचे परिणाम स्पष्ट करणे.<br>२. आपत्ती वेळी घ्यावयाची काळजी समजून घेणे. | १. संभाव्य नैसर्गिक आपत्ती काळात लागणाऱ्या तातडीच्या कमी गरजेच्या वस्तूंची, खाद्यपदार्थांची व दक्षतेची यादी करा. | १. गटचर्चेसाठी नैसर्गिक आपत्तीनुसार परिणामाच्या सादरीकरणाची संधी द्या.<br>२. आपत्ती व त्यांचे परिणाम यासंबंधी वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांचा संग्रह करा.<br>३. आपत्तीप्रसंगी करावयाच्या अभिरूप (Mockdrill) कवायत करा.<br>४. हवामानाचे अंदाजपत्रक ऐकून त्यांच्या नोंदी करा. | सादरीकरण, कृती चर्चा, अभिरूप, कवायत | भूगोल | विकिपीडिया, ई-पाठशाला, दीक्षा ॲप | ०४.९५A.०३.१२<br>**मूल्ये :**<br>१. नैसर्गिक आपत्ती म्हणजे काय हे सांगतात.<br>२. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी घ्यावयाची काळजी समजून घेतात.<br>३. अभिरूप कवायतीद्वारे उपयोजन करतात. |

**घटक :** २४) आपण परिसर धोक्यात आणत आहोत का? **अंदाजे तासिका :** ८

**उपघटक :** १) शहर, गाव यांतील फरक २) इंधन वाहने व पूर्वीची वाहने यांतील फरक ३) नवीन बांधकामामुळे परिसरात होणारे बदल व त्याचा परिणाम ४) लोकसंख्या वाढीचा परिणाम ५) सजीव सृष्टीवर झालेले वाईट परिणाम ६) शेती व शेतीला पाणी देण्याच्या पद्धती व त्याचा परिणाम.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- खनिज तेल
- संशोधन
- मानवी जीवन सुलभ व समृद्ध
- सजीव सृष्टी, लोकसंख्या वाढ
- कूपनलिका, दुबार व तिबार पिके
- रहाटगाडे
- मोट
- तांत्रिक पंप

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. शहर, गाव व जंगल यांची तुलना करणे.<br>२. पूर्वीची वाहने व आधुनिक वाहने यांतील फरक सांगणे.<br>३. परिसरातील नवीन बांधकामामुळे होणारे परिणाम स्पष्ट करणे.<br>४. सजीव सृष्टीवर होणारे वाईट परिणाम सांगणे.<br>५. पाण्याचे महत्त्व सांगणे.<br>६. शेतीतील बदल व त्याचे परिणाम सांगणे.<br>७. आपल्या गरजा परिसरातून भागतात त्यामुळे परिसराचे नुकसान होणार नाही यासाठीचे उपाय सांगणे. | १. परिसरातील होणाऱ्या बदला–विषयीची माहिती, निरीक्षण व नोंदी घेणे.<br>२. आपल्या घरात परिवाराचा पूर्वीचा फोटो व आताचा फोटो समोर ठेवून त्यांतील बदल नोंदवा.<br>३. आपल्या परिसरातील समस्या कोणत्या त्याची कारणे काय व त्यावर उपाय सुचवा. | १. पूर्वीची व आधुनिक वाहनाची चित्रे जमवा व माहिती लिहा.<br>२. शेतीला पाणी देण्याच्या पूर्वीच्या व आधुनिक पद्धतींची सचित्र माहिती गोळा करा.<br>३. पर्यावरण रक्षणासाठीचे घोषवाक्य तयार करा. | निरीक्षण, तोंडीकाम, चित्र रेखाटन, स्वाध्याय, प्रकल्प, लेखन, सादरीकरण इत्यादी. | मराठी, कला, | दीक्षा ॲप, इंटरनेट | ४.९५A.०९ |

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय – परिसर अभ्यास : भाग २

### संवाद शिक्षक मित्रांशी

आपण परिसर अभ्यास या विषयाबाबत अधिक विस्ताराने जाणून घेण्याचा प्रयत्न करू या. यापूर्वीच्या अभ्यासक्रमाच्या रचनेत इतिहास, भूगोल, विज्ञान असे विषय इयत्ता तिसरीपासूनच स्वतंत्रपणे शिकविले जात असत, परंतु राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० मध्ये सुचविल्यानुसार, इतिहास, भूगोल, विज्ञान, नागरिकशास्त्र आणि पर्यावरण हे विषय एकात्मिक पद्धतीने (Thematic Approach) परिसर अभ्यास या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत येतील. या नवीन आराखड्यानुसार, जीवनाभिमुख व संस्कृतीसापेक्ष शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणे अपेक्षित आहे. विद्यार्थी ज्ञाननिर्माता (Constructor of Knowledge) व्हावा आणि त्याला पोषक भूमिका शिक्षकांची (Facilitator) असावी, अशी अपेक्षा आहे. परिसर अभ्यासामधील सामाजिक शास्त्रांचा अभ्यासक्रम विकसित करताना विषयनिष्ठ दृष्टिकोन महत्त्वाचा मानला आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या वाटा स्वतः शोधण्यास शिक्षकांनी उत्तेजन द्यावे, ज्ञाननिर्मितीस पोषक असे अध्ययन वातावरण वर्गात निर्माण करावे, सुयोग्य आणि विविध आंतरक्रिया वर्गात आयोजित कराव्यात अशी अपेक्षा आहे. पाठ्यपुस्तकात, विविध आंतरक्रिया आणि उपक्रम सुचविलेले आहेत. पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊनही शिक्षकांनी विपुल वर्ग आंतरक्रिया आयोजित कराव्यात.

इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांची उद्दिष्ट्ये ध्यानात घेऊन दैनंदिन अध्ययन–अध्यापन कार्य आयोजित करावे. या विषयातून गाभाघटक, मूल्ये, एकविसाव्या सहस्रकांची कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवता येतात. इतिहास–नागरिकशास्त्र केवळ यांत्रिकपणे पाठांतर करण्याचे विषय नव्हेत, तर भविष्यातील सुजाण नागरिक घडविणारी ही एक कार्यशाळा आहे. इतिहासाद्वारे भूतकाळातील घडामोडींची माहिती जसे होणे अपेक्षित आहे, तसेच ऐतिहासिक परिभाषेचा तात्त्विक बोध होणे, त्या माहितीच्या आधारावर वर्तमानाचे अधिक चांगले आकलन होणे व भविष्याला योग्य आकार मिळणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे नागरिकशास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नागरी जाणिवा (Civic Sense), सामाजिक कर्तव्यभावना (Sense of Social Responsibility) तसेच सामाजिक बांधिलकी (Social Commitment) विकसित होणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमात सूत्रबद्ध रितीने दिलेले जे घटक आहेत, त्यात जो खोल अर्थ दडला आहे, ते पाठ्यपुस्तक, अध्ययन–अध्यापनीय आंतरक्रिया आणि मूल्यामापनयांद्वारे उलगडले जावेत.

इतिहास–नागरिकशास्त्र यांच्या पाठ्यमुद्द्यातून पर्यावरण शिक्षणांविषयी जाणीवजागृती करणे अपेक्षित आहे. यापूर्वी व्यक्त झालेल्या चांगल्या कल्पना आणि विचार अमलात आणायचे झाल्यास काही महत्त्वाच्या गोष्टींकडे आपल्याला लक्ष पुरवावे लागेल.

- ज्ञान शाळेबाहेरील जगाशी जोडणे.
- शिक्षणाची घोकंपट्टीमधून सुटका केली पाहिजे.
- शिक्षण केवळ पाठ्यपुस्तककेंद्रित न राहता बालकाच्या सर्वांगीण वाढीसाठी त्याचा उपयोग होणे.
- परीक्षा जास्त लवचिक होऊन वर्गातील जीवनाशी एकात्म करणे.
- मुले वाढविताना लोकशाही धोरणांना प्राध्यान्यक्रम देणे अपेक्षित आहे.

सद्यःस्थितीत अशा नव्या घडोमोडी व समस्या समोर येत आहेत. या परिस्थितीला अभ्यासक्रमाने त्याला प्रतिसाद द्यायला हवा, यांची नोंद घ्यावी. हे पूरक साहित्य आपल्याला मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरेल अशी अपेक्षा. आनंददायी अध्ययन–अध्यापनासाठी शुभेच्छा.

■■■

## विषय – परिसर अभ्यास : भाग २

### विषयाची उद्दिष्टे : प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ प्रमाणे

१) प्राचीन काळापासून वर्तमानकाळापर्यंतची समाजाच्या विकासाची प्रक्रिया समजावून घेणे.

२) धर्मसहिष्णुता सामाजिक सुसंवाद व समता या जाणिवा विकसित करणे.

३) समाजहितासाठी असलेल्या नियमांचा आदर करून त्यांचे पालन करण्याची वृत्ती वाढीस लावणे.

४) ऐतिहासिक वास्तूंच्या जतनाची आवश्यकता पटवून देऊन त्यांचे जतन करण्याबाबत जाणीव निर्माण करणे.

५) अनिष्ट रूढी, परंपरा व अंधश्रद्धा यांचा त्याग करण्याची वृत्ती वाढीस लावणे.

६) जिज्ञासूवृत्ती, सौंदर्यदृष्टी व निर्मिती क्षमता जोपासणे व त्यांच्या अभिव्यक्तीला वाव देणे.

७) राजसत्तेच्या माध्यमातूनही प्रजेचे हित साधणाऱ्या काही ऐतिहासिक स्त्री–पुरुषांच्या योगदानाची माहिती करून घेणे.

८) पर्यावरण रक्षण व संवर्धनाची जाणीव निर्माण करणे.

९) आपत्ती व्यवस्थापनाबाबत जाणीव जागृती करणे.

■■■

## पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती

**घटक :** शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र **अंदाजे तासिका :** ५

**उपघटक : १ –** १) मध्ययुगीन काळ २) तत्कालीन सत्ता ३) रयतेचे होणारे हाल ४) छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- पोवाडा, रयत, मध्ययुग, वतनदार, जहागीर, सम्राट अकबर, सम्राट कृष्णदेवराय, अहमदनगरचा निजामशाहा, विजापूरचा अदिलशहा

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र : राज्य करीत असलेल्या सत्तांची माहिती देणे.<br>२. तत्कालीन महाराष्ट्रातील रयतेची स्थिती समजावून सांगणे.<br>३. शिवरायांनी हाती घेतलेल्या कार्याची ओळख करून देणे. | १. सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन | १. सततच्या संघर्षामुळे अस्थिरता आणि असुरक्षितता निर्माण होते.<br>२. लोककल्याणासाठी लोकाभिमुख सत्तेची आवश्यकता असते. | लेखी,<br>तोंडी,<br>उपक्रम,<br>प्रकल्प | भाषा,<br>भूगोल | दीक्षा ॲप,<br>क्यू आर कोड | ०४.९५B.०५<br>**मूल्ये :**<br>संवेदनशीलता,<br>सौजन्यशीलता,<br>राष्ट्रभक्ती |

**घटक :** संतांची कामगिरी **अंदाजे तासिका :** ५

**उपघटक : २ –** १) श्री चक्रधर स्वामी २) संत नामदेव ३) संत ज्ञानेश्वर ४) संत एकनाथ ५) संत तुकाराम ६) समर्थ रामदास स्वामी

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- श्री चक्रधर स्वामी, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत कान्होपात्रा, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सावता, संत गोरोबा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. संतांनी दिलेल्या गुणांची शिकवण समजावून देणे.<br>२. श्री चक्रधर स्वामी यांच्या कार्याविषयी माहिती देणे. | १. संत चरित्राचे वाचन, कीर्तन, भजन आयोजन, वेशभूषा स्पर्धा ठेवणे, अभिरूपता, नाट्यीकरण स्वगत – | समस्या निराकरण सर्जनशील विचार सहजीवन<br>१. महाराष्ट्रातील समाजामध्ये चैतन्य, प्रेरणा निर्माण | लेखी, तोंडी व अभिरूपता, नाट्यीकरण सादरीकरण घेता येईल. | इतिहास,<br>भाषा,<br>भूगोल<br>इत्यादी. | संत वाङ्मय,<br>दीक्षा ॲप<br>इत्यादी | ०४.९५B.०५<br>**मूल्ये :**<br>संवेदनशीलता,<br>वैज्ञानिक दृष्टिकोन, |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. संत नामदेवांची शिकवण सांगणे.<br>४. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास यांच्या कार्याची ओळख करून देणे.<br>५. संतांच्या शिकवणुकीचे परिणाम सांगणे. | मी तुकाराम महाराज बोलत आहे... इत्यादी. | करण्याचे काम संतांनी केले.<br>२. संतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली.<br>३. स्व-भाषा, स्व-धर्म, कर्तव्य यांची समज लोकात पसरली. | सर्व प्रश्न प्रकारांचा समावेश करावा. जीवन कौशल्य, जाणिवा, मूल्ये तपासणारे प्रश्न घ्यावेत. | | | सर्जनशीलता, श्रमप्रतिष्ठा, स्त्री-पुरुष समानता, सर्वधर्म समभाव |
| **घटक :** मराठा सरदार भोसल्यांचे कर्तबगार घराणे. **अंदाजे तासिका :** ४<br>**उपघटक : ३ –** १) धामधुमीचा काळ २) शूर मराठा सरदार ३) घृष्णेश्वर मंदिर ४) वेरुळचे भोसले ५) शहाजीराजे<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• जाधव, निंबाळकर, घोरपडे, मोरे, भोसले, घृष्णेश्वर | | | | | | |
| १. मराठा सरदारांच्या शौर्याची परंपरा स्पष्ट करणे.<br>२. मराठा सरदार घराण्यांची ओळख करून देणे.<br>३. वेरूळच्या पराक्रमी भोसले घराण्याची माहिती देणे.<br>४. भोसले जाधव घराणे संबंध स्पष्ट करणे.<br>५. शहाजीराजांच्या कार्याची ओळख करून देणे. | १. चर्चा, प्रश्नोत्तरे,<br>२. मजकूर वाचा.<br>३. कार्यकारणभाव स्पष्ट करा.<br>४. घटना प्रसंगांची कारणमीमांसा करणे.<br>५. अहवाल लेखन | १. चिकित्सक विचार, सर्जनशील विचार, स्व-कर्तृत्वाने प्रगती करता येते. | तोंडी, लेखी, उपक्रम, क्षेत्रभेट, प्रकल्प यांतून करता येईल. | भाषा, कला, भूगोल | दीक्षा ॲप | ०४.९५B.०४<br>**मूल्ये :** संवेदनशीलता, स्त्री-पुरुष समानता, सर्वधर्म समभाव, राष्ट्रभक्ती |

**घटक :** शिवरायांचे बालपण **अंदाजे तासिका : ४**

**उपघटक : ४ –** १) शिवजन्म : शिवनेरी किल्ला २) शिवरायांचे बालपण ३) जिजामातेची शिकवण ४) शिवबाचे सवंगडी ५) खेळ ६) शहाजीराजांची धावपळ ७) नव्या निजामशाहीची स्थापना ८) कर्नाटकातील वास्तव्य

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- तटबंदी, किल्लेदार, सांजवात, मावळ्यांची मुले, गनिमी कावा, बंगळुर आदिलशाही

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. शिवरायांच्या जन्माच्यावेळी महाराष्ट्राची राजकीय स्थिती स्पष्ट करणे.<br>२. शिवरायांच्या बालपणीच्या काळाचे वर्णन करणे.<br>३. सवंगडी आणि शिवराय संबंध स्पष्ट करणे.<br>४. स्वराज्य स्थापनेसाठी जिजामाता आणि शहाजी–राजांची प्रेरणा स्पष्ट करणे. | १. पाठ्यमुद्‌द्यांच्या आधारे चर्चा, आशयाचे वाचन, आकलन, चित्रावर चर्चा, प्रश्नोत्तरे, नकाशावाचन, शिवरायांची वंशावळ तयार करणे, अहवाल लेखन, चित्रे गोळा करणे, चित्राबद्‌दल माहिती सांगणे, लिहिणे इत्यादी. | १. संस्कारांमुळे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते.<br>२. सर्वांचा सहभाग घेऊन मोठे काम उभे करता येते.<br>३. शिक्षणाचा चांगला परिणाम घडून येतो. | लेखी, तोंडी, उपक्रम, नकाशावर आधारित कृती, प्रकल्प, स्वाध्याय घेता येईल. | भाषा, भूगोल | दीक्षा ॲप क्यू आर कोड | ०४.९५B.०४<br>**मूल्ये :** संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, सौजन्यशीलता, श्रमप्रतिष्ठा स्त्री–पुरुष समानता राष्ट्रभक्ती |

**घटक :** शिवरायांचे शिक्षण **अंदाजे तासिका :** ५

**उपघटक : ५ –** १) शिवरायांच्या शिक्षणाचा प्रारंभ २) पुण्याचा कायापालट ३) दादाजी कोंडदेव ४) शिवरायांचे शिक्षण ५) वीरमाता जिजाबाई यांची शिकवण ६) शिवरायांचा नवा अंमल ७) शिवरायांचा विवाह

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- मावळा, युद्धकला, पेशवे, मुजुमदार, सबनीस, डबीर इत्यादी

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. शिवरायांच्या शिक्षणाबद्दल माहिती देणे.<br>२. जिजामातेच्या प्रेरणेने पुण्याचा कायापालट झाला हे स्पष्ट करणे.<br>३. शिवरायांची शिक्षणातील प्रगती विशद करणे.<br>४. जिजामातेचा उपदेश समजून घेणे.<br>५. शिवराय जहागिरीचा कारभार पाहू लागले हे स्पष्ट करणे. | १. सूचक कृती – वर्ग आंतरक्रिया, मजकुरावर आधारित वाचन कृती, चर्चा, चित्रांवर आधारित चर्चा, अनुभव कथन, क्षेत्रभेट चर्चा, प्रसंग घटना यांचे वर्गात नाट्यीकरण (जिजामाता–शिवबा) करून घेणे. | १. चिकित्सक विचार, निर्णयक्षमता, समस्या निराकरण<br>२. पूरक कृती – चित्रे, नकाशा, प्रतिकृती दाखविणे.<br>३. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो. आजूबाजूच्या परिसराचा आपल्या जडणघडणीवर परिणाम होतो. | तोंडी, लेखी, उपक्रम, स्वाध्याय | भाषा, भूगोल | दीक्षा ॲप | ०४.९५B.०४<br>**मूल्ये :** संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, श्रमप्रतिष्ठा, स्त्री–पुरुष समानता, राष्ट्रभक्ती |

**घटक :** स्वराज्याची प्रतिज्ञा **अंदाजे तासिका :** ६

**उपघटक : ६ –** १) रायरेश्वराचे देवालय २) बाल शिवबाची तेजस्वी वाणी ३) स्वराज्याची शपथ ४) मावळ खोऱ्यातील जमवाजमव ५) मावळातील सोबती ६) शिवरायांची राजमुद्रा

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- मावळे, स्वराज्य, हिंदवी स्वराज्य, लाल महाल, खिंडी, घाट, चोखाटा, भुयारे, तळघर, दारूगोळा, राजमुद्रा, स्वभाषा, स्वधर्म, लोककल्याण.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. रायरेश्वराच्या मंदिरात शिवराय व त्यांचे मित्र एकत्र येण्याचे कारण स्पष्ट करणे.<br>२. स्वराज्य स्थापनेची पूर्व तयारी समजून घेणे.<br>३. राजमुद्रेचा अर्थ स्पष्ट करणे.<br>४. शिवाजी महाराजांचे वतन विषयक धोरण स्पष्ट करणे. | १. सूचक कृती – मंदिरांच्या प्रतिकृती तयार करून घेणे, अभिरूप, नाट्यीकरण, प्रसंग सादरीकरण, राजमुद्रेचा मोठा तक्ता तयार करून घेणे, चित्रवाचन, चित्रावर आधारित चर्चा इत्यादी | १. पूरक उपक्रम / जाणिवा–सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, स्नेहसंमेलनात नाटिका सादर करणे, आशयाचे संवादात रूपांतर करणे, ध्येयनिश्चिती करावी लागते. योग्य वाटचाल केल्यास ध्येय प्राप्ती होते. | तोंडी, लेखी, उपक्रम, स्वाध्याय | भाषा, भूगोल | दीक्षा ॲप, क्यू आर कोड | ०४.९५B.०४,०५<br>**मूल्ये :** संवेदनशीलता, सौजन्यशीलता, राष्ट्रभक्ती |

**घटक :** स्वराज्याचे तोरण बांधले. **अंदाजे तासिका :** ६

**उपघटक : ७ –** १) तोरणगड २) स्वराज्याची नौबत झडली ३) भवानी मातेचा आशीर्वाद ४) स्वराज्याची पहिली राजधानी ५) स्वराज्याची घोडदौड ६) शिवरायांचे चातुर्य

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- पोर्तुगीज, सिद्दी, परगणा, डोंगरी किल्ला, माची, तटबंदी, बारा महाल, अठरा कारखाने, राजगादी

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. महाराष्ट्रावर राज्य करीत असलेल्या सत्तांची नावे सांगता येणे.<br>२. तोरणा गडाचे वर्णन करता येणे.<br>३. तोरणा गड जिंकण्याचे कारण स्पष्ट करणे.<br>४. राजगडाची राजधानी म्हणून निवड करण्याचे स्पष्टीकरण देणे.<br>५. शिवरायांच्या कार्याबद्दल आदर निर्माण करणे. | १. सूचक कृती – किल्ल्यांचे नकाशात स्थान दाखविणे, किल्ल्यांची प्रतिकृती तयार करून घेणे, क्षेत्रभेटीचे आयोजन करणे. | पूरक उपक्रम/जाणिवा<br>१. निश्चयातून शक्ती निर्माण होते.<br>२. चातुर्य, धैर्य आणि विवेक यातून संकटावर मात करता येते. | तोंडी,<br>लेखी,<br>उपक्रम,<br>कृती,<br>प्रकल्प | इतिहास,<br>भाषा,<br>भूगोल | दीक्षा ॲप<br>क्यू आर कोड | ०४.९५B.०४,०५<br>**मूल्ये :**<br>श्रमप्रतिष्ठा,<br>राष्ट्रभक्ती |

**घटक :** स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त. **अंदाजे तासिका :** ३

**उपघटक :** ८ – १) जरब बसवली २) जावळीचे चंद्रराव मोरे ३) किल्ले रायगड

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- कोंढाणा, प्रांत, जावळी, किताब, खंडणी, रायगड

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. मावळ्यांची त्यागी वृत्ती समजावून सांगणे.<br>२. स्वराज्य निर्मितीमध्ये जवळची माणसे निर्माण करीत असलेले अडथळे स्पष्ट करणे.<br>३. शिवरायांनी स्वकीय शत्रूंचा केलेला पाडाव स्पष्ट करणे.<br>४. चंद्रराव मोरेचा शिवाजी महाराजांनी केलेला पराभव समजावून सांगणे. | १. सूचक कृती –<br>या प्रसंगी तुम्ही काय कराल?/चर्चा. यावर तुमचे मत लिहा/सांगा. मजकूर वाचा, कोण, कोठे, कधी, का? यावर प्रश्न तयार करा. | १. कर्तव्यापुढे आड येणाऱ्यांचा बंदोबस्त केला पाहिजे.<br>२. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्यावे लागते.<br>३. स्वहितापेक्षा देशहित महत्त्वाचे आहे. | तोंडी,<br>लेखी,<br>उपक्रम,<br>क्षेत्रभेट | इतिहास,<br>भाषा,<br>भूगोल,<br>कला | दीक्षा ॲप<br>क्यू आर कोड | ०४.९५B.०५<br>**मूल्ये :**<br>संवेदनशीलता,<br>राष्ट्रभक्ती |

**घटक :** प्रतापगडावरील पराक्रम.

**अंदाजे तासिका :** ६

**उपघटक : ९ –** १) आदिलशाही हादरली २) खानाने विडा उचलला ३) स्वराज्यावरील संकट ४) अफजलखानाचे डावपेच ५) शेरास सव्वाशेर ६) भेट ठरली ७) भेटीची तयारी ८) अफजलखानाशी झटापट ९) खानाच्या फौजेची दाणादाण

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- समशेर बहाद्दर, सुभेदार, वाई, अंगरक्षक, चिलखत, वाघनखे, बिचवा

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. आदिलशाही का हादरली हे सांगणे.<br>२. विजापूरच्या दरबारात अफझलखानाने केलेली प्रतिज्ञा स्पष्ट करणे.<br>३. खानाच्या भेटीसाठी शिवाजी महाराजांनी प्रतापगडाची निवड का केली याचे विश्लेषण करणे.<br>४) शिवाजी महाराजांनी भेटीची केलेली तयारी विषद करणे.<br>५) शिवाजी महाराजांच्या चातुर्याचे वर्णन करणे. | १. सूचक कृती – प्रतापगडाची प्रतिकृती तयार करा. नकाशात प्रतापगडाचे स्थान दाखवा. शिवाजी महाराजांनी भेटीच्या वेळी वापरलेले पोशाख व हत्यारे यांची चित्रे जमा करा. | १. विजापूरच्या दरबारातील प्रसंग नाट्यीकरण, अभिरूप, चित्रवाचन, चित्रांवर आधारित चर्चा<br>२. चातुर्याने संकटावर मात करता येते.<br>३. संकटाचा मुकाबला पूर्ण तयारीने करावा लागतो. | तोंडी,<br>लेखी,<br>उपक्रम,<br>क्षेत्रभेट | इतिहास,<br>भाषा,<br>भूगोल,<br>कला | दीक्षा ॲप<br>क्यू आर कोड | ०४.९५B.०४,०५<br>**मूल्ये :**<br>संवेदनशीलता,<br>वक्तशीरपणा,<br>राष्ट्रभक्ती |

**घटक :** शर्थीने खिंड लढवली. **अंदाजे तासिका :** ५

**उपघटक : १0 –** १) आदिलशहा चिडला २) पन्हाळगडाचा वेढा ३) शिवराय वेढ्यातून बाहेर ४) बाजीप्रभूचा बाणेदारपणा ५) बाजीने शत्रूला रोखले ६) खिंडीतील झुंज ७) बाजीचा पराक्रम ती पावनखिंड

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- चौफेर वेढा, पन्हाळगड, शिदोरी, छावणी, खिंड, बाजीप्रभू, गनिम, विशाळगड, पावनखिंड

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक व मूल्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पन्हाळगडाला सिद्दी जोहरने वेढा घातल्याची कारणे स्पष्ट करणे.<br>२. पन्हाळगडाच्या वेढ्यातून महाराजांनी सुटका कशी करून घेतली हे सांगणे.<br>• बाजीप्रभूंची स्वामिनिष्ठा आणि पराक्रम सांगणे.<br>• शिवाजीमहाराजांचे धैर्य या गुणांचे महत्त्व विषद करणे. | १. सूचक कृती – घटना /प्रसंगांची मालिका तयार करणे. क्रमाने लावणे. घटनेवर चर्चा करणे, अशा प्रसंगी काय कराल? तुमचे मत सांगा. अभिरूप, नाट्यीकरण | १. मी बाजीप्रभू बोलतोय – भूमिका अभिनय<br>२. चरित्र वाचन, अधिक माहिती मिळवणे.<br>३. राष्ट्रासाठी समर्पित भावनेने काम करावे लागते.<br>४. शत्रूवर विजय मिळवण्यासाठी युक्ती वापरावी लागते. | तोंडी, लेखी, उपक्रम, क्षेत्रभेट | इतिहास, भाषा, भूगोल, कला | दीक्षा ॲप, क्यू आर कोड | ०४.९५B.०४, ०५<br>**मूल्ये :** संवेदनशीलता, वक्तशीरपणा, राष्ट्रभक्ती |

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय – आरोग्य व शारीरिक शिक्षण

### संवाद शिक्षक मित्रांशी

शालेय विद्यार्थ्यांचा सर्वांत आवडता विषय म्हणजे आरोग्य व शारीरिक शिक्षण. बालसुलभ खेळण्याच्या आवडीमुळे आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या तासिकेत विद्यार्थी नेहमीच सक्रिय असतात. या विद्यार्थ्यांना विषयाच्या उद्दिष्टांनुरूप घटक, उपघटक, उपक्रमांमधील अपेक्षित क्षमता आणि कौशल्यांचे अध्यापन करून त्यांना शारीरिक व मानसिकरीत्या सुदृढ बनवणे हे आपले कार्य.

**विषयाचे तासिका/वेळापत्रक नियोजन :**

आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाच्या तासिका या वेळापत्रकाच्या नियोजनाप्रमाणे आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयासाठी वापरल्या जातील याबाबत शिक्षकांनी दक्ष असावे. तासिका सुरू होण्यापूर्वी मैदानावर सर्व तयारी करून ठेवावी. साहित्य व आखणी तयार असल्याने वेळ वाचतो. विद्यार्थ्यांना मैदानावर जाताना व येताना रांगेत जाण्यायेण्याची शिस्त लावावी. तासिकांची सुरुवात उत्तेजक हालचालींद्वारे करून घ्यावी. शिकवण्याचा मुख्य भाग झाल्यावर काही वेळ मनोरंजनात्मक खेळासाठीही ठेवावा. आपल्याकडे उपलब्ध साधन साहित्य, मैदान याचा कल्पकतेने वापर करून आरोग्य व शारीरिक शिक्षण विषय उद्देशानुरूप विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करावा.

**आजारी व दिव्यांग विद्यार्थ्यांचा विचार :**

आजारी असलेल्या, नुकतेच दुखापतीतून बरे झालेल्या विद्यार्थ्यांना जोरकस व्यायाम किंवा तीव्र गतीच्या हालचाली करण्याची सक्ती करू नये. त्यांना जमेल त्या पद्धतीने तासिकेमध्ये सक्रिय ठेवावे. विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांनाही त्यांच्या क्षमतांचा विचार करून तासिकेमध्ये कृतिशील ठेवण्याचा प्रयत्न करावा. शिकलेले व्यायाम प्रकार हालचाली विद्यार्थी घरी करतील. आपल्या परिवारातही करून दाखवतील असे प्रोत्साहन द्यावे. किमान नियमित एक तास मैदानावर विविध खेळ, व्यायाम, धावणे, शारीरिक हालचालींचे प्रकार करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे. दररोज सूर्यनमस्कार घालण्याची सवय लावावी. विद्यार्थ्यांकडून विविध नवनवीन खेळ खेळून घ्यावे. त्यांच्या क्षमतेनुसार व्यायामाची तीव्रता, काठिण्यपातळी व वारंवारिता निश्चित करावी. आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे नियोजन करून संपूर्ण अभ्यासक्रमातील आरोग्याधिष्ठित शारीरिक सुदृढतेच्या सर्व क्षमता व कौशल्याधिष्ठित कारक सुदृढतेचे सर्व कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त होतील याकडे विशेष लक्ष पुरवावे.

**मुलांच्या आनंदासाठी – मुलांच्या आरोग्यासाठी :**

इयत्ता चौथीच्या वयातील मुले ही कृतिशील असतात. सांघिक खेळांत, तालबद्ध हालचालींमध्ये, विविध व्यायाम प्रकारांमध्ये त्यांना रस असतो. त्यांच्या शारीरिक क्षमतांच्या विकासाची ही सुरुवातच असते. त्याचप्रमाणे योग्य शरीरस्थिती आणि विविध हालचालींबाबत योग्य माहिती त्यांना देणे आवश्यक असते. खेळ, विविध कृती, हालचाली व व्यायाम आदींचे महत्त्व सांगून त्यातून विकसित होणाऱ्या क्षमता, कौशल्ये व सामाजिक गुणांची माहिती त्यांना नकळत देण्याचा प्रयत्न करावा. सर्व विद्यार्थ्यांना ‘आनंदासाठी, आरोग्यासाठी’ मैदानावर भरपूर उपक्रम करण्याची संधी द्यावी. त्यांच्या कल्पना आणि मतांचा मान ठेवत त्यांच्या पद्धतीनेही हालचालींचे नियोजन करावे.

**उपक्रमात सहभागी होण्याची संधी व प्रोत्साहन :**

खेळ व शर्यती जिंकणाऱ्या व हरणाऱ्या पहिल्या व दुसऱ्या स्पर्धक गटाचे कौतुक करावे. स्पर्धा जिंकण्यासाठी नसून सहभाग घेत आपले कार्यमान तपासण्यासाठी आहे हे बिंबवावे. आपल्या परिसरात उपलब्ध सोयीसुविधा, पद्धती व परंपरा यांच्यानुसार नियमितपणे विविध खेळ, कसरती, नृत्य, छंद आदी कृतिशील प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे. शालेय स्तरावर विविध स्पर्धा आणि उपक्रमांत सहभागी होण्याची संधी देऊन त्यांच्या क्षमता व सुप्त गुण विकसित होण्यासाठी प्रयत्न करावे.

**शारीरिक सुदृढता व मानसिक स्वास्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षण :**

मैदानावर सक्रिय असणारी मुले सामान्यतः विविध कौशल्य व सामाजिक गुण लवकर प्राप्त करतात. सहकार्य, गटात काम करण्याची क्षमता, निर्णय क्षमता, समस्या निराकरण, शिस्त, जबाबदारी, समन्वय आदी अनेक गुण मुलांमध्ये दिसून येतात. दैनंदिन खेळ व शारीरिक हालचालींमुळे आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांमधील चिंता आणि ताणतणाव कमी होऊन मानसिक व भावनिक स्थैर्य त्यांना प्राप्त होते. जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण तासिकेत मैदानावर सक्रिय असतात ते शैक्षणिक क्षेत्रातही अग्रभागी असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. शालेय जीवनात सक्रिय असणारे हे विद्यार्थी भावी जीवनातही शारीरिक व मानसिक दृष्ट्या अधिक स्वस्थ व सक्रिय असतात असे दिसून आले आहे. शारीरिक शिक्षण हे शारीरिक सुदृढता व मानसिक स्वास्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. यामुळे स्नायू व हृदयाच्या मासपेशी मजबूत होतात व शरीर दमदार आणि लवचीक होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना आपली विविध उद्दिष्टे योग्यरीतीने प्राप्त करण्यास यामुळे बरेच साहाय्य होते.

**विविध क्षमता चाचणी व शारीरिक उपक्रम :**

क्रीडा विभागाच्या विविध क्षमता चाचण्या तसेच ‘फिट इंडिया’ द्वारे घेण्यात येणारे विविध शारीरिक उपक्रम, त्यातील चाचण्या यांचाही उपयोग शारीरिक शिक्षण तासिकांमधून शारीरिक हालचाली व शारीरिक सुदृढता विकसित करण्यासाठी करून घेता येईल.

**शारीरिक शिक्षणाच्या आधारित माहितीचे वाचन व संकलन :**

शिक्षकांनी आरोग्य व शारीरिक शिक्षणावर आधारित विविध पुस्तके, ग्रंथ, मासिके, त्याचप्रमाणे सामाजिक माध्यमांवर उपलब्ध विविध व्हिडिओ आणि माहितीचे वाचन व संकलन करीत रहावे. जेणेकरून विविध हालचालींच्या मागे अपेक्षित असलेल्या विविध शारीरिक क्षमता व कारक कौशल्यांच्या विकासाच्या उद्देशांची अधिक माहिती प्राप्त करता येईल. नवनवीन अध्ययन–अध्यापन पद्धती, उपक्रम, साहित्याचा विविधांगी वापर, कमी जागेत विविध खेळ व उपक्रम, मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन आदी विविध कल्पना बघायला मिळू शकतात. या सर्वांचा वापर आपल्या तासिकेमध्ये केल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य व शारीरिक शिक्षण मनोरंजनात्मक होईल.

**आरोग्य व शारीरिक शिक्षणाचा इतर विषयांचा समवाय**

आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या तासिकेतून इतर विषयांचा समवाय साधता येतो. विविध हालचाली व उपक्रमादरम्यान इंग्रजी मुळाक्षरे, बाराखडी, शब्द, म्हणी, कविता यांचा कल्पक वापर करून भाषा विषयाचा समवाय साधून सराव घेता येतो. तर गणितातील संख्या, पाढे, वर्गमूळ, वर्ग, बेरीज, वजाबाकी, त्रिकोण, चौकोन अशा मूलभूत कौशल्यांचा मैदानावर खेळताना वापर करता येतो. विविध शास्त्रीय कारणे, भौगोलिक कारणे, असे का?, त्याचप्रमाणे खेळाचा इतिहास, विविध चांगल्या सवयी, नागरिकत्वाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आदी बाबींमधून परिसर अभ्यास विषयाचा समवाय साधता येईल. कला विषयाद्वारे विविध आकारांची आखणी, रंग भरणे, आकृती, चित्र काढणे तर कार्यानुभवामध्ये खेळाशी संबंधित विविध पर्यायी साहित्य, माहिती, तक्ते, आकृत्या, नकाशे व आवश्यक साहित्य तयार करून घेता येईल.

**विद्यार्थ्यांना द्यावयाच्या मार्गदर्शक सूचना**

- विद्यार्थ्यांच्या मानसिक क्षमता व शारीरिक सुदृढतेबाबत तात्त्विक मार्गदर्शन करून या क्षमतांची आवश्यकता व महत्त्व प्रसंगानुरूप विषद करावे.
- योग्य मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणावी आणि विविध ठिकाणी हे करावे, हे करू नये असा 'डूज अँड डोन्ट' सूचनेचा तक्ता विद्यार्थ्यांकरवी बनवून घ्यावा.
- घरात, शाळेत मैदानावर, गर्दीच्या ठिकाणी, निर्जन ठिकाणी, उंचावर, लिफ्टमधे, पायऱ्या चढत – उतरत असताना, अनोळखी व्यक्तीसोबत बोलताना – वागताना, कमी उजेड वा अंधाऱ्या ठिकाणी, सामाजिक कार्यक्रमात, रस्त्यावर, आपत्कालीन परिस्थिती, नाट्यगृह आदी विविध ठिकाणी कसे वागावे? काय करावे? काय करू नये? याबाबत मार्गदर्शक सूचना द्याव्यात.
- इयत्ता चौथी – पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांची वैयक्तिक आवड, क्षमता व कौशल्यांनुसार विद्यार्थ्यांना योग्य खेळाची निवड करण्यासाठी मदत करण्याबाबत पालकांना मार्गदर्शन करावे.
- आरोग्य व शारीरिक शिक्षण इयत्तानिहाय, वयाचा व क्षमतांचा विचार करून गृहपाठ, गृहकार्यासाठी साप्ताहिक वा मासिक कार्यतक्ता तयार करावा. यामुळे विद्यार्थी आपल्या घरी दैनंदिन कृतियुक्त

जीवनशैलीचा अंगीकार करून शारीरिक हालचाली, व्यायाम, सूर्यनमस्कार, आसने, शरीरस्थिती व विविध सुदृढता कसोट्यांचा नियमित सराव करतील.

- क्रीडा नैपुण्य चाचण्या, शारीरिक सुदृढता कसोट्या, कारकक्षमता चाचण्या, राज्य क्रीडा विभागाच्या बॅटरी टेस्ट, फिट इंडिया शारीरिक क्षमता चाचण्या व उपक्रम, शरीररचना जाणीव, उंची, वजन, मोजमापे नोंदवण्याबाबत पालक व विद्यार्थ्यांमधे जागृती करावी. स्वयं–मूल्यमापन तक्ता निर्मिती करून तो भरण्यास प्रोत्साहन द्यावे.
- विद्यार्थ्यांच्या अंगी विविध सामाजिक, भावनिक व शारीरिक क्षमता व गुण आत्मसात होणे तसेच शारीरिक व मानसिक क्षमता व कौशल्ये प्राप्त होत असल्याचे बाबतीत दक्ष असावे.
- विशेषतः विद्यार्थ्यांना विविध बाबतीत स्वयंपूर्णता, समाजात वावरताना सुरक्षितता, स्वतःची काळजी व निगा, आत्मरक्षा व संरक्षणाबाबतीत शारीरिक व मानसिक क्षमता विकसित होण्यासाठी मुलींना सशक्त करण्याचे विशेष प्रयत्न करावे.
- मोबाईल, इंटरनेट, कॉम्प्युटर आदी इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या वापराच्या सुयोग्य पद्धतीचे मार्गदर्शन करून त्यांच्या अतिवापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची विद्यार्थ्यांना कल्पना द्यावी.
- फावल्या वेळेच्या सदुपयोगाबाबत मार्गदर्शन करावे. कृतिशील छंद/हालचाली/व्यायाम प्रकार/ कार्यशैलीची निवड करून त्यातून आत्मिक समाधान मिळवण्याचे मार्गदर्शन करावे.
- विद्यार्थ्यांच्या अंगी विषयांच्या तासिकांतून, शालेय उपक्रमांतून व प्रसंगानुरूप चर्चेतून जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेली १० जीवन कौशल्ये विकसित होतील हे पहावे.
- विद्यार्थ्यांच्या समूह सहभागाचा सुयोग्य प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांमध्ये या वयात असलेले ‘मी/माझे’ ऐवजी ‘आपण/आपले’ अशी भावनिक सुधारणा करून खिलाडू वृत्ती, ‘सांघिक भावना’ निर्माण करणे व ती जोपासणेबाबत गोष्टीरूप व प्रसंगानुरूप आवश्यकता व महत्त्व याबाबत मार्गदर्शन करावे.
- आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयात प्राप्त होणाऱ्या क्षमता व कौशल्यांचा आपल्या घरात, शाळेत व समाजात वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे.
- विविध क्रीडा प्रकारानुसार मूलभूत कौशल्यांचा सराव व प्रशिक्षण पद्धतीची तात्त्विक माहिती पालकांना मिळविण्यासाठी प्रोत्साहित करून दैनिक सरावासाठी आग्रह करावा.
- विविध खेळ, स्पर्धा, खेळाडू यांच्या प्रोत्साहित करणाऱ्या, प्रेरणादायी मार्गदर्शक कथा सांगून विद्यार्थ्यांची आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची आवड जोपासावी.

**संदर्भ साहित्य :** शिक्षकांनी अधिक माहितीसाठी आरोग्य व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२, शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिका इयत्ता चौथी, मूल्यमापन पद्धती मार्गदर्शिका, विविध लघुखेळ, शालेय उपक्रम या बालभारतीद्वारे प्रकाशित पुस्तकांचा आधार विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी घ्यावा.

# शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे ध्येय व उद्दिष्टे

**शारीरिक शिक्षणाचे ध्येय :**

विशिष्ट उद्दिष्टांनी निवडलेल्या शारीरिक हालचालींच्या माध्यमातून शारीरिक–मानसिक व सामाजिक–दृष्ट्या निरोगी, सुदृढ, सर्जनशील व कृतिशील जीवनशैलीचा अंगीकार करणारा नागरिक तयार करणे हे शारीरिक शिक्षणाचे ध्येय आहे.

**शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाची उद्दिष्टे**

- मुक्त हालचालींतून आनंद मिळवून देणे.
- अनुकरणात्मक हालचालींतून क्रियाशीलता वाढवणे.
- व्यायामाची आवड निर्माण करणे व जोपासणे.
- आंतरिक ऊर्जेला योग्य दिशा देणे.
- शारीरिक सुदृढतेची जाणीव निर्माण करणे.
- मूलभूत हालचाली व योग्य शरीर स्थितीचा विकास करणे.
- स्वच्छता व आरोग्यविषयक सवयी विकसित करणे.
- आहार व त्यांतील घटकांचे शास्त्रीयदृष्ट्या महत्त्व सांगणे.
- मैदान व क्रीडांगण स्वच्छतेमधून परिसर स्वच्छता व श्रमाचे मूल्य वृद्धिंगत करणे.
- शारीरिक हालचाली विविध उपक्रम व खेळांमधून मनोरंजनाची संधी देणे.
- पारंपरिक खेळांची आवड निर्माण करणे.
- कारक कौशल्ये व क्रीडा कौशल्ये विकसित करणे.
- विविध उपक्रम व खेळांच्या माध्यमातून ताणतणाव दूर करणे.
- खिलाडू वृत्ती निर्माण करणे.

■■■

# आरोग्य व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाची क्षेत्रे

**आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची क्षेत्रे व त्यांच्या क्षमता पुढीलप्रमाणे आहेत.**

- **आरोग्याधिष्ठित शारीरिक सुदृढता**

  १) हृदयाचा दमदारपणा   २) स्नायूंची ताकद   ३) स्नायूंचा दमदारपणा

  ४) लवचिकपणा   ५) शरीरधारणा

- **विविध हालचाली व योग्य शरीरस्थिती**

  १) जागेवर करावयाच्या हालचाली   २) जागा बदलत करावयाच्या हालचाली

  ३) साहित्य व सहकाऱ्यांबरोबर हालचाली   ४) शरीर नियोजन कौशल्ये

- **कौशल्याधिष्ठित कारक सुदृढता**

  १) वेग   २) समन्वय   ३) दिशाभिमुखता

  ४) शक्ती   ५) तोल   ६) प्रतिक्रिया काल

- **आरोग्य**

  **अ) वैयक्तिक आरोग्य**

  १) आहार   २) शरीरावयव   ३) वैयक्तिक स्वच्छता

  ४) स्वच्छतागृहाचा वापर   ५) विश्रांती व झोप   ६) वाईट सवयींना प्रतिबंध

  **ब) मैदानावरील आरोग्य**

  १) पोशाख   २) मैदान स्वच्छता   ३) क्रीडांगण आखणी

  ४) साहित्याचा वापर व निगा   ५) व्यायाम व सुरक्षितता   ६) प्रथमोपचार

- **कृतिशील जीवनशैली**

कृतिशील जीवनशैली म्हणजे दैनंदिन जीवनात कृतिशील राहणे, विविध कार्य आवडीने करणे आणि फावल्या वेळेचा सदुपयोग करून खेळ, व्यायाम अशा शारीरिक हालचाली किंवा एखादा छंद जोपासणे. मैदानावर खेळणे, पदभ्रमण, दैनंदिन सूर्यनमस्कार, व्यायाम आदी उपक्रम हे कृतिशील जीवनशैलीचा भाग आहेत.

■■■




**शारीरिक शिक्षण विषयाचा इतर विषयाशी समवाय :**

प्राथमिक शिक्षणात नव्यानेच शिक्षण सुरू केलेल्या विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करीत असताना शिक्षकांना सर्व विषयांचा एकमेकांशी समन्वय ठेवून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पुढे नेण्याची कला अवगत असावी लागते. शारीरिक शिक्षणाच्या सर्वच विषयांशी समवाय करून शिक्षक विद्यार्थ्यांना आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या अध्ययन निष्पत्तीसोबतच इतरही विषयांमधील विविध घटक आणि उपघटकांचा योग्य रितीने सराव करून घेण्याचा यशस्वी प्रयत्न करू शकतात.

भाषा, गणित, परिसर अभ्यास, कला आणि कार्यानुभव या विषयांचा आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयांशी समन्वय साधून शारीरिक शिक्षणाच्या तासांमध्ये विद्यार्थ्यांना उद्दिष्टांनुसार व अध्ययन निष्पत्तीच्या अनुषंगाने उपक्रमांचे अध्ययन करायचे आहे.

इयत्ता चौथीपासून मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची खरी सुरुवात असते. यामध्ये अध्यापन होत असलेले विषय भाषा, गणित, परिसर अभ्यास, कला व कार्यानुभव यांचा एकमेकांशी समन्वय साधून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अध्यापन केल्यास हे सर्व विषय योग्य त्या पद्धतीने उद्दिष्टांनुरूप विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतात. आवश्यक त्या अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांमध्ये निश्चितपणे दिसतात. त्यामुळे शिक्षकांनी आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाच्या तासिकांमध्येही आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामधील विविध उपक्रमांत विविध विषयांमधील प्राथमिक कौशल्यांचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांनी मिळविलेले ज्ञान दृढ होण्यास मदत होते.

इतर विषयाच्या तासिकांमध्येही आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामधील विविध उपक्रमांचा वापर करता येईल.

**भाषा विषयाशी समवाय**

भाषेमध्ये मुळाक्षरे, स्वर, व्यंजने यांचा क्रम तसेच विविध शब्द, म्हणी, वाक्य, प्रश्नोत्तरे यांचा उपयोग विविध उपक्रमांतून करून घेता येईल. भाषेच्या साहाय्यानेच विविध संदेश, कानगोष्टी, सूचना यांचे योग्य आदान-प्रदान आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या मैदानी व वर्गखोलीतील विविध उपक्रमांत शिक्षकांना आपल्या कौशल्याने व नाविन्यपूर्ण पद्धतीने वापरण्याची संधी आहे.

**गणित विषयाशी समवाय**

गणित विषयाचा समवायही सहजपणे करता येतो. संख्या, पाढे, मूलभूत क्रिया जसे - बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, घनमूळ, लहान की मोठा, कमी की जास्त, अधिक नंतर अशा पद्धतीच्या गणितीय संकल्पना रुजवण्यासाठी खेळाचा उपयोग आरोग्य व शारीरिक शिक्षण तासिका व उपक्रमांतही कल्पकतेने शिक्षकांना करता येईल.

**परिसर अभ्यास विषयाशी समवाय**

परिसर अभ्यास विषयांच्या विविध संज्ञा, इतिहास, शास्त्रीय महत्त्व, असे का होते? याचे कारण काय? या बाबी आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या उपक्रमांतूनही विद्यार्थ्यांना शिकवता येतील.

**कला विषयाशी समवाय**

मैदान आखणी करणे, मातीवर गिरवणे, कलात्मक रीतीने मांडणी करणे, चित्रे काढणे, व्यायाम प्रकारांना नाट्यमय रीतीने सादर करणे, नृत्य या बाबींद्वारे कला विषयाशी समवाय साधता येईल.

**कार्यानुभव विषयाशी समवाय**

कागदी, स्पंज, कापसाचे चेंडू बनवणे, पर्यायी क्रीडा साहित्य तयार करणे, माहितीचे तक्ते तयार करणे, कात्रणे जमवणे, चिकटवही अशा प्रकारच्या बाबी कार्यानुभव विषयाशी समवाय साधतात.

■■■

## पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| १) | **मूलभूत हालचाली**<br>**जागेवर करायच्या हालचाली**<br>**अंदाजे तासिका : ४** | ➢ तोल : बॅलन्सिंग बिम, जमिनीवर रोवलेले ठोकळे, विटा, लाकूड, उंचावरची फलटी<br>➢ वेगवेगळ्या शरीरस्थितीत तोल सांभाळणे. शरीराच्या विविध भागांवर हातावर पायावर तोल सांभाळणे.<br>➢ वाकणे, ताणणे, पिळणे, वळणे, उड्या मारणे, गिरकी घेणे, अवतरण करणे, विविध प्रकारे तोल सांभाळणे, जागेवर धावणे, गॅलपिंग.<br>➢ या हालचालींचा सराव काठिण्यपातळी, अंतर, उंची, वेळ वाढवून सराव.<br>➢ विद्यार्थी कुवतीचा विचार, उड्यांची संख्या वाढवणे.<br>➢ वेगवेगळ्या दिशांना उडी मारून फिरणे. | वेगवेगळ्या शरीरस्थितीत तोल सांभाळतो.<br><br>विविध भागांवर विविध प्रकारे तोल सांभाळतो. |
| | **मूलभूत हालचाली**<br>**जागा बदलत करायच्या हालचाली**<br>**अंदाजे तासिका : ४** | ➢ इशाऱ्यानुसार हालचाली करणे.<br>➢ दोरीवरच्या उड्या मारत वेग बदलत पुढे जाणे, एका एका पायावर दोरीवरच्या उड्या मारत पुढे जाणे, विविध आकार, प्रकारांमध्ये चालणे.<br>➢ चालणे, धावणे, चकवणे, हुलकावणी देणे, लंगडी, झाप मारणे, लंगडी घेणे, सरकणे, घसरणे, दूडाण चाल.<br>➢ चालणे, धावणे, रोलिंग, चढणे, हुलकावणी देणे, उडी मारणे, लंगडी, स्किपिंग, सरकणे, घसरणे.<br>➢ काठिण्यपातळी वाढवत, अंतर व वेळ वाढवून सराव.<br>➢ ढांग टाकणे. एका पायाने व क्रमवार एकानंतर एक, दोन्ही पायाने ढांग टाकणे. | विविध अंतराच्या व उंचीवरून यशस्वीरित्या उड्या मारतो. इशाऱ्यानुसार हालचाली करू शकतो.<br>विविध पद मार्गांवरून जलदरित्या चालतो. उड्या मारत पुढे जातो. |
| | **मूलभूत हालचाली**<br>**साहित्य व सहकाऱ्यांसह करावयाच्या हालचाली**<br>**अंदाजे तासिका : ८** | ➢ काठिण्यपातळी, दिशा, अंतर व वेग वाढवून सराव.<br>➢ चेंडूसह विविध कौशल्य जागेवर व जागा बदल करणे.<br>➢ कॅचिंग, थ्रोईंग, पासिंग, ड्रिबलिंग, शूटिंग, कीकिंग, हेडींग, ब्लॉकींग आदी कौशल्यांचा सराव.<br>➢ मल्लखांब<br>➢ **चेंडू थांबवणे :** पायाच्या घोट्याने, छातीवर, पायाच्या चवड्यांवर, मांडीने, गुडघ्याचा आतील भाग, नरम हलक्या चेंडूने सराव, घरंगळत येणारा चेंडू, हळुवार हवेतून येणारा चेंडू, टप्पे घेत येणारा चेंडू, जोडीने सराव, अंतर वाढवत, वेग वाढवत, दिशा बदलत सराव. | धावत जाऊन चेंडू झेलतो.<br>धावत जाऊन चेंडू फेकतो.<br><br>संबंधित कौशल्यांचा सराव करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | ➢ **चेंडूचे टप्पे :**<br>दोन्ही हाताने, एका हाताने, हाताच्या ताकदीने, मनगटाच्या ताकदीने, कमरेपर्यंत उसळी, एका जागी उभे राहून, जोडीने, समोर उभे राहून, उभे राहून, वाकून, कमी उंचीचे टप्पे, जास्त उंचीचे टप्पे.<br>➢ हवेतल्या हवेत चेंडूला लाथाडणे : हलका व रबरी चेंडू, एकट्याचा सराव, हाताने सोडून जमिनीवर पडण्यापूर्वी लाथाडणे.<br>दोघांचा सराव : एकाने वरून चेंडू सोडावा. दुसऱ्याने मारावा.<br>जोडीने : एकाने अंतरावरून हळुवार फेकावा. दुसऱ्याने मारावा. भिंतीला सराव–भिंतीवर मारून येणारा टप्पा मारावा.<br>➢ चेंडू घरंगळत नेणे : वाकून, बसून, उभे राहून, चेंडू विविध देशांना, हाताने घरंगळणे, चेंडू परतवणे, हवेतून येणाऱ्या चेंडूला वरचेवर फटका मारून परतवणे, मनगटाने चेंडूच्या खाली हाताने परतवणे, हात, मनगट, बोटे स्थिर व हालचाल, नजर चेंडूवर ठेवणे, फुगे, चेंडू, कागदी चेंडू, कापूस/कापडी चेंडू, रबरी चेंडूचा वापर टप्पा पडल्यावर हाताखाली नेण्याचा सराव.<br>एक–दोघांचा सराव, गटाचा सराव. | |
| | **सर्व मूलभूत हालचालींचे विकसन अंदाजे तासिका : ४** | ➢ **हालचालींची मालिका १ :**<br>सुरुवात आठ ते दहा मीटर धावणे, तीन ते पाच मीटर रांगणे, समोरील शंकू पुढे हुलकावणी देणे, दिशा बदल करणे, चार ते पाच मीटर रनिंग करणे, चार ते पाच मीटर चेंडू झेलत चालणे,वर्तुळाकार लंगडी करणे, मॅटवर लोटांगण घेत पुढे जाणे, समोरील कोलांटउडी करणे, हॉकी स्टिकने चेंडू ढकलत पुढे नेणे, आठ ते दहा मीटर धावणे, शेवट.<br>➢ मूलभूत कसरती/मूलभूत हालचालींचा सराव विविध मार्गांनी कौशल्यांचे एकत्रीकरण करून सराव<br>➢ दोरीवरच्या उड्या, विशिष्ट जागी शूटिंग पासिंग करणे.<br>➢ काठिण्यपातळी अंतर, उंची व वेळ वाढवून क्रमवार हालचालींची मालिका करणे. | सहकाऱ्यासह विविध कौशल्यांचा सराव करतो.<br><br>मूलभूत हालचालींचा सराव विविध कौशल्यांच्या एकत्रीकरणाने करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| २. | **विविध व्यायाम**<br>**सामान्य व्यायाम**<br>**उत्तेजक व्यायाम**<br>**अंदाजे तासिका : ८** | ➢ **उत्तेजक व्यायामासाठी नवनवीन पद्धती :**<br>वर्गातून मैदानात येताना धावत उड्या मारत येणे, विविध प्रकार, वळणे, वाकणे अशा हालचाली गतीने करणे, गतीने पाच सूर्यनमस्कार काढणे, एरोबिक्स प्रकार गतीने करणे, पायऱ्या जिना वेगाने चढणे, हालचालींची साखळी करणे, विविध प्राण्यांच्या चाली करणे, वेगात लंगडी घालणे, धावणेवर आधारित एखादा खेळ खेळणे. | सर्व सांधे व स्नायूंना उत्तेजित करणारे व्यायाम नवनवीन पद्धतीने करतो. |
| | **विविध व्यायाम**<br>**सामान्य व्यायाम**<br>**एबीसी ड्रील्स**<br>**अंदाजे तासिका : ४** | ➢ **एबीसी ड्रील्स :**<br>गुडघे उंच उचलत समोर जाणे, सहकाऱ्यासोबत अवरोधाने गुडघे उंच उचलणे, बाऊन्सिंग बट कीक्स्, अडथळे पार करत धावणे, शिडीमध्ये धावणे (शिडीचा आकार जमिनीवर/टाईल्सवर आखवा किंवा दोरी, कापडी पट्टीची शिडी तयार करून जमिनीवर अंथरावी), भिंतीच्या आधारे सराव, डोक्यापासून पायापर्यंत सांधे व स्नायूंना उत्तेजित व्यायाम. | चापल्याने विविध प्रकारे धावतो. |
| | **विशेष व्यायाम**<br>**तालबद्ध व्यायाम**<br>**अंदाजे तासिका : ८** | ➢ डंबेल्स : साहित्य व्यायाम प्रकार<br>➢ सावधान : पाय सावधान स्थितीत व दोन्ही हातात एक–एक डंबेल असावे.<br>➢ विश्राम : दोन्ही पायात अंतर व दोन्ही हातात एक डंबेल असावे.<br>➢ **प्रकार एक :**<br>१) बाजूने हात सरळ डोक्यावर घेऊन डंबेल्स ठोकणे.<br>२) उजवा पाय गुडघ्यात वाकवून नव्वद अंशाचा कोन होईल इतका वर उचलावा. मांडी जमिनीला समांतर असावी. मांडी खाली डंबेल्स ठोकणे.<br>३) उजवा पाय सावधान स्थितीत जमिनीवर ठेवत हात सरळ बाजूने डोक्यावर नेऊन डंबेल्स ठोकणे.<br>४) दोन्ही हात बाजूने खाली आणत सुरुवातीच्या स्थितीत डंबेल्स घेऊन उभे राहणे.<br>➢ इंडियन क्लब जोडी<br>➢ घुंगरू काठी<br>➢ कॅलॅस्थेनिक्स (बैठे स्थितीत)<br>**प्रकार १**<br>१) जोडलेला हात डोक्याच्या वर  २) जोडलेल्या डोक्यावर टेकवावे | शिकवलेले सर्व तालबद्ध व्यायाम करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | ३) सरळ डोक्याच्या वर ४) मूळ स्थितीमध्ये<br>अशा प्रकारे विविध बैठे व उभ्या स्थितीत व्यायाम प्रकार तयार करून हाता–पायाची हालचाल हात–पाय समन्वय हालचाल, कमरेतून मागे, पुढे, बाजूला वाकणे आदी हालचालींचे एकत्रीकरण करून तयार करता येतील.<br>➢ **तालबद्ध व्यायाम :**<br>खडी मासपीटी, बैठी मासपीटी, सहसाहित्य व्यायाम प्रकार : फुगे कवायत, रिबीन कवायत, गुच्छ कवायत, कडी कवायत, रुमाल कवायत, काठी कवायत इ. | |
| | **ॲरोबिक्स**<br>**अंदाजे तासिका : ४** | ➢ **ॲरोबिक्स :**<br>एरोबिक्सचे मूलभूत प्रकार<br>१. मार्चिंग विथ हॅन्ड मुव्हमेंट प्रकार<br>२. वाईड लेग मार्च प्रकार<br>३. वाईड लेग मार्च आर्मस्ट्रेच<br>४. वाईड लेग मार्च आर्म फ्लेक्शन<br>५. वरील दोन क्रियांचे मिश्रण एकत्रीकरण<br>६. वाईड लेग मार्च विथ बोथ हॅन्ड<br>७. बोथ हँड मुव्हमेंट लेग कर्ल | ॲरोबिक्स शिकवल्याप्रमाणे योग्य कृती करतो. |
| | **विशेष व्यायाम**<br>**सूर्यनमस्कार**<br>**अंदाजे तासिका : ४** | ➢ **सूर्यनमस्कार**<br>१ ते १० अंक योग्य कृती व शरीरस्थितीकडे लक्ष द्यावे, क्रमांक चार शरीर सरळ व क्रमांक सातला शरीर पर्वतासारखे होईल याची काळजी घ्यावी. क्रमांक पाचला दोन्ही हातांचे तळवे, दोन्ही पायाचे चवडे, छाती आणि कपाळ हेच शरीराचे भाग टेकतील जमिनीला टेकतील याची दक्षता घेण्यास सांगावे. क्रमांक दोन व नऊमध्ये गुडघे वाकणार नाहीत हे पहावे. | सूर्यनमस्कार योग्य कृती, क्रमवार शरीरस्थिती करतो. |
| | **विविध व्यायाम**<br>**विशेष व्यायाम**<br>**धाडसी व्यायाम**<br>**प्रकार**<br>**अंदाजे तासिका : ८** | ➢ **धाडसी कृती**<br>सिंगल बारला लटकणे, डबल बारला लटकणे, दोराला लटकणे, झोके घेणे, जंगलजिम सवारी शिक्षकांच्या मदतीने हेड स्टँड, शिक्षकांच्या मदतीने हॅन्ड स्टॅन्ड.<br>➢ **मानवी मनोरे**<br>५–६, ८–९ विद्यार्थ्यांचे मनोरे, खांदे, कंबर, पाठ, मांडी यांवर एक पाय ठेवून उभे राहणे, हातावर, पायावर तोल सांभाळणे. | शिकवल्याप्रमाणे लटकणे, कोलांटी, रोल, मनोरे , उंचीवरून उडी, झोके घेणे इत्यादी योग्य कृती करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | **विविध व्यायाम**<br>**विशेष व्यायाम**<br>**गतिरोध मालिका**<br>**अंदाजे तासिका : ८** | ➢ **पाच ते सात अडथळ्यांची गतिरोध मालिका**<br>एका पाठोपाठ वेगवेगळे व्यायाम प्रकार व हालचाली, शरीरस्थिती, मध्ये न थांबता कमीतकमी वेळात पूर्ण करणे.<br>**वीस मीटर धावणे,** चार ते पाच कोन ठेवून त्यावरून उड्या मारत जाणे, खेकडा चाल दोन ते तीन मीटर, चार ते पाच पायऱ्या चढणे उतरणे, टायरमधून जाणे, खुर्चीवरून उडी मारून जाणे, कोलांटी उडी, खुर्ची खालून जाणे, दहा मीटर धावणे, कडी/हुला हूप उड्या, नागमोडी धावणे, हार्डलच्या खालून जाणे, जंगलजिम पार करणे, अडथळ्यांवर उडी मारणे, पायऱ्या चढणे, उतरणे, सहा ते आठ हुला हूप्स किंवा दोन हर्डल, बेंच किंवा टेबल खालून/ वरून.<br>➢ **गतिरोध मालिका :** क्षमतेनुसार विविध उपक्रम, व्यायाम प्रकार व काठिण्यपातळी वाढवावी. कमीत कमी वेळेत सर्व स्थिती, सर्व स्थान योग्य प्रकारे करण्याचे प्रोत्साहन द्यावे. गतिरोध मालिकेचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता नाही. उपलब्ध साहित्य व कल्पकतेने मालिका तयार करता येईल. गतिरोध मालिकेच्या स्पर्धा घेता येतात.<br>➢ विद्यार्थी क्षमतेनुसार कृतींची काठिण्यपातळी ठरवावी. मालिकेच्या रचनेमध्ये दमछाक करणारे उपक्रम लगातार नसावे. पायाच्या उपक्रमानंतर हाताचे उपक्रम, उडी मारण्याचा उपक्रमानंतर रांगण्याची किंवा कोलांटीचे उपक्रम अशा पद्धतीने रचना करावी. प्रगतिशील जपावी. त्याच कृती लागोपाठ नसाव्या. विद्यार्थ्यांकडून सर्जनशीलतेने नवीन मालिका तयार करून घ्याव्यात. | गतिरोध मालिकेतील सर्व अडथळे पार करतो.<br><br>सर्जनशीलतेने नवीन मालिका तयार करतो. |
| ३. | **कवायत संचलन**<br>**कवायत**<br>**अंदाजे तासिका : ६** | एक लाईन बन, कदवार एक लाईन, सावधान, विश्राम, आरामसे, कदम ताल, कदम ताल थाम, सॅल्यूट, दौडके चल, दौडके चल मे थामचा सराव घ्यावा व दृढीकरण करावे.<br>➢ दहिने मूड, बाए मूड, पिछे मूड :<br>क्रमवार घ्यावे, योग्य दिशेला वळणे शिकवावे. वळताना मागचा पाय समोर घेत आहेत याबाबत लक्ष द्यावे. पिछे मूड करताना उजवीकडून मागे वळायचे असल्याबाबत शिकवावे. वळताना हात शरीराला चिकटलेले व पाय उचलताना पायासोबत वाकत नाहीत हे तपासावे. | सर्व कवायत कृती योग्य प्रकारे करतो.<br><br>दहिने मूड , बाए मूड, पिछे मूड<br>कृती योग्य प्रकारे करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ४. | **विविध खेळ**<br>**स्थानिक व पारंपरिक खेळ**<br>**अंदाजे तासिका : ८** | ➢ **स्थानिक खेळ :**<br>स्थानिक परिसरातील खेळले जाणारे विविध खेळ विद्यार्थ्यांना खेळण्यास द्यावे. पारंपरिक खेळ टिक्करबिला, विटीदांडू, लगोरी, रप्पारप्पी, आबाधाबी, सणांचे खेळ, टिपरी, लेझीम, लोकनृत्य, विटीदांडू, गोट्या, कंचे, कवड्या, सागरगोटे स्थानिक खेळांचीही विद्यार्थ्यांना माहिती देऊन खेळण्यास उत्तेजन द्यावे.<br>➢ स्थानिक व पारंपरिक खेळ खेळताना सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग, उत्साह, शारीरिक क्षमता, मनोरंजन, खेळांचे लवचिक नियम, पर्यायी साहित्य, जागेनुसार मांडणी या बाबी लक्षात घ्याव्यात.<br>➢ **पारंपरिक खेळ :**<br>लोकगीते, लोकनृत्य यांचा वापर करून आंतरिक ऊर्जा आनंद घेतो. मनोरंजन, क्रियाशीलता, ताणतणावावर मात, संघभावनेची ओळख करून द्यावी.<br>➢ **फुगडी :**<br>पाठ फुगडी, नखुल्या फुगडी, गाठोडे फुगडी.<br>➢ **झिम्मा :**<br>कोंबड्याचा झिम्मा, लाडू झिम्मा, फेराचा झिम्मा, चुटक्याचा झिम्मा. | स्थानिक व पारंपरिक खेळातून मौज व आनंद घेतो. 'स्व' ची जाणीव, संवाद कौशल्य, समस्या निराकरण, इत्यादी जीवन कौशल्यांचा दैनंदिन जीवनात वापर करतो. स्पर्धात्मक वृत्ती, सर्जनशीलतेचा आपल्या जीवनात वापर करतो.<br>नवीन खेळ शिकतो. |
| | **विविध खेळ**<br>**लघु खेळ**<br>**अंदाजे तासिका : १२** | ➢ **स्पर्धात्मक खेळ : साहित्याविना/ससाहित्य.**<br>➢ १) पुतळ्याला शिवणे २) बीन बॅग व पुतळे ३) हूप बॉल<br>४) अग्निवर्तुळ ५) मांजर व उंदीर<br>➢ **शारीरिक सुदृढता :**<br>हृदय संवहन, दमदारपणा, ताकद, लवचिकपणा, शरीरधारणा अशा क्षमता कौशल्य विकसनाचे खेळ घ्यावे.<br>➢ **कारक कौशल्य :**<br>वेग, दिशाभिमुखता, तोल, समन्वय, प्रतिक्रिया काल अशा कौशल्य क्षमता विकसनाचे खेळ घ्यावे. | लघु खेळांमध्ये उत्साहाने सहभागी होतो.<br>क्षमता कौशल्य विकसन करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | **विविध खेळ**<br>**शर्यती**<br>**अंदाजे तासिका : १२** | ➢ **स्पर्धात्मक शर्यती : साहित्याविना/साहित्यासह**<br>➢ **नागमोडी रांगत जाणे**<br>१) शर्यत २) एकमेकांभोवती पळणे शर्यत ३) वळसा शर्यत<br>४) काठीवरून उडी शर्यत ५) चेंडू ढकलत नेणे शर्यत.<br>➢ **शारीरिक सुदृढता :**<br>हृदय संवहन, दमदारपणा, ताकद, लवचिकपणा, शरीरधारणा अशा क्षमता कौशल्य विकसनाच्या शर्यती घ्याव्यात.<br>➢ **कारक कौशल्य :**<br>वेग, दिशाभिमुखता, तोल, समन्वय, प्रतिक्रिया काल अशा कौशल्य क्षमता विकसनाच्या शर्यती घ्याव्यात. | शर्यतीमध्ये उत्साहाने सहभागी होतो.<br>क्षमता कौशल्य विकसन करतो. |
| | **विविध खेळ**<br>**मनोरंजक कृती**<br>**अंदाजे तासिका : ४** | ➢ **विविध मनोरंजक कृती :**<br>शेजारच्या विद्यार्थ्यांना टाळ्या देणे, तालावर खांदे मागे, वर, खाली करणे. हातांची बोटे फिरविणे, तालावर पाय वर खाली करणे, मान मागे–पुढे, उजवी–डावीकडे, मुठी उघड बंद करणे, डोळ्यांची बुबुळे फिरवणे. | विविध मनोरंजक कृतींमध्ये उत्साहाने सहभागी होतो. |
| | **विविध खेळ**<br>**मुख्य खेळ क्रीडा कौशल्य**<br>**अंदाजे तासिका : ३२** | ➢ दोन मुख्य खेळांची निवड करून त्या खेळाची प्राथमिक माहिती, मूलभूत कौशल्ये यांची माहिती द्यावी. कबड्डी, कराटे, सॉफ्टबॉल, हॅण्डबॉल, हॉकी, खो–खो, फुटबॉल इत्यादी मुख्य खेळ.<br>➢ इयत्तानिहाय मुलांच्या क्षमतांचा विचार करून कौशल्यांचे प्रात्यक्षिक दाखवावे. योग्य सराव करून घ्यावा. | मूलभूत कौशल्य सराव करतो.<br>उत्साहाने सहभागी होतो. |
| | **विविध खेळ**<br>**पूरक खेळ**<br>**अंदाजे तासिका : ४** | ➢ **पूरक खेळ :**<br>पासिंग, शूटिंग, कॅचिंग, पास पास, फुटबॉल, शूटिंग, चेंडू पुढे की बंडू पुढे | खेळ/कृतीमध्ये उत्साहाने सहभागी होतो. |
| ५. | **विविध स्पर्धा**<br>**अंदाजे तासिका : ८** | ➢ **विविध उपक्रमांवर आधारित विविध स्पर्धा**<br>➢ शिकविलेल्या विविध हालचाली व कौशल्ये यांच्या साहाय्याने स्पर्धा घ्याव्यात. सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग. विद्यार्थी नेतृत्व गुणाला संधी. त्यांच्यातील सुप्त गुणांना संधी व आयोजन, नियोजनात सहभागाची संधी उपलब्ध करून द्यावी. | सहकार्य, श्रमनियोजन या गोष्टी स्पर्धेतून शिकतो.<br>खिलाडू वृत्ती अंगी बाणवतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | ➢ या विविध स्पर्धांतून खिलाडू वृत्ती, आज्ञापालन, सहकार्य, समन्वय, संघभावना, शिस्त, नेतृत्व हे गुण विकसित होण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.<br>➢ विविध स्पर्धांतून विद्यार्थी जीवन कौशल्य उपयोजन योग्य पद्धतीने करतो याकडे लक्ष द्यावे. 'स्व' ची जाणीव, समानानुभूती, ताण तणावाचे नियोजन, भावनांचे समायोजन, निर्णय क्षमता, चिकित्सक विचारशक्ती, संवाद कौशल्य, वैयक्तिक संबंध इत्यादी बघावे. | |
| ६. | आरोग्य<br>आरोग्य विषयक<br>अंदाजे तासिका : २ | ➢ **आरोग्य तपासणी :**<br>विद्यार्थ्यांची शाळेद्वारा वर्षातून दोनदा संपूर्ण आरोग्य तपासणी करावी. दैनिक तासिकांमध्ये विद्यार्थ्यांची शारीरिक स्वच्छता, बाह्य अवयव, आरोग्यविषयक सवयी यांबाबत तपासणी करावी. नखे, त्वचा, नाक, डोळे, केस, दात, जीभ यांची स्वच्छता, कानाचा मळ आदींबाबत तपासणी व माहिती. | आरोग्य तपासणीचे महत्त्व जाणतो व स्वच्छता राखतो. |
| | आरोग्यविषयक<br>आहार<br>अंदाजे तासिका : २ | ➢ **चौरस आहार : आहाराच्या सवयी आहाराचा तक्ता,**<br>आहारामध्ये प्रथिने, पिष्टमय पदार्थ, स्निग्ध पदार्थ, क्षार, खनिजे, जीवनसत्त्वे, तंतूमय पदार्थ व पाणी यांचा पुरेसा समावेश आहे की नाही हे विचारणे, चौरस आहारासंबंधी मार्गदर्शन, शिळे व पेटीतील अन्नाचे दुष्परिणाम, फळभाज्या, पालेभाज्या व फळे धुऊन खाण्याचे फायदे, ऋतूमानानुसार दररोज एक फळ खाण्याचे फायदे, भरपूर पाणी पिण्याची आवश्यकता व महत्त्व.<br>➢ **पाणी पिण्याच्या योग्य सवयी :**<br>खाली बसून, तहान लागण्याच्या पूर्वी, व्यायाम करताना गरजेनुसार एक एक घोट, जेवणाच्या पूर्वी व नंतर पाणी पिणे, अति थंड पाणी टाळणे, बसून व सावकाश पाणी पिण्याची योग्य पद्धत, दिवसाला दोन ते तीन लीटर, पाच ते सहा ग्लास पाणी पिणे, शाळेत, मैदानावर स्वतःची पाण्याची बाटली ठेवण्याची सवय. | योग्य व सकस आहाराचे महत्त्व समजतो.<br>आरोग्याशी संबंधित सर्व चांगल्या सवयींची माहिती घेतो व त्यांचे पालन करतो.<br><br>पाणी पिण्याच्या सवयी/ स्वतःची पाण्याची बाटली जवळ ठेवण्याच्या सवयीचे पालन करतो. |
| | शरीरावयव<br>माहिती<br>अंदाजे तासिका : २ | ➢ **शरीर अवयवांच्या हालचाली :**<br>बाह्य अवयव तक्ता, केस, डोळे, कान, नाक, त्वचा, नखे इ.<br>**शरीरावयव तक्ता :** कोणते अवयव व कोणती कृती याची माहिती व चर्चा त्या अवयवाचा योग्य उपयोग योग्य पद्धत माहिती. | बाह्य अवयवांच्या स्वच्छतेचे महत्त्व जाणतो व स्वच्छता राखतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | **आरोग्यविषयक वैयक्तिक स्वच्छता अंदाजे तासिका : २** | ➢ **शारीरिक स्वच्छता :** बाह्य अवयव, केस, डोळे, नाक, दात, कान, नखे, त्वचा यांची स्वच्छता व निगा, आवश्यकता व महत्त्व पटवून देऊन त्याचे योग्य पालन होते का ते तपासावे, मलमूत्र विसर्जन रोखून न धरता योग्य वेळी, योग्य ठिकाणी करण्याची सवय, त्याचप्रमाणे मलमूत्र विसर्जनानंतर हात, पाय व अवयव स्वच्छ धुण्यास सांगावे, हात धुताना साबण, हँडवॉशच्या वापरासाठी प्रोत्साहित करावे.<br>➢ **कपड्यांची स्वच्छता व परिसर स्वच्छता** आपल्या कपड्यांची स्वच्छता ठेवण्यास सांगावे. परिसर स्वच्छतेचे महत्त्व चर्चा करून समजावून द्यावे. पादत्राणांची आवश्यकता, स्वच्छता पद्धत व योग्य वापराची माहिती द्यावी. | कपडे, पादत्राणे व आरोग्यासंबंधित सर्व चांगल्या सवयींची माहिती घेतो व पालन करतो. |
| | **स्वच्छतागृह वापरावयाच्या चांगल्या सवयी अंदाजे तासिका : २** | ➢ **स्वच्छतागृहाच्या वापराचे महत्त्व :** स्वच्छतागृहासंबंधी, मलमूत्र विसर्जनाची शालेय ठिकाणे स्वच्छ रहावी यासंबंधी सूचना. मलमूत्र विसर्जन रोखून न ठेवण्याच्या सूचना. स्वच्छतागृहात जाऊन मलमूत्र विसर्जनाची योग्य पद्धत मार्गदर्शन. पाण्याचा पुरेसा वापर. अवयव व हातपाय स्वच्छ धुण्याची पद्धती. | स्वच्छतागृहाच्या वापराची माहिती जाणतो व योग्य पद्धतीने पालन करतो. |
| | **विश्रांती व झोप अंदाजे तासिका : २** | ➢ **विश्रांती व झोपेची माहिती :**<br>➢ आठ ते दहा तास झोप.<br>➢ दररोज रात्री लवकर झोपणे, सकाळी लवकर उठणे, फायदे व महत्त्व यांची चर्चा.<br>➢ झोपण्याची पद्धती, सुरक्षितता, बिछाना, अंथरूण-पांघरूण व इतर सामान्य बाबींची चर्चा. | विश्रांती व झोपेचे महत्त्व जाणतो व योग्य पद्धतीने पालन करतो. |
| | **आरोग्यविषयक वाईट सवयींना प्रतिबंध अंदाजे तासिका : ४** | ➢ आहारात वडापाव, बर्गर, पिझ्झा, नुडल्स, शीतपेये यांसारखे पदार्थ आठवड्यात किती वेळा खाण्यात येतात हे विचारावे. यांसारखे खाद्यपदार्थ अतिसेवनाचे दुष्परिणाम सांगून ते खाण्यापासून विद्यार्थ्यांना परावृत्त करावे.<br>➢ विद्यार्थी दररोज किती वेळ टीव्ही पाहतात हे विचारावे. टीव्ही, कॉम्प्युटर, मोबाईलवरील खेळ व त्याच्या अतिवापरामुळे डोळ्यांवर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती द्यावी. अतिवापर होणार नाही याबाबत सतर्क करावे.<br>➢ सार्वजनिक जागी थुंकणे, कचरा टाकणे, नाक शिंकरणे, मलमूत्र विसर्जन करणे या अयोग्य सवयींबाबत माहिती देणे व योग्य सवयींचे पालन करण्यास सांगणे. | टीव्ही, शीतपेय, तयार खाद्यपदार्थ यांचे दुष्परिणाम जाणतो.<br>सार्वजनिक जागी योग्य सवयींचे पालन करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | **आरोग्यविषयक**<br>**व्यायाम**<br>**अंदाजे तासिका : ८** | ➢ **व्यायाम :**<br>दररोज मैदानावर एक ते दीड तास धावणे, उड्या मारणे, चेंडूचे विविध खेळ, सूर्यनमस्कार, विविध हालचाली, व्यायाम, शिवाशिवीचा खेळ सहकाऱ्यांसह खेळणे. यातून होणाऱ्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकासाच्या आवश्यकता व महत्त्वाची चर्चा<br>➢ **साप्ताहिक/मासिक, व्यायाम तक्ता :**<br>घरी सकाळ/सायंकाळ विद्यार्थ्यांना किमान एक तास विविध हालचाली, व्यायाम करायला साप्ताहिक/मासिक व्यायाम तक्ता देणे. | दररोज मैदानावर एक ते दीड तास धावणे, उड्या मारणे हे व्यायाम करतो.<br><br>साप्ताहिक/मासिक व्यायाम तक्त्यानुसार व्यायाम करतो. |
| | **आरोग्यविषयक**<br>**योग ओळख**<br>**अंदाजे तासिका : १६** | ➢ **योग ओळख :**<br>योगाचा अर्थ, योगाचे फायदे व महत्त्व.<br>➢ **योगाचे स्वरूप :**<br>यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधीबाबत थोडक्यात माहिती<br>➢ **आसनांच्या पूर्वतयारीसाठी विविध शारीरिक स्थिती :** लवचिकपणा, स्नायूंचा दमदारपणा, शरीराचा तोल, संतुलन, वैयक्तिक क्षमता या बाबींसाठी योग पूर्व शारीरिक तयारी. नाकाद्वारे श्वास व उच्छ्वास, फुंकर घालणे, शांत बसणे.<br>➢ **आसनांची पूर्वतयारी :**<br>फुलपाखरासारखी हालचाल, सापासारखी स्थिती, गवताच्या पात्यासारखे होणे, पर्वतासारखे होणे..<br>➢ **प्राणायामाची पूर्वतयारी :**<br>नाकाद्वारे श्वास व उच्छ्वास, फुंकर घालणे, शांत बसणे, छाती फुगवत श्वास घेणे व सोडणे जोरात फुंकर मारणे, शांत बसणे. | आसनांची, प्राणायामाची पूर्वतयारी योग्य पद्धतीने समजून घेतो.<br>यम, नियमचे पालन करतो. |
| | **आरोग्य**<br>**क्रीडांगणाची संबंधित पोशाख,**<br>**अंदाजे तासिका : २** | ➢ **हवामानानुसार पोषाख :**<br>ऋतूमानानुसार पोषाखाचे महत्त्व, पोशाख आणि संबंधित साहित्यामुळे हवामान बदलाचे समायोजनाबाबत मार्गदर्शन.<br>**हिवाळा :** कानाला मफलर, लोकरीचे स्वेटर, सुती कोट<br>**पावसाळा :** छत्री, बूट, रेनकोट व पावसापासून बचावाचे इतर साहित्य व शरीराची काळजी.<br>**उन्हाळा :** टोपी, गॉगल, फिक्या, हलक्या रंगाचे पोशाख, छत्री, डोक्याला रुमाल | हवामानानुसार पोशाख महत्त्व समजून घेतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | आरोग्य<br>**क्रीडांगणाशी संबंधित मैदान स्वच्छता**<br>**अंदाजे तासिका : ४** | ➢ **मैदान स्वच्छता :**<br>➢ मैदानाची स्वच्छता, मैदानावरील कचरा, घाण, कागद, पाण्याच्या–प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या, काड्या, काटे, काचा, चॉकलेटचे कागद, वेष्टने, खरकटे पदार्थ स्वच्छ करतात.<br>➢ मैदानाची निगा, पाणी मारणे.<br>➢ श्रममूल्यांची जोपासना पर्यावरणाची जाणीव. | क्रीडांगण स्वच्छता राखतो. |
| | आरोग्य<br>**क्रीडांगणाशी संबंधित मैदानाची सुरक्षितता**<br>**अंदाजे तासिका : २** | ➢ **मैदानाची सुरक्षितता :**<br>क्रिडांगणाच्या संबंधित सवयी, शिक्षकांच्या देखरेखीखाली मैदान स्वच्छता करावे. खेळण्याच्या जागी मैदानावर घाण, खरकटे, कागद, चॉकलेटचे कागद, पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या व दगड इत्यादी वस्तू असल्यास उचलून कचरापेटीत टाकण्यास सांगावे. त्यामुळे स्वच्छता व पर्यावरणाची जाणीव विद्यार्थ्यांना होईल व सामाजिक मूल्येही समजतील. हालचालींसाठी हवामानानुसार योग्य असे सुती कपडे आहेत की नाही ते पहावे. मैदानावर योग्य क्रीडा साहित्य ठेवावे. योग्य साहित्य वापरासंबंधी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात व त्याचे पालन करून घ्यावे. अंधारी जागा, कमी वर्दळ असलेली जागा, रस्त्यालगत असलेल्या अंधाऱ्या जागेत विद्यार्थ्यांना सोडू नये अशा सूचना द्याव्यात. मैदानावर कोणत्याही प्रकारची इजा झाल्यास, चक्कर आल्यास किंवा बरे वाटत नसल्यास शिक्षकांना सांगणे याविषयी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात. | मैदानाची निगा राखतात. सुरक्षितता पद्धती व महत्त्व समजून घेतो. |
| | आरोग्य<br>**क्रीडांगणाशी संबंधित प्रथमोपचार**<br>**अंदाजे तासिका : २** | ➢ **रक्तस्रावावर प्रथमोपचार :**<br>रक्तस्राव होण्याची कारणे, रक्तस्त्राव झाल्यावर मदत करण्याची पद्धती, रक्त थांबवण्यासाठी योग्य उपचार पद्धती, प्रथमोपचार पेटी साहित्याचा वापर, जखम व अवयवांची काळजी व निगा. | सामान्य रक्तस्त्रावावर प्रथमोपचार पद्धती जाणतो. |
| ७. | **कृतिशील जीवनशैली** | कृतिशील जीवनशैली म्हणजे दैनंदिन जीवनात कृतिशील राहणे, विविध कार्य आवडीने करणे आणि फावल्या वेळेचा सदुपयोग करून खेळ, व्यायाम अशा शारीरिक हालचाली किंवा एखादा छंद जोपासणे. मैदानावर खेळणे, पदभ्रमण, दैनंदिन सूर्यनमस्कार, व्यायाम आदी उपक्रम हे कृतिशील जीवनशैलीचा भाग आहेत. | कृतिशील जीवनशैली, छंद जोपासतो. जीवनात कृतिशील राहतो, विविध कार्य आवडीने करतो. |

■■■

# पूरक उपक्रम




**मुख्य खेळ :**

पूरक उपक्रमांमध्ये मुख्य खेळातील विविध क्षमता आणि मूलभूत कौशल्य खेळण्याची पद्धती याबाबत विद्यार्थ्यांना स्वतंत्र माहिती द्यायची आहे. यातून विविध शारीरिक सुदृढता व कारक कौशल्यांचा विकास घडून येईल हा उद्देश समोर ठेवावा. कबड्डी, खो–खो, हँडबॉल, व्हॉलीबॉल, सॉफ्टबॉल, फुटबॉल, बॅडमिंटनसारख्या विविध खेळांची इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना साजेशी खेळाची माहिती, मैदान व क्रीडा साहित्याची माहिती, खेळाडू व पुरस्कारांची माहिती व मूलभूत कौशल्यांची माहिती द्यावी.

मूलभूत कौशल्यांचा प्राथमिक स्तरावर हालचालींचा सराव करून घ्यावा. मुख्य खेळाचे व्हिडिओ, क्रीडा कौशल्यांचे व्हिडिओ, चित्रे दाखवून योग्य हालचाली व कौशल्य प्राप्तीचे प्रयत्न करता येतील.

**क्रीडा स्पर्धेत सहभाग :**

गटागटांच्या आंतरवर्गीय विविध हालचाली, व्यायाम, शरीरस्थिती, उपक्रम व क्रीडा कौशल्यांच्या स्पर्धा व शर्यतीत विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. सर्व विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत सहभागी होतील व आपल्या क्षमतांचा परिचय करून देतील यासाठी दक्ष असावे. क्रीडा स्पर्धा सहभागातून त्यांची आंतरिक ऊर्जा व समूह सहभागाच्या प्रयत्नांना बळकटी प्राप्त करून द्यावी.

**शाळाबाह्य उपक्रम :**

विविध सहली, भ्रमंती, पदभ्रमण, गिर्यारोहण, बगीचे व क्रीडा मैदान भेटी, विविध क्षेत्रभेटी या शाळाबाह्य उपक्रमांतून विद्यार्थ्यांना कृतिशील जीवन शैलीसाठी प्रोत्साहित करावे. विविध प्रकारचे छंद जसे वृक्षारोपण, सायकल चालवणे, घरातली कामे, बागकाम आदी बाबींमध्ये फावला वेळ सत्कारणी लावण्यास सांगावे. शाळाबाह्य उपक्रमांतून विविध शारीरिक क्षमता, कारक कौशल्ये तसेच सामाजिक गुण यांचा एकत्रितपणे विकास होतो याकडे लक्ष द्यावे.

■■■

## विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी

ज्या विद्यार्थ्यांमध्ये काही शारीरिक अथवा मानसिक कमतरता आढळून येते त्या विद्यार्थ्यांविषयी त्यांच्या कमतरतेचा बाऊ न करता त्यांना सर्वसामान्य शिक्षण प्रवाहात सामावून घेता येते. त्यांचा आत्मविश्वास व जगण्यातील आनंद वाढवण्यासाठी त्यांना शारीरिक शिक्षणातील विविध उपक्रमांत सामावून घेता येते.

या विद्यार्थ्यांना सामावून घेताना त्यांच्या कमतरतेचा प्रकार, प्रमाण इत्यादी बाबींचा विचार करावा.

**ताकद व दमदारपणा कमी असणाऱ्यांसाठी**

- पायात दोष असल्यास विद्यार्थ्यांना चेंडू रिंगमधून टाकण्यासाठी अंतर व उंची कमी करून संधी.
- फटकावण्यासाठीचे साहित्य वजनाने कमी करून किंवा लांबी व रुंदी कमी करून वापरण्यास देता येते.
- रूपांतरित खेळ नियम सोपे करून घेता येऊ शकतात.

**समन्वय कमी असणाऱ्यांसाठी**

- विद्यार्थ्यांना हवेतून येणाऱ्या वस्तूचे भय वाटते. त्यांना संरक्षणात्मक आयुधे लावून खेळात सहभाग घेता येतो.
- अचूकतेवर कमी भर देणाऱ्या कृतींचा समावेश. उदा. बीन बॅग उचलणे, फेकणे, वाहून नेणे इत्यादी.
- स्थिर वस्तूवर प्रयोग करून आघाताच्या क्रिया आत्मसात करण्यास शिकवता येते. उदा. भिंतीवर चेंडू मारणे.
- तोल सांभाळायचा आहे त्याच्या आधाराची जाडी व रुंदी वाढवून/अंतर व उंची कमी करून कृती घेता येते.
- जास्तीत जास्त शरीरावयव जमिनीशी स्पर्श करतील अशा कृती करून घेता येतात. उदा. साईड रोल, हात व पायांवर चालणे इत्यादी.
- गुळगुळीत फरशी नसावी. मॅटवर विविध हालचाली करून घ्याव्यात. उदा. उड्या मारणे, रोल करणे इत्यादी.
- सहकाऱ्याचा आधार जास्तीत जास्त राहील अशा पद्धतीच्या कृतींचा समावेश करता येतो. उदा. जोडीदाराबरोबर करायचे विविध व्यायाम.

**बोधात्मक व आकलनात्मक दोष असणाऱ्यांसाठी**

- जास्तीत जास्त सोप्या पद्धतीचे प्रकार/कृतीवर भर द्यावा. क्रीडा साहित्याची ने-आण व वाटप करणे, वर्गीकरण करणे, विविध प्रकारचे चेंडू हाताळणे, कवायतीचे सोपे प्रकार करणे इत्यादी.
- अधिकाधिक सुटसुटीत सूचना देऊन सावकाश करण्यात येणाऱ्या कृतींवर भर देण्यात यावा. उदा.

ठरावीक अंतर चालणे, चेंडू पास करणे, लटकणे इत्यादी.

- दैनंदिन अध्यापनात विचार करून त्यांना सामावून घेता येते, त्यांच्या कमतरतेचा विचार करून त्यांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या व कामांमध्ये सहभागी करून घेतल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यासाठी फार वेगळा वेळ देण्याची गरज नाही.

  काही उदाहरणे : पायाच्या संदर्भात कमतरता असणाऱ्या विद्यार्थ्यास वेळाधिकारी, गुणलेखक इत्यादी बनण्याची जबाबदारी देता येते. तसेच हाताने खेळायच्या खेळांत त्यांना सामावून घेता येते. उदा. चेंडू टाकणे, फेकणे, घेणे इत्यादी. अंध विद्यार्थ्यांना घुंगराच्या चेंडूने खेळात सामावून घेता येते.

  कमतरतेची तीव्रता, त्या विद्यार्थ्यांची मानसिकता इत्यादी बाबी लक्षात घेऊन उपक्रम घ्यावेत. इतर सामान्य विद्यार्थ्यांना अशा मुलांना सामावून घेण्यास सांगावे. त्या विद्यार्थ्यांना चिडवणे, त्रास देणे हे प्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

■■■

# आरोग्य व शारीरिक शिक्षण : नियोजन

आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयासाठी महिन्याला अंदाजे २० ते २४ तासिका उपलब्ध होतात तर एकूण वर्षात एकूण १८० ते २०० तासिका मिळतात. अभ्यासक्रमातील घटकांचे वार्षिक नियोजन करताना दिलेल्या सर्व घटकांना योग्य न्याय व भारांश दिला गेला आहे याकडे लक्ष द्यावे. तासिकेमध्ये विद्यार्थ्यांच्या आनंददायी वातावरणात भरपूर मुक्त शारीरिक हालचाली होतील व मनोरंजनातून सुदृढता, वाढ व क्षमता प्राप्त होईल असे नियोजन असावे. विविध हालचाली, उपक्रम, प्रात्यक्षिक, गटकार्य, वर्गकार्य, खेळ व शर्यती, व्यायाम यांचे नियोजन वेळ व घटकानुसार आपल्याकडील उपलब्ध मैदान, जागा, साहित्य, परिसरातील पद्धती व परंपरा यांचा विचार करून याची आखणी करावी. वार्षिक व मासिक नियोजन करताना महिन्यातील चार आठवड्यांमध्ये असलेल्या प्रत्येक तासिकेमधून कोणत्या घटकातील कोणत्या उपघटकांचा उपक्रम घेणार याचे सूक्ष्म नियोजन केल्यास त्यानुसार तासिका घेणे, साहित्य जमवणे, रेखांकन व इतर आवश्यक तयारी करणे सोपे जाते. इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गांचे नियोजन करताना समसमान घटकांचा त्या ठरावीक आठवड्यात विचार केल्यास एकाच प्रकारचे साहित्य, मैदान रेखांकन, पर्यायी साहित्य व तासिकेसाठी केलेली तयारी ही इतर ही वर्गांना/शाळेतील सर्व वर्गांना आरोग्य व शारीरिक शिक्षण तासिकेसाठी उपयोगी पडू शकते.

अभ्यासक्रमातील सर्व घटक-उपघटक तसेच क्षमता-कौशल्यांचा विचार करून आपल्या पद्धतीने सुयोग्य नियोजन करावे. अभ्यासक्रमातील सर्व घटक, उपघटक तसेच क्षमता, कौशल्यांचा विचार करून सर्व अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांना प्राप्त होतील असे नियोजनाचे उद्‌दिष्ट असावे.

| वार्षिक व मासिक नियोजन नमुना | | | | |
|---|---|---|---|---|
| **महिना** | **पहिला आठवडा** | **दुसरा आठवडा** | **तिसरा आठवडा** | **चौथा आठवडा** |
| जून | --------- | -------- | विविध मनोरंजक<br>सांघिक खेळ<br>कवायत संचलन | आरोग्य तपासणी<br>वजन उंची मापन<br>स्वयं-मूल्यमापन |
| जुलै | उत्तेजक व्यायाम<br>जागेवर मूलभूत<br>हालचाली | सूर्यनमस्कार<br>तालबद्ध कवायत | एबीसी ड्रिल्स<br>लघु खेळ | आरोग्य<br>आरोग्यदायी सवयी<br>योग्य शरीरस्थिती |
| ऑगस्ट | जागा बदलत<br>मूलभूत हालचाली<br>अनुकरणात्मक चाली | क्रीडा कौशल्य खेळ १<br>धाडसी व्यायाम | एबीसी ड्रिल्स<br>विविध शर्यती | आरोग्य<br>योग्य शरीरस्थिती |
| सप्टेंबर | सहकाऱ्यांसह मूलभूत<br>हालचाली<br>साहित्यासह मूलभूत<br>हालचाली | क्रीडा कौशल्य खेळ २<br>ॲथलेटिक्स | एबीसी ड्रिल्स<br>पारंपरिक खेळ | आरोग्य<br>सूर्यनमस्कार |

| महिना | पहिला आठवडा | दुसरा आठवडा | तिसरा आठवडा | चौथा आठवडा |
|---|---|---|---|---|
| ऑक्टोबर | अनुकरणात्मक चाली<br>धाडसी व्यायाम | क्रीडा कौशल्य खेळ १<br>तालबद्‌ध व्यायाम | स्थानिक खेळ<br>गतिरोध मालिका | आरोग्य<br>कवायत संचलन |
| नोव्हेंबर | उत्तेजक हालचाली<br>सूर्यनमस्कार | क्रीडा कौशल्य खेळ २<br>जिम्नॅस्टिक | पूरक खेळ<br>परावर्तित खेळ | आरोग्य स्वयं-मूल्यमापन<br>वजन व उंची मापन |
| डिसेंबर | धाडसी व्यायाम<br>अनुकरणात्मक<br>हालचाली | क्रीडा कौशल्य खेळ १<br>तालबद्‌ध व्यायाम | लघु खेळ<br>सुदृढता कसोट्या<br>कारक क्षमता कसोट्या | आरोग्य<br>मनोरंजक कृती |
| जानेवारी | कवायत संचलन<br>जागेवर हालचाली स्पर्धा | क्रीडा कौशल्य खेळ २<br>ॲथलेटिक्स | विविध शर्यती<br>अनुकरणात्मक<br>हालचाली | आरोग्य<br>सूर्यनमस्कार |
| फेब्रुवारी | धाडसी व्यायाम<br>जागा बदलत हालचाली<br>शर्यत | क्रीडा कौशल्य खेळ १<br>तालबद्‌ध व्यायाम | पारंपरिक खेळ<br>मानवी मनोरे | आरोग्य<br>योग्य शरीरस्थिती |
| मार्च | सूर्यनमस्कार<br>सहकाऱ्यांसह हालचाली<br>शर्यती | क्रीडा कौशल्य खेळ २<br>जिम्नॅस्टिक | स्थानिक खेळ<br>गतिरोध मालिका | आरोग्य<br>कवायत संचलन |
| एप्रिल | वैयक्तिक खेळ<br>दोघांच्या शर्यती | सांघिक खेळ<br>कारक क्षमता कौशल्य<br>चाचणी | गटाच्या शर्यती सुदृढता<br>कसोटी चाचण्या | आरोग्य तपासणी<br>स्वयं-मूल्यमापन |

हा नियोजनाचा नमुना असून यानुसार आपले स्वतंत्र नियोजन करावे. शैक्षणिक वर्षातील सुट्‌टीच्या कालावधीतील तासिकांचे योग्य समायोजन करावे. खेळांची निवड करताना उपलब्ध साधने, मैदान व स्थानिक परंपरांचा विचार करावा. आपल्याकडील मैदान, साहित्य, परंपरा यांचा विचार करून मुख्य खेळ, लघु खेळ यांची निवड करावी. अभ्यासक्रमातील सर्व क्षमता विविध उपक्रमांद्‌वारे विद्यार्थ्यांपर्यंत उद्‌देशानुरूप पोहोचतील असे पहावे.

■■■

# आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे मूल्यमापन

इयत्ता चौथीच्या आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांच्या कृतींचे मूल्यमापन हे आनंददायी व ताणरहित वातावरणात करावे. कृतींचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांची शरीरस्थिती, कृती करण्याची पद्धती, कृतीची योग्यता, अचूकता, क्रमबद्धता, कृती करतानाची शारीरिक सहजता, आत्मविश्वास, कृती करण्याची शैली या बाबींचे निरीक्षण करून योग्य गुणांकन करता येईल. मूल्यमापनासाठी उपक्रम, कृती निवडत असताना सदर उपक्रम आणि कृती योग्य रितीने शिकवून व सराव करून झाल्याचे निश्चित करावे. त्यानुसार त्या कृतींचे मूल्यमापन करण्याचे निकष ठरवून त्यानुसार मूल्यमापन करावे.

आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे मूल्यमापन हे आकारिक तंत्रांनी करणे अपेक्षित आहे. किमान तीन आकारिक साधन तंत्रे वापरून प्रत्येक सत्राचे शेवटी मूल्यमापन करायचे आहे. मूल्यमापन करताना उपक्रमातील सहभाग, उत्साह, विद्यार्थ्यांची कृती, त्याची अध्ययन निष्पत्ती, कृती आणि कौशल्यांचा योग्य वापर, तुलनेने वाढलेली क्षमता व कौशल्यामधील प्रगती यांचा विचार मूल्यमापन करताना करता येईल.

दैनंदिन तासिकांमधील कृती, प्रात्यक्षिके, उपक्रम, दिलेले वर्गकार्य, गृहकार्य, प्रकल्प या सर्वांचा मूल्यमापनमध्ये समावेश करता येऊ शकतो. वैयक्तिक कौशल्य, वैयक्तिक खेळ, सांघिक खेळ, हालचालीची काठिण्यपातळी, विविध शारीरिक सुदृढतेचे व कारक कौशल्याच्या घटकांचे मापन करणे अपेक्षित आहे.

आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाच्या आकारिक मूल्यमापनासाठी साधारणपणे पुढील आठ तंत्रे वापरता येतात. या तंत्रांचा उपयोग करून सुयोग्य पद्धतीने विद्यार्थ्यांचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ पद्धतीने व्हावे अशी अपेक्षा आहे. तासिकेच्या वेळी विविध हालचाली, कृती, खेळांचे अनुभव देत असताना त्याच वेळी सातत्यपूर्ण सर्वंकष पद्धतीने मूल्यमापन प्रक्रिया राबवायची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची सर्वोत्कृष्ट गुणांकनाची नोंद करता येऊ शकते.

**आकारिक मूल्यमापनाची तंत्रे**

१) दैनंदिन निरीक्षण
) तोंडी काम
३) प्रात्यक्षिक
४) उपक्रम किंवा कृती
५) प्रकल्प
६) चाचणी कसोटी
७) स्वाध्याय
८) गटकार्य
९) वर्गकार्य
१०) इतर (स्वमूल्यमापन, प्रश्नावली, पदनिश्चयन श्रेणी, कृती मूल्यमापन, समाजमिती तंत्र)

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शक हस्तपुस्तिका २०१२ तयार केलेली आहे. मूल्यमापन संदर्भात या पुस्तिकेचा संदर्भ शिक्षकांनी घ्यावा.

■■■

# अधिक माहिती व आवश्यक संदर्भासाठी

अधिक माहिती व आवश्यक संदर्भासाठी खालील शासकीय प्रकाशने वाचावीत. त्याचप्रमाणे विविध संस्थांद्वारे आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयीची माहिती देणारी नियतकालिके वाचणे फायद्याचे ठरते.

- 'शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिका' इयत्ता तिसरी, बालभारती, पुणे.
- 'लघु खेळ', बालभारती, पुणे.
- 'शालेय उपक्रम', बालभारती, पुणे.
- 'आरोग्य व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२', विद्या परिषद, पुणे.
- इंटरनेटवर उपलब्ध माहिती स्रोत.

इंटरनेटवर विषयाची माहिती देणारी विविध संकेतस्थळे उपलब्ध आहेत. आपल्याला हव्या असलेल्या माहितीबाबत शोध घेतल्यावर आपल्याला PPT, PDF, व्हिडिओ, फोटो, चित्रे, रेखांकने या स्वरूपात माहिती उपलब्ध होते. त्याचा वापर करून आपण आपली आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची तासिका अधिक प्रभावी करू शकतो.

उदाहरणादाखल काही संकेतस्थळे व व्हिडिओ चॅनल दिले आहेत.

- यू–ट्यूब
  1) https://www.youtube.com/user/Nasirgavandi077
  2) https://youtu.be/oc4QS2USKmk
  3) https://youtu.be/skSbg1IGup8
  4) https://youtu.be/dQ_PK7Z-vv4
- विकासपिडिया
  https://mr.vikaspedia.in/education/kids-zone/916947933

■■■

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय – कार्यानुभव

## संवाद शिक्षक मित्रांशी

NCF 2005, SCF 2010, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण पुनर्रचित अभ्यासक्रम आराखडा २०१२ यानुसार तयार झालेला अभ्यासक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबवला जात आहे. आधुनिक जगाची गरज, प्रगत तंत्रज्ञानाचा जगभर वापर, संपूर्ण जग हे जवळ आलेले आहे. या सर्व बाबींमुळे आपल्या विद्यार्थ्यांना एका विशिष्ट उंचीचे शिक्षण मिळावे, कृतिशीलता, इतर विषयांशी समवाय सांगणारा, अभिव्यक्तीसाठी संधी देणारा, सखोल विचार करण्यावर भर असलेला, सहज–सुलभ उपलब्ध होणारा, प्रवाही, गुणवत्तापूर्ण, समतेवर आधारित, विद्यार्थी अनेक पर्याय देऊ शकतील अशी क्षमता निर्माण करणारा आंतरराष्ट्रीय शाळांसाठीचा अभ्यासक्रम तयार आहे. या अंतर्गत कार्यानुभव या विषयातील घटकाची निवड, अध्ययन–अध्यापन, मूल्यमापन या सर्व प्रक्रियेमध्ये आपल्या सर्वांना खारीची छोटी मदत व्हावी म्हणून हा प्रपंच आहे.

खेळू, करू, शिकू  या विषयाची इयत्ता तिसरीपर्यंत बालभारतीची तीन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका आपल्या वापरासाठी उपलब्ध आहेत या सर्वांचा सेतू निर्माण करण्यासाठी आम्ही आपल्या सर्वांना मैत्रीपूर्ण मदत करीत आहोत. आंतरराष्ट्रीय शालेय स्तरावर अध्ययन अध्यापनासाठी खेळू (आरोग्य व शारीरिक शिक्षण), करू (कार्यानुभव), शिकू (कला शिक्षण) असे तीन स्वतंत्र विषय आहेत. या तीनही विषयांचे अध्ययन–अध्यापन आपल्याला शासनाने निर्धारित केलेल्या तासिकांमध्ये स्वतंत्रपणे करायचे आहे. सदर मार्गदर्शिकेमध्ये त्यासाठी तिन्ही विषयांचे स्वतंत्र घटक, अभ्यासक्रमाची उद्‌दिष्टे, अध्ययन निष्पत्ती, अध्ययन अनुभव, कृती क्रम, माहिती मिळवण्याचे संदर्भस्रोत, घटक पूर्ण करण्यासाठीचे आणखी सोपे पर्याय, घटकांचा इतर विषयांशी समवाय कसा साधायचा आणि मूल्यमापन कसे करायचे यांचे निर्देश दिलेले आहेत.

कार्यानुभव या विषयाचे अनिवार्य उपक्रम ४०% भारांश आणि ऐच्छिक उपक्रम ६०% भारांश असे दोन भाग केले आहेत. त्या पद्‌धतीने वर्षभर घटकांची निवड व कार्यवाही ही आपण विद्यार्थ्यांच्या परिसरातील भौगोलिक परिस्थिती, साहित्य, साधनांची उपलब्धता यानुसार करणार आहोत. अनेक नमुना उपक्रम सुचवलेले आहेत तरीही आपल्याला विविध उपक्रम अभ्यासक्रमाच्या उद्‌दिष्टांनुसार आणि आराखड्यानुसार आयोजित करावयाचे असून विद्यार्थ्यांना आनंद मिळवून देणे हे आपले अंतिम ध्येय आहे.

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी उपक्रमातील घटकांची काठिण्यपातळी वाढवलेली आहे. घटक, अभ्यासक्रमाची उद्‌दिष्टे, अध्ययन अनुभव, मूल्यमापन यांच्यात समवाय राखणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना शिक्षकांबरोबरच पालकांचे, परिसरातील स्थानिक कारागिरांचे मार्गदर्शन घेऊन आणखी आनंद मिळवता

आला पाहिजे. समाजोपयोगिता या अभ्यासक्रमाचा आत्मा असून कार्यजगताचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना स्वतःच्या करिअरच्या वाटा शोधण्यासाठी आणि वैयक्तिक आरोग्य जपण्यासाठी अभ्यासक्रम साहाय्यभूत ठरणार आहे. आयोजित केलेल्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना अभिव्यक्त व्हायला पुरेपूर स्वातंत्र्य द्यायला हवे त्याचबरोबर कृतीच्या संस्कारांतून त्यांच्या मन, मस्तिष्क व हातांच्या बोटांना कौशल्यपूर्ण काम मिळायला हवे.

आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमांच्या शाळांमध्ये कार्यानुभव हा विषय विद्यार्थ्यांपर्यंत नेताना सर्वप्रथम आपल्याला अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पहावी लागतील. आराखडा व त्यानुसार नियोजन काळजीपूर्वक पाहायला हवे. लवचिकपणा या धोरणामुळे घटकांची निवड करण्याचे आपल्याला विद्यार्थ्यांचा परिसर, उपलब्ध साधनसुविधा यानुसार स्वातंत्र्य आहे. घटक पूर्ण करताना सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या क्षमतेनुसार, स्वतंत्रपणे अथवा सांघिक रितीने काम करता यावे, आनंद मिळावा, जीवनासाठी उपयुक्त कार्यकौशल्ये मिळावी असा प्रयत्न आपण सर्व मिळून करणार आहोत. त्यासाठी अनेक लिंक्स (व्हिडिओ, ऑडिओ) चित्र, विविध प्रकाशनांचे चित्रसंग्रह मिळण्याचे सूचक उपलब्ध करून देत आहोत. घटक आणखी कल्पकतेने कसा विद्यार्थ्यांपर्यंत नेता येईल असेही सूचक देत आहोत.

या शिक्षक हस्तपुस्तिकेमध्ये कार्यानुभव विषयाची उद्दिष्टे, क्षेत्रे, सर्व उपक्रम, कृतिक्रम, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (आकारिक) या प्रणालीवर आधारित मूल्यमापनाचे निर्देश यांचा समावेश केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या आवडीला, त्यांच्या स्वतंत्र कृतीला, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कृतींना भरपूर वाव आहे. आधुनिक माध्यमांच्या वापराबरोबरच जीवन कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवावीत यासाठीचे विशेष उपक्रम दिलेले आहेत. खूप सफाईदारपणा अपेक्षित नाही, पण निर्मितीचा आनंद मिळावा म्हणून त्यांना भावतील, झेपतील, आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची तुलना होऊ शकेल असे उपक्रम घ्यावेत. विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला भरपूर वाव द्यावा. भाषा, गणित, परिसर अभ्यास, कला, आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयांशी समवाय साधण्यासाठीच्या बाबीही दिलेल्या आहेत.

कार्यानुभव (करू) अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय शाळांच्या स्तरावर यशस्वीपणे राबवण्यासाठी आपणां सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा...!!

■■■

# कार्यानुभव विषयाची ठळक उद्‌दिष्टे

१) **श्रमप्रतिष्ठा :** श्रम आणि कौशल्ये यांवर आधारित कामे करणे, तसेच श्रमजीवी लोकांबद्‌दल आदराची भावना ठेवून त्यांचा सन्मान करणे.

२) **उद्योजकतेचे शिक्षण :** विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेविषयी असलेल्या सुप्त गुणांचा विकास करणे, तसेच उपजत असलेल्या गुणांना वाव देऊन उद्योजकतेविषयीचे आवश्यक ज्ञान देणे.

३) **जीवनक्षमता विकसित करणारी कौशल्ये :** विद्यार्थ्यांच्या गरजा व समस्या यांच्याशी निगडित उपक्रमांद्‌वारे निरोगी व आनंदमय जीवन जगण्यासाठी कौशल्ये विकसित करण्यास मदत करणे.

४) **समाजोपयोगिता व कार्यजगत :** कार्यानुभवातील उपक्रमांतून समाजातील उद्योगमूलक कार्याची ओळख करून घेण्याची संधी प्राप्त करून देणे आणि समाज विकसनासाठी त्यांचा उपयोग करण्याची क्षमता निर्माण करणे.

५) **कार्यातील स्व–भूमिकेची समज :** विविध उपक्रमांतील कार्य निश्चितीनंतर, त्या कार्यातील स्वभूमिका समजावून घेऊन त्यातील कार्यकारणभाव, शास्त्रीय तत्त्वे व क्रमवारीता यांची माहिती घेणे.

६) **अर्थोत्पादन क्षमता :** उत्पादक उपक्रमांचा सराव करीत असताना, विद्यार्थ्यांमध्ये उत्पादनास आवश्यक अशी प्राथमिक कौशल्ये निर्माण करणे व शक्य तेथे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात मर्यादित अर्थोत्पादन करण्याची क्षमता निर्माण करणे.

७) **कार्यकौशल्य विकास :** उत्पादक कार्यातील सुबकता, अचूकता, आकर्षकता, गती, निर्मिती, प्रदर्शन व विक्री यांबाबतची कौशल्ये विकसित करणे.

८) **कार्यसंस्कृतीचे जतन व संवर्धन :** परिसरातील विविध कार्यांची ओळख करून घेणे, सामाजिक रूढी, परंपरा आणि प्रथा यांच्यामागील कार्याची ओळख करून घेणे, कार्यकारणभाव जाणून त्यांचे जतन व संवर्धन करण्यास मदत करणे.

९) **अनिवार्य उपक्रम :** सर्व शाळांमध्ये उपक्रमांच्या बाबतीत एकसूत्रीपणा आणण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये समाजोपयोगी कार्याची वृत्ती जोपासण्यासाठी अनिवार्य उपक्रमांची योजना करणे.

१०) **कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव :** अनिवार्य उपक्रमांतून तसेच उत्पादक उपक्रमांतून पर्यावरण संरक्षण व संवर्धन यांची जाणीव निर्माण करणे.

■■■

# कार्यानुभव उपक्रमांचे स्वरूप व आराखडा

## कार्यानुभव विषयाचे स्वरूप व भारांश

इयत्ता : पहिली ते आठवी

**अनिवार्य उपक्रम (४०%)**

| गरजाधिष्ठित उपक्रम (२०%) | अभिरुचिपूरक उपक्रम (१०%) | कौशल्याधिष्ठित उपक्रम (१०%) |
|---|---|---|

**ऐच्छिक उपक्रम (६०%)**

| उत्पादक क्षेत्रे (६०%) | तंत्रज्ञान क्षेत्रे (६०%) | इतर क्षेत्रे (६०%) |
|---|---|---|

## ऐच्छिक उपक्रम

(अ) उत्पादक क्षेत्रे : क्षेत्र : अन्न
क्षेत्र : वस्त्र
क्षेत्र : निवारा

(ब) तंत्रज्ञान क्षेत्रे : माहिती तंत्रज्ञान

(क) इतर क्षेत्रे : शेतीपूरक व्यवसाय (पशू-पक्षी संवर्धन)

स्थानिक परिस्थिती आणि उपलब्ध साधन-सुविधा लक्षात घेऊन उपक्रमांची निवड इतर क्षेत्रांमध्ये करता येईल. त्यासाठी नवीन उपक्रमांचा अभ्यासक्रम करून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांची मान्यता घ्यावी.

## अनिवार्य उपक्रम (४०%)

| गरजाधिष्ठित उपक्रम | अभिरुचिपूरक उपक्रम | कौशल्याधिष्ठित उपक्रम |
|---|---|---|
| १. संस्कृती आणि कार्यजगताची ओळख<br>२. जलसाक्षरता<br>३. आपत्ती व्यवस्थापन<br>यांतील प्रत्येक उपक्रमाचा स्वतंत्र अभ्यासक्रम दिलेला आहे. तो संपूर्ण अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण करून घ्यावा. | (इयत्तावार दिलेल्या अभिरुचिपूरक उपक्रमांपैकी वर्षभरात किमान दोन उपक्रम विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करून घ्यावेत. | (इयत्तावार दिलेल्या कौशल्याधिष्ठित उपक्रमांपैकी वर्षभरात किमान दोन उपक्रम विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करून घ्यावेत. |

## ऐच्छिक उपक्रम
**(इयत्ता : पहिली ते पाचवी)**

या उपक्रमांतर्गत दिलेल्या तीन क्षेत्रांची निवड करावी. ही निवड उपलब्ध साधन-सुविधा व विद्यार्थ्यांची आवड व गरज लक्षात घेऊन करावी.

उत्पादक क्षेत्रांची निवड केल्यास अन्न, वस्त्र, निवारा या उपक्षेत्रांतून दिलेल्या प्रत्येकी एका उपक्रमाची निवड करणे अनिवार्य आहे, म्हणजे उत्पादक क्षेत्रात वर्षभरात एकूण तीन उपक्रम पूर्ण करून घ्यायचे आहेत.

## पाठ्यक्रमातील अनिवार्य उपक्रम

### विषय : कार्यानुभव (करू) : अनिवार्य उपक्रम

**उपक्रम –** गरजाधिष्ठित उपक्रम (जलसाक्षरता) **अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** पाण्याचे विविध उपयोग.

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| १. कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव.<br>२. अनिवार्य उपक्रम. | १. पाण्याचे दैनंदिन जीवनातील महत्त्व जाणतो.<br>२. पाण्याचे विविध उपयोग सांगतो.<br>३. अशुद्ध पाण्याचे दुष्परिणाम सांगतो.<br>४. पाण्याची काटकसर करण्याचे पर्याय सांगतो.<br>५. घरी आणि शाळेत पाणी जपून वापरतो.<br>६. एकत्रितपणे घरी व परिसरात इतरांनी पाणी जपून वापरावे यासाठी प्रयत्न करतो. | १. पाणी हे सर्व सजीवांचे जीवन आहे अशी पाण्याविषयी जाणीव जागृती निर्माण करावी.<br>२. पाण्याविषयी कविता, गाणी तालासुरात गाऊन घ्यावी.<br>३. पाण्यासंबंधी म्हणी–घोषवाक्य तयार करून त्यातून पाण्याचे महत्त्व स्पष्ट करायला सांगावे.<br>४. पिण्यासाठी शुद्ध पाणी व स्वच्छतेसाठी पाण्याची गरज आहे, हे विविध उदाहरणे देऊन व्हिडिओतून दाखवून द्यावे. | **भाषा :**<br>पाण्याविषयी कविता, कवितांचा संग्रह, म्हणी, घोषवाक्ये यांचा संग्रह, निबंध लेखन यामुळे शब्दसंपत्ती वाढते.<br>भाषा विकास.<br>**गणित :**<br>पाण्याचा काटकसरीने वापर, कमी–जास्तपणा; अर्धा, पाव, पाऊण संबोध, मापन.<br>**परिसर अभ्यास :**<br>पाण्याचे उपयोग. | **Online Books :**<br>http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>DIKSHA Mobile App<br>https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app<br>**कार्यानुभव :**<br>शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता चौथी<br>खेळू, करू, शिकू<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. | १. पाण्याविषयी कविता तयार करता येईल.<br>२. म्हणी, घोषवाक्य यांचा संग्रह करता येईल.<br>३. वर्गात भिंतीवर पाण्यासंबंधी माहिती असलेले तक्ते लावता येतील.<br>४. पाण्याचे उपयोग या संदर्भाने चित्रकला स्पर्धा आयोजित करता येईल.<br>५. जलसाक्षरता या विषयावर जलदिन २२ मार्च यानिमित्ताने |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | ७. इतर देशातील पाणी समस्या याविषयी माहिती घेतो. | ५. शुद्ध व अशुद्ध पाण्यातील फरक, अशुद्ध पाण्याचे दुष्परिणाम व पाणी शुद्धीकरणाच्या पद्धती यांची ओळख करून द्यावी.<br>६. पाण्याचा पुनर्वापर उदा.परसबागेला भाजी धुतलेले पाणी झाडांना घालणे अशा कृती करण्यास प्रवृत्त करावे.<br>७. पाण्याचे विविध उपयोग यांविषयी चर्चा करावी.<br>८. विविध चित्रांचा संग्रह वापरावा.<br>९. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा हा गोष्टीतून चित्रांद्वारे स्पष्ट करावा. | शेतात सिंचन पद्धतीचा वापर, पाण्याची साठवण, पाण्याचे स्रोत, पाण्याचे शुद्धीकरण.<br>**कलाशिक्षण :** कविता गायन, पाण्यासंबधित गाणी सादर करणे, नाट्यीकरण. | १. पाण्याविषयी चित्रांचा संग्रह<br>२. स्थानिक नागरिक अथवा पालकांची मुलाखत.<br>३. परदेशातील एखाद्या परिचित व्यक्तीशी पाणी उपलब्धता या विषयावर इंटरनेटद्वारे भेट आणि मुलाखत.<br>https://youtu.be/ WOFGF wyXft8<br>https://youtu. be/5HaXiDk-fco<br>https://youtu.be/ Vwrgv21a mlQ | प्रदर्शन आयोजित करता येईल.<br>६. नाट्यरूपाने पाण्याचे महत्त्व, शुद्ध पाणी, आरोग्यासाठी पाणी, पाण्याचा पुनर्वापर असे उपक्रम घेता येतील.<br>७. पाणी शुद्धीकरणाचे प्रात्यक्षिक करून घेता येईल. |

**विषय : कार्यानुभव (करू)**

**उपक्रम :** अभिरुचिपूरक उपक्रम **अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक : विदूषक तयार करणे**

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव. | १. विदूषक तयार करतो.<br>२. परिसरातील उपलब्ध साहित्या-पासून आधुनिकतेशी सांगड घालून अभिरुचीनुसार साहित्य तयार करतो.<br>३. कार्यातील 'स्व' ची भूमिका जाणतो.<br>४. त्रिमित प्रतिकृती म्हणजे काय ते सांगतो.<br>५. स्वत:च्या कृतिकौशल्यानुसार आणि भावविश्वाच्या समृद्धीप्रमाणे | १. विदूषकाचे चित्र किंवा व्हिडिओ दाखवावा. विद्यार्थ्यांना आपली मते मांडण्यास प्रोत्साहित करावे.<br>२. तंत्रज्ञानाचा (IT) वापर करून Paint प्रोग्राममध्ये मुक्तपणे विदूषकाचे चित्र काढायला सांगावे.<br>३. उपलब्ध साहित्यांतून 'स्व' कल्पनेने विदूषक तयार करून घ्यावा. (Creative Thinking)<br>४. रिकाम्या काडेपेट्या, विविध रंगीत कागद, | **परिसर अभ्यास :** सहज सोपे साहित्य, विदूषकाचा इतिहास.<br>**गणित :** कागदाच्या घड्या, चौरस, त्रिकोण, आयत व वस्तूंची प्रमाणबद्धता, कृतिक्रम.<br>**IT/कला :** भौमितिक आकारांचे रेखाटन, रंगसंगती, वेशभूषा अभिनय. | **Online Books**<br>http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>**दीक्षा ॲप**<br>DIKSHA Mobile App<br>https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app<br>**कार्यानुभव :**<br>शिक्षक हस्तपुस्तिका इयत्ता चौथी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. | १. घडीकाम पद्धतीने विदूषक तयार करून घेता येईल.<br>२. संगणकाच्या (ICT) माध्यमातून विविध भौमितिक आकारांचा वापर करून व विविध रंगांचा वापर करून विदूषक तयार करता येईल व पालकांपर्यंत पोहोचवता येईल.<br>३. मातकाम या माध्यमाचा वापर करून विदूषक ही आवडीची प्रतिकृती तयार करता येईल. |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयाचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदभ साधने | घटकावर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | विदूषक तयार करतो आणि आनंद घेतो. | काड्यांचा वापर करून विदूषक कसा तयार करता येईल. याविषयी व्यक्त होण्यास वेळ द्यावा व विदूषक तयार करून दाखवावा. (Decision Making)<br>५. विद्यार्थ्यांना मी विदूषक बोलतोय या विषयावर अभिव्यक्त होण्यास पूर्ण मोकळीक द्यावी. (Effective Communication)<br>६. वर्गात कलाकृतींची प्रदर्शनीय मांडणी करावी.<br>७. कलाकृतींचे निरीक्षण करण्यास वेळ द्यावा.<br>८. सर्वच प्रतिकृतींचे कौतुक करावे. | **भाषा :** पपेटच्या माध्यमातून संवाद व वर्णन, प्रश्नोत्तरे | https:// youtu.be/ J6lXCDKL RNc<br><br>https://you tu.be/J6el2 uq1-2w<br><br>https://you tu.be/dcqau WjglAc | ४. रंगीत कापडाच्या चिंध्यांपासून विदूषक तयार करता येईल.<br>५. विविध रंगीत, लहान खड्यांची मांडणी करून विदूषक किंवा अन्य आवडीच्या कलाकृती तयार करता येतील.<br>६. विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीस प्रोत्साहित करण्यासाठी विदूषक किंवा पपेट सारख्या माध्यमांचा वापर करता येईल.<br>७. विद्यार्थ्यांना देशोदेशीच्या विदूषकांचा परिचय करून देता येईल. |

**विषय : कार्यानुभव (करू)**

**उपक्रम :** कौशल्याधिष्ठित उपक्रम **अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** कार्डशीटवर स्टेन्सिलने नक्षी कापून आकाशकंदील तयार करणे.

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव<br><br>कार्यकौशल्यांचा विकास | १. कार्डशीटवर स्टेन्सिलने नक्षी कापून आकाशकंदील तयार करतो.<br>२. गरजा आणि समस्या यांच्याशी निगडित कृती करतो.<br>३. कौशल्यपूर्ण समाजोपयोगी साहित्य निर्माण करतो.<br>४. तयार केलेली वस्तू आणि तिचे मूल्य यांचा सहसंबंध जाणतो.<br>५. स्वत: तयार केलेल्या आकाशकंदिलांचा उपयोग घर सजावटीसाठी करतो. | १. विविध आकाशकंदिलांची चित्रे किंवा Video दाखवावा.<br>२. आकाशकंदिलाविषयी परिकल्पना जाणून सांगावी.<br>३. कोणत्या साहित्यांपासून आकाशकंदील तयार होईल याचा विचार करण्यास वेळ द्यावा. (Problem Solving)<br>४. तंत्रज्ञानाचा (IT) वापर करून Paint प्रोग्राममध्ये आकाशकंदिलाचे | **परिसर अभ्यास :** पर्यावरणाशी निगडित कलाकृती, आकाशकंदिलांचा इतिहास.<br>**भाषा :** प्रदर्शनाची माहिती, संवाद, प्रश्नोत्तरे, जाहिरात.<br>(IT) Video Clip पाहून माहिती<br>पेंट प्रोग्राममध्ये आकाशकंदिलाचे चित्रण.<br>**गणित :** प्रमाणबद्धता, आकारमान, | **Online Books**<br>http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>**दीक्षा ॲप**<br>DIKSHA Mobile App<br>https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app<br>**कार्यानुभव :** शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता चौथी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. | १. पातळ, रंगीत, कागदाला घड्या घालून आकाशकंदील तयार करता येईल.<br>२. लहान आकारांच्या बांबूच्या काड्यांचा वापर करून पर्यावरण पूरक आकाशकंदील तयार करता येईल.<br>३. रंगीत कापडांचा वापर करून आकाशकंदील तयार करता येईल.<br>४. तंत्रज्ञानाचा वापर करून Paint प्रोग्राममध्ये आकाशकंदिलाचे चित्र तयार करता येईल आणि |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | ६. संघभावनेने काम करतो.<br>७. इतरांना मदत करतो. | चित्र काढायला देऊन विविध रंग भरून घ्यावेत.<br>५. स्टेन्सिल नक्षी म्हणजे काय? याची माहिती द्यावी. नमुने हाताळण्यास द्यावेत.<br>६. स्व-आवडीचा आकाशकंदील तयार करण्याची संधी द्यावी. (Creative Thinking)<br>७. पिवळ्या रंगाचे कार्डशीट, रंगीत पतंगी कागद या साहित्यांचा वापर करून, स्टेन्सिलचा आकाशकंदील सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन प्रत्यक्ष करून घ्यावा. | भौमितिक आकार, मापन, संख्या, किंमत. | https://youtu.be/3MRkW92sGBE<br>https://youtu.be/PmXLCM_bcus<br>https://youtu.be/BO057RBeYjE<br>https://youtu.be/eLNdjjXzi9I<br>https://youtu.be/mrLvaytBsB4 | इंटरनेटद्वारे इतरांना पाठवता येईल. उदा. कंदील, भेटकार्ड, पणती सजावट.<br>५. कार्डपेपरपासून लहान आकारांच्या आकाशकंदिलांच्या माळा तयार करता येतील.<br>६. आकाशकंदील ही हस्तकौशल्याची उत्पादक वस्तू म्हणून विक्रीसाठी उपलब्ध करून देता येईल.<br>७. स्टेन्सिलचे विविध उपयोग विद्यार्थ्यांना सांगता येतील. |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | ८. गटात चर्चा करून तयार आकाशकंदिलांचे प्रदर्शन आयोजित करावे.<br>९. शालेय परिसरात आकाशकंदिलाचे प्रदर्शन भरवून आकाशकंदील विक्रीची व्यवस्था करावी. सर्व प्रतिकृती स्वीकारून त्यांचे कौतुक करावे. (Effective Communication) | | | |

**विषय : कार्यानुभव (करू)**

**उपक्रम :** उत्पादक क्षेत्रे (वस्त्र)

**अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** प्राथमिक शिवणकाम : जुन्या टॉवेलपासून पिशवी शिवणे आणि सुशोभित करणे.

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| उद्योजकतेचे शिक्षण<br><br>अर्थोत्पादन क्षमता विकास. | १. जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करतो.<br>२. गरजेच्या परिपूर्तीसाठी स्वतः प्रयत्न करतो, गरज भागवतो आणि आनंद मिळवतो.<br>३. सुशोभनासाठी साध्या, सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तू वापरतो. | १. प्लॅस्टिकला पर्याय या संदर्भाने विद्यार्थ्यांशी संवाद साधावा.<br>२. जुन्या कापडापासून तयार होणाऱ्या विविध वस्तूंची चित्रे अथवा त्या आशयाचा व्हिडिओ दाखवावा.<br>३. कापड योग्य आकारात कापून घ्यावे.<br>४. कापडाच्या सुलट भागावर सुशोभन करून घ्यावे.<br>५. कापडाच्या उलट भागावर योग्य ठिकाणी बंद लावून घ्यावेत. | **भाषा :**<br>नवे शब्द, स्वतःच्या शब्दातील अभिव्यक्ती विविध वस्तूंची नावे, प्रश्नोत्तरे.<br>**गणित :**<br>मापन, लांबी, रुंदी, भौमितिक आकार.<br>**परिसर अभ्यास :**<br>वस्त्राची वैशिष्ट्ये, पर्यावरणातील विविध वस्तू, समतोल.<br>**कला शिक्षण :**<br>आकार, रंगसंगती, आकर्षकता, सजावट. | **Online Books**<br>http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>**दीक्षा ॲप**<br>DIKSHA Mobile App<br>https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app<br>**कार्यानुभव :**<br>शिक्षक हस्तपुस्तिका इयत्ता चौथी<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. | १. जुने टॉप, टी शर्ट, स्टोल कापड यांपासून पिशवी तयार करता येईल.<br>२. दर आठवड्यातून एकदा पिशवी दिवस साजरा करता येईल. (स्कूल बॅगऐवजी पिशवीचा वापर)<br>३. वर्तमानपत्र, रद्दी कागदांपासून पिशवी तयार करता येईल.<br>४. गोण्या, पोत्यांपासून सुशोभित पिशवी तयार करता येईल.<br>५. 'बाजारात.. माझी पिशवी जोरात' असा उपक्रम राबवता येईल. |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | ४. सांघिक पद्धतीने काम करतो.<br>५. कामात सुबकता आणतो.<br>६. तयार झालेल्या वस्तूंचे बाजारात मूल्य काय आहे हे सांगतो. | ६. कापड विरुद्ध बाजूने पकडून तीन बाजूने टिपा मारून शिवून घ्याव्यात.<br>७. कापडाच्या तयार झालेल्या पिशवीला उलट करावे. योग्य बाजू बाहेर येईल, कापणे व शिवणे या क्रिया करताना विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष द्यावे.<br>८. देशाच्या व आंतरराष्ट्रीय बाजारात पिशवीचे मूल्य काय असेल याची कल्पना द्यावी.<br>९. पिशवीचा वापर दैनंदिन जीवनात करण्यास संधी द्यावी. | **खेळ व आरोग्य शिक्षण :** स्नायूंच्या हालचाली, स्वनियंत्रण, लवचिकपणा, बैठक पद्धत | • कापडापासून तयार होणाऱ्या विविध वस्तूंची चित्रे.<br>• कापडाची पिशवी तयार करून स्वत: सजावट केलेला स्वतःचा व्हिडिओ.<br>• यू–ट्यूब चॅनलवरील व्हिडिओ.<br>• देशोदेशीच्या पिशव्या या संदर्भातील चित्रसंग्रह.<br>https://youtu.be/Yw-Ad_Obh0E<br>https://youtu.be/aest2gsxFOw | ६. आकर्षक पिशवी स्पर्धा आयोजित करता येईल.<br>७. कापडाच्या पिशवीमुळे पर्यावरणाचा होणारा बचाव विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देता येईल. |

**विषय : कार्यानुभव (करू)**

**उपक्रम :** शेतीपूरक व्यवसाय (पशू–पक्षी संवर्धन) **अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** शेतीपूरक व्यवसायांचा परिचय करून देणे. उदा. दुग्धव्यवसाय

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| उद्योजकतेचे शिक्षण आणि श्रमप्रतिष्ठा. | १. शेतीपूरक व्यवसाय म्हणजे काय ते सांगतो.<br>२. चित्रावरून व्यवसाय ओळखतो.<br>३. शेतीपूरक व्यवसायाचे महत्त्व सांगतो.<br>४. शेतीपूरक कोणता व्यवसाय करायला आवडेल या प्रश्नाचे उत्तर देतो. | १. शेती या प्राथमिक व्यवसायाबद्दल माहिती द्यावी.<br>२. शेतीपूरक व्यवसायां–बद्दल माहिती द्यावी.<br>३. परिसरातील शेतीपूरक व्यवसाय कोणते ते शोधण्यास वाव द्यावा.<br>४. शेतीपूरक व्यवसायाचे महत्त्व व फायदे शोधून सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>५. दुग्धव्यवसाय याविषयी माहिती संगणकावर अथवा पुस्तकांमधून शोधण्यास सांगावी. | **भाषा :**<br>स्वतःच्या भाषेतील शब्द, नवे शब्द, अभिनय, संवाद, प्रश्नोत्तरे.<br>**गणित :**<br>आकार, परिमाण, हिशेब.<br>**परिसर अभ्यास :**<br>विविध स्रोत, नैसर्गिक संपत्ती, प्राण्यांचे खाद्य, उपलब्धता, वैज्ञानिक सत्य.<br>**कला शिक्षण :**<br>रंगसंगती, आकारमान | **Online Books**<br>http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>**दीक्षा ॲप**<br>DIKSHA Mobile App<br>https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app<br>**कार्यानुभव :** शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता चौथी<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. | १. कुक्कुटपालन, वराहपालन असे अनेक व्यवसाय व्हिडिओमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येतील.<br>२. शेतीपूरक व्यवसाय (दुग्धव्यवसाय) करणाऱ्या एखाद्या स्थानिक व्यावसायिकाला बोलावून मुलांसमोर मुलाखतीद्वारे व्यवसायाचा परिचय करून देता येईल.<br>३. विद्यार्थ्यांची शेतीपूरक व्यवसाय केंद्राला प्रत्यक्ष क्षेत्रभेट |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | ६. आदर्श गोठा दाखवणारी प्रतिकृती करून घ्यावी. | आकर्षकता, नावीन्य, कलात्मकता.<br>**खेळ व आरोग्य शिक्षण :**<br>बैठकस्थिती, स्नायूंचा दमदारपणा. | • शेतीपूरक व्यवसाय या संदर्भाने स्वतः तयार केलेला व्हिडिओ.<br>• आंतरराष्ट्रीय विविध मासिकांतील चित्रांचा संग्रह<br>• दुग्धव्यवसाय करणाऱ्या संस्थांची विविधरंगी कॅलेंडर्स.<br>https://youtu.be/hx_Yz xZLJFk<br>https://youtube/X_zdH BYebQg | आयोजित करता येईल.<br>४. शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या पालकांचा सहभाग घेता येईल.<br>५. युरोपातील दुग्धव्यवसायाची माहिती देता येईल. |

**विषय : तंत्रज्ञान क्षेत्र – माहिती तंत्रज्ञान**

**उपक्रम :** माहिती तंत्रज्ञान

**अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** Open Office डेस्कटॉपची ओळख तसेच APPLICATION PROGRAMME ची ओळख

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोजनात्मक कौशल्यांचा विकास करणे. | १. डेस्कटॉपवरील विविध भाग ओळखतो.<br>२. Open Office APPLICATION SOFTWARE चा वापर करतो. | १. डेस्कटॉपवरील आयकॉन, WALLPAPER, TASKBAR या भागांची ओळख करून द्यावी. हाताळण्याची संधी द्यावी. उदा. DESKTOP वर PAINT FILE चे FOLDER तयार करणे.<br>२. APPLICATION SOFTWARE चा वापर करता यावा याकरिता विविध कृतींचे नियोजन करावे. | CALENDAR व (Open office) PAINT द्वारे दिनदर्शिका तसेच भौमितिक आकारांविषयी अधिक समज तयार करता येईल.<br>कला विषयासाठी Open office PAINT चा उपयोग होईल.<br>BCPT VIDEO इंग्रजी विषयासाठी उपयुक्त ठरेल. | **Online Books**<br>http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>**दीक्षा ॲप**<br>DIKSHA Mobile App https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app<br>**कार्यानुभव :**<br>शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता चौथी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. | १. विविध WALLPAPER ठेवण्याची/ बदलवण्याची संधी देऊन मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देता येईल. उदा. PAINT वर काढलेले चित्र WALLPAPER म्हणून ठेवता येईल.<br>२. विविध आयकॉन, त्यांचे अर्थ यावर प्रकल्प घेऊन सादरीकरणाची संधी देता येईल.<br>३. TASKBAR मधील DATE, TIME, |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | उदा. भौमितिक आकारासारखे PAINT आधारित प्रात्यक्षिक.<br>३. CALCULATOR सारख्या APPLICATION SOFTWARE चा वापर करून मूलभूत गणितीय क्रियांची उत्तरे तपासावीत. | | (Open office) डेस्कटॉपवरील आयकॉन, WALLPAPER, TASKBAR यावरील माहितीसाठी खालीलप्रमाणे video बघता येईल. https://youtu.be/h8CFWhVeqlg संगणकीय CALCULATOR बद्दल अधिक माहिती खालील video मधून घेता येईल. https://youtu.be/jw79 ceOr8dE बद्दल अधिक माहितीसाठी खालील प्रमाणे बरेच youtube video बघता येतील. | START इ. बाबींवर प्रात्यक्षिक घेता येईल. यांद्वारे उपयोगिता सांगता येईल.<br>४. शाळेत CAL (COMPUTER LEARNING PACKAGE) असल्यास अध्ययनासाठी वापर करता येईल. यावेळी मुलांना हाताळायची संधी देता येईल.<br>५. (Open office) WORD PAD सारख्या APPLICATION SOFTWARE चा वापर इंग्रजी |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टाकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | https://youtu.be/BRRN-5DH7EsBCPT VIDEO youtube वरून download करता येईल. | विषयाकरिता करता येईल. टंकलेखन सरावही देता येईल.<br>६. BCPT VIDEO रन करण्याची संधी मुलांना देता येईल. याकरिता वापरत असलेल्या APP वर चर्चा करता येईल. |

■■■

## मूल्यमापन निर्देश

मित्रहो, कार्यानुभव (करू) हा विषय विद्यार्थ्यांच्या जीवनाशी जोडताना नियोजन आत्यंतिक महत्त्वाचे आहे. कार्यानुभवाची उद्‌दिष्टे साध्य करणे, अध्ययन अनुभवांची मांडणी करणे, सर्वंकष मूल्यमापन (आकारिक) करणे, विद्यार्थ्यांना निर्भेळ आनंद मिळवून देणे आणि कार्यजगताचा अनुभव देण्यासाठी नियोजन असायला हवे.

१) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन मार्गदर्शिकेचे वाचन करूया.

२) अभ्यासक्रमाचा आराखडा आणि उपलब्ध तासिकांनुसार उपक्रम, सहशालेय उपक्रम, क्षेत्रभेट, प्रकल्प, प्रात्यक्षिक, प्रदर्शन, माहितीचे स्रोत उपलब्ध करणे आणि पालक–कारागिरांच्या सहभागाचे नियोजन करूया.

३) स्थानिक परिस्थिती, सण–समारंभ, उपलब्ध साधन सुविधा, निरुपयोगी साधनांची उपलब्धता यांचाही विचार करूया.

४) प्रत्येक सत्रातील अखेरचा काही कालावधी अतिरिक्त पूरक मार्गदर्शनासाठी तसेच सराव समृद्‌धीसाठी राखून ठेवूया.

५) आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवताना प्रत्येक बाब ही अपडेट पद्‌धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल असाही नियोजनासाठी विचार करूया.

नियोजनपूर्वक केलेली प्रत्येक कृती अध्ययन–अध्यापन सकस बनवते. सुलभक आणि सर्वच विद्यार्थ्यांना आनंद मिळवून देते, समृद्‌ध करते.

कार्यानुभव या विषयाचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करण्यासाठी २० ऑगस्ट २०१२ च्या शासन निर्णयामध्ये स्वतंत्र सूचना दिल्या आहेत. भाषा, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, गणित इत्यादी विषयांच्या तुलनेने या विषयांमध्ये अधिक मूर्त स्वरूपातील कृती, अभिव्यक्ती प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांकडून अपेक्षित आहेत. हा विषय कौशल्याधिष्ठित आहे. या विषयाबाबत लेखी काम नगण्य आहे. त्यामुळे या विषयाचे केवळ आकारिक मूल्यमापन करायचे असून संकलित मूल्यमापन अपेक्षित नाही. आकारिक मूल्यमापन यासाठी विहित केलेल्या आठ साधनांपैकी किमान तीन साधनतंत्रे वापरावयाची आहेत. त्यामध्ये निरीक्षण हे तंत्र वापरणे अनिवार्य आहे. परंतु त्यासाठी गुणांमध्ये भारांश शून्य आहे. उरलेल्या साधनांमधून किमान दोन साधनतंत्रांची निवड करावयाची आहे. या विषयाचे कौशल्याधिष्ठित स्वरूप लक्षात घेता प्रात्यक्षिक, प्रयोग व उपक्रम, कृती या तंत्राची निवड प्राधान्याने करावी लागेल. आशयाच्या स्वरूपावरून प्रकल्प आणि तोंडीकाम या तंत्रांना योग्य ते स्थान द्यावे लागेल. शासननिर्णयानुसार तीन तंत्रांपेक्षा अधिक तंत्र वापरण्याची मुभा आहे.

गुणदानामध्ये निरीक्षण या तंत्राला शून्य भारांश आहे. इतर तंत्रांना आशय आणि व्याप्ती पाहून योग्य तो भारांश द्यायचा आहे. विज्ञान, गणित इत्यादी विषयांचे मूल्यमापन जेवढ्या वस्तुनिष्ठतेने करता येते तसे या विषयातील कृती कौशल्याचे मूल्यमापन करता येत नाही. त्यामुळे अगदी काटेकोर मूल्यमापनाची अपेक्षा करता

येणार नाही ही या विषयाची मर्यादा आहे. परंतु विद्यार्थ्यांची कृती/आविष्कार कसे असावेत यांच्या निकषांची यादी करून त्यानुसार मूल्यमापन केले तर वस्तुनिष्ठता वाढण्यास मदत होईल.

सर्व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व व त्यांचा विकास यांचा वेध घेण्याच्या दृष्टीने या विषयाचे आगळे स्थान आहे. या विषयासंदर्भातील कृती करताना आविष्कार दाखवलेला विद्यार्थ्याचे वर्तन इतर विषयांच्या तुलनेत अधिक नैसर्गिक असते. या अवस्थेत विद्यार्थ्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू सहजपणे लक्षात येण्याची संधी असते. जाणीवपूर्वक निरीक्षण करून ही संधी घेता येईल. इतर विषयांमध्ये फारशी रुची किंवा प्रगती न दाखवल्यास काही विद्यार्थ्यांना या विषयांमध्ये गती असल्याचे जाणवू शकेल. या विद्यार्थ्यांना हेरून या विषयात अधिक प्रगती करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करता येईल. त्याची या विषयातील रुची कायम राहावी, कौशल्य वाढावे या दृष्टीने त्यांना वर्गातील/शाळेबाहेरील/कार्यक्रम उपक्रमांत सहभाग घेण्याचे नियोजन करता येईल. या विषयाचे स्वरूप दृश्य/मूर्त असल्यामुळे संपादणूक व या विषयातून होणारा व्यक्तिमत्व विकास या विषयीचे मूल्यमापन दैनंदिन तासिकांतील कृती, उपक्रम, प्रात्यक्षिके तसेच प्रकल्पातून करणे सहज शक्य आहे. परंतु याचबरोबर इतर विषयांच्या तासिकांमध्ये या विषयांच्या मूल्यमापनाला वाव आहे. उदा. इतर विषय शिकवताना कार्यानुभवातील ओरिगामी, पुष्परचना इत्यादी कृतींचा समावेश असू शकतो. त्यामुळे इतर विषयांच्या अध्यापनातून देखील कार्यानुभव विषयासंबंधित मूल्यमापन करण्याची संधी घेतली पाहिजे. अशाच प्रकारे निरनिराळ्या सहशालेय उपक्रमांचा वापर देखील करता येईल. या विषयात प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांनी मुक्त आविष्कार करावा. त्यात त्यांच्या कल्पना, सर्जनशीलता, अनुभव यांचे प्रतिबिंब असावे अशी अपेक्षा आहे. स्वतःच्या प्रौढ अनुभवांच्या पार्श्वभूमीवर एखाद्या विशिष्ट प्रकारे कृती असण्याविषयी आग्रह, सूचना किंवा दुरुस्ती करणे योग्य ठरणार नाही. मुलांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि आनंद यांना धक्का लागणार नाही याची काळजी मूल्यमापन करताना घ्यायला हवी असे वातावरण निर्माण करणे व कायम ठेवणे ही भूमिका शिक्षकाकडून अपेक्षित आहे. कार्यानुभव विषयाचे मूल्यमापन करताना विषयाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या हेतूने पुढील दृष्टिकोन लक्षात घेणे आवश्यक आहे.

- श्रमविषयक कार्याची आवड
- कार्यातील सहभाग कौशल्य विकास व त्याला तंत्रज्ञानाची जोड
- जीवनविषयक गरजा पूर्ती करण्याची क्षमता
- समाजोपयोगी कार्यातील सहभाग
- कार्यशिक्षणातून पर्यावरणाची जाणीव
- उद्योजकतेचे शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या अंमलबजावणी संदर्भात शिक्षकांसाठी मार्गदर्शक हस्तपुस्तिका तयार केल्या आहेत याचा संदर्भ अध्यापनाचे नियोजन करताना अवश्य घ्यावा.

■■■

## परिशिष्ट : संदर्भ सूची


- प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम – २०१२ : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
- इयत्ता पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पहिली
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
- पुस्तक : खेळू, करू, शिकू
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता दुसरी
- पुस्तक : खेळू, करू, शिकू
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता तिसरी
- पुस्तक : खेळू, करू, शिकू
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता चौथी
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पाचवी
- ebalbharati Online Books
  http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx
- दीक्षा ॲप DIKSHA Mobile app
  https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app


■■■

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय – कलाशिक्षण (शिकू)

### संवाद शिक्षक मित्रांशी

शिक्षणात कलेचा सहभाग असेल तर, शिक्षणाची गुणवत्ता व शिकण्यातील सहजता वाढते. शिक्षण जितके सहज तितके ते अंतःकरणावर कोरले जाते. शिकविलेले मनात कोरले गेले, की ते आयुष्यभर उपयोगी पडते. त्यामुळेच कलेतून होणारे शिक्षण हे जीवन शिक्षणच असते.

कला हे भावना व्यक्त करण्याचे सुंदर माध्यम आहे. मन जपण्यासाठी कलेसारखे दुसरे माध्यम नाही. कलेतून मूल खुलते आणि त्याचा सर्वांगीण विकासही साधला जातो. खरं तर बालकांची संवेदनशीलता, निरीक्षणशक्ती, मानसिक, भावनिक विकास व कृतिशीलता वाढवण्यास कला शिक्षण या विषयाची नक्कीच मदत होते. कला विषयाची ही पुस्तिका म्हणजे विद्यार्थ्याला स्वतःचे जीवनच वाटेल, या गोष्टींचा जाणीवपूर्वक विचार केलेला आहे. तसेच या पुस्तिकेची भाषा सहज–सोपी व त्याला समजेल अशी आहे.

चित्र, शिल्प, गायन, वादन, नृत्य, नाट्य या कलांना नियमाच्या बंधनात न अडकविता, मुलांना मी हे रोजच करतो असे वाटते. कृतींतून केलेले शिक्षण कायम स्मरणात राहते. लहानपणापासून मूल काही ना काही कृती करीत असते. त्यातूनच मूल शिकत असते. कृतींतून त्याला आनंद मिळावा व वेगवेगळी माध्यमे त्याने हाताळावीत. तसेच या शिक्षणाचा उपयोग त्याला इतर विषयांच्या अभ्यासासाठी व्हावा ही अपेक्षा!

गायन आणि अभिनयाद्‌वारे काही गंमतगाणी जी मुलांना सहजरित्या म्हणता येतील आणि स्वतःदेखील तयार करू शकतील अशीच आहेत. त्यांतून नव्या कला निर्मितीला, आविष्काराला निश्चितच वाट मोकळी करून दिली जाते. कलेचे शिक्षण, कलेतून शिक्षण, कला हेच शिक्षण या कलेच्या त्रिसूत्रीची जपणूकही होईल. हसत–खेळत, सहजरित्या स्वतःच्या भावना व्यक्त करून आणि स्वतःच्या आवडीप्रमाणे आनंददायी शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांचा विकास होईल हा कला समितीचा उद्‌देश आहे.

**मुक्त अभिव्यक्तीची** वेगळी मांडणी केली आहे. यामध्ये मुले कृतीतून शिकतील व त्याचा इतर विषयांशी समवाय असेल. मुले आनंदाने शिकतील. अनेक माध्यमांची ओळख होईल. मुले चित्र बघून काढणार नाहीत. नेहमी नवनिर्मिती करतील. नाविन्यपूर्ण गोष्टी सातत्याने करतील. नित्यक्रमास फाटा देऊन आवडीच्या गोष्टीत मुले नक्की रमतील. मुलांना मुक्त व व्यक्त होण्यास काहीच अडथळा राहणार नाही आणि ती वेगाने शिकतील. ती आश्चर्यचकित करणाऱ्या गोष्टी करतील. ते आत्मीयतेने निरीक्षण करतील व नोंदीही ठेवतील. शिक्षकांची कमीत कमी मदत घेतील. मुलांना ग्रुपमध्ये खेळायला, गप्पा मारायला आवडते. तसेच आपल्याच वयाच्या मुलांबरोबर काम करायला आवडते.

साध्या–सोप्या गोष्टींतून आनंददायी शिक्षण कसं देता येईल? हा विचार येथे केंद्रित होतो. अचूकता, काटेकोरपणा, सुबकता, एकाग्रता, नीटनेटकेपणा, चिकाटी, सौंदर्यदृष्टी, नवनिर्मिती, सर्जनशीलता, कल्पक विचार, कौशल्यपूर्णता, निरीक्षणशक्ती अभिव्यक्ती, अभिरुची, संवेदनशीलता, कार्यानंद, तन्मयता आणि प्रयोगशीलता ही सर्व जीवनकौशल्ये कलेबरोबर असतात. याचा फायदा इतर विषयांसाठीही होईल.

■■■

# अभ्यासक्रमाची ध्येय व उद्दिष्टे

**कला शिक्षण ध्येय :**

कलांच्या आविष्कारातून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व भावनिक विकास घडवणे.

**कला शिक्षण उद्दिष्टे :**

**चित्र-शिल्प**

- मनातील अव्यक्त भावभावना व्यक्त करण्याची संधी देणे.
- निसर्गातील निरनिराळे रंग, आकार यांचे निरीक्षण करता येणे व त्यातील फरक ओळखता येण्याची क्षमता निर्माण करणे.
- निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती यांचा विकास करण्यात मदत करणे.
- विद्यार्थ्यांना कलानिर्मितीसाठी स्वतंत्र विचार करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला संधी देणे.
- स्व-निर्मित कलाकृतीचा आनंद घेण्याची वृत्ती विकसित करणे.
- कलाविष्कारासाठी विविध माध्यमे, अनुषंगिक कलासाधने आणि उपलब्ध साहित्य हाताळण्यास प्रवृत्त करणे.
- कलेच्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याची संधी देणे.

**संगीत (गायन, वादन, नृत्य)**

- स्वतंत्र सादरीकरणाची क्षमता वाढीस लावणे.
- नृत्याच्या माध्यमातून सहसंवेदना जाणणे.
- देश व लोक संस्कृतीबद्दलची प्रेमभावना वाढवणे.
- स्वर, राग, ताल या मूळ संकल्पनांची ओळख करून देणे.
- स्थानिक कलाकारांचा परिचय करून देणे.
- भाषिक सौंदर्याचा आस्वाद आणि आनंद घेणे.
- आधुनिक दृक-श्राव्य माध्यमांच्या उपयोगाने कलात्मक दृष्टिकोन प्रगल्भ करणे.
- स्वर-ताल रचना निर्मितीचा आनंद घेणे.

**नाट्य**

- आंगिक अभिनयातून नाट्य विषयाची आवड निर्माण करणे.
- भावनांचे प्रकटीकरण करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- निरीक्षण, अनुकरण, कल्पकता यांची संधी उपलब्ध करून देणे.
- नेपथ्यामध्ये साहित्याऐवजी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना कल्पक सहभागासाठी प्रवृत्त करणे.
- चित्र–शिल्प, नृत्य–नाट्य, यांचा नाट्यामध्ये एकात्म पद्धतीने आविष्कार करण्याची संधी देणे.
- मुक्ताविष्कारातून स्व–निर्मितीचा आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- गुणग्राहकता व दाद देण्याची मनोवृत्ती निर्माण करणे.
- स्वतंत्रपणे विचार करून आविष्काराची संधी उपलब्ध करून देणे.
- दिलेल्या विषयावर नाट्य सादर करण्याची प्रवृत्ती निर्माण करणे.
- रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य, तांत्रिक अंगे इत्यादी पूरक अंगांचा परिचय करून देणे.

■■■

## पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती, अध्ययन अनुभव, मुक्त अभिव्यक्ती व इतर विषयांशी समवाय

**विषय :** चित्र

**घटक :** रेखांकन **उपघटक :** उभी, आडवी, तिरपी, लयदार, वक्र, वर्तुळाकृती, नागमोडी, गुंताळी रेषा

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • विविध रेषांची ओळख होते.<br>• यांत्रिक साहित्याशिवाय रेषांचा सराव करतात.<br>• रेषा सुंदर काढतात. | रेषांची जोडणी म्हणजे आकार. आकारांची मांडणी म्हणजेच चित्र. चित्र सुंदर येण्यासाठी आकार सुंदर असला पाहिजे आणि आकार सुंदर येण्यासाठी रेषा. उभी, आडवी, तिरपी, लयदार, वक्र, नागमोडी, गुंताळी हे रेषांचे प्रकार आहेत. त्यांचा जास्तीत जास्त सराव करून घ्यावा म्हणजे रेषा उत्कृष्ट होईल आणि रेषेमुळे चित्र उत्कृष्ट होईल. | • दोऱ्याचे तुकडे करून वरील रेषेसारखे आकार कागदावर चिकटवून घ्यावेत.<br>• मातीच्या चपट्या आयताकृती विटा तयार कराव्यात. त्यावर काडी, पेन, रिफिलच्या साहाय्याने उभी, आडवी, तिरपी, लयदार, वक्र, नागमोडी, गुंताळी रेषा काढून पोत निर्मिती करून घ्यावी. | • गणित : रेषा व रेषेचे प्रकार.<br>• शारीरिक शिक्षण : ओळीत उभे राहणे. मैदानावर विविध आकारांत उभे राहणे. शिस्त<br>• कार्यानुभव : विटा तयार करणे. |
| **उपघटक :** गंमत रेषेची (गुंताळी रेषांची रंगाकृती) | | | |
| • रंगवण्याची नवीन पद्धत समजते.<br>• रेषांचा वापर करून चित्र रंगवितात. | घर, पतंग, रॉकेट, होडी, फुलदाणी, केक, मासा, झाडे, ढग, पाने, फळे, फुले इत्यादींचे एकदम सोपे आवडीप्रमाणे बाह्याकार पेन्सिलने काढून घ्यावेत. त्याला काळ्या स्केच पेनने आऊटलाईन करून घ्यावी. रंगीत पेन्सिल, रंगीत पेन, स्केचपेन ही माध्यमे वापरून गुंताळी रेषांच्या साहाय्याने चित्रे रंगवून घ्यावीत. | • कागदाचे स्टेन्सिल करून विविध रेषांच्या साहाय्याने चित्र रंगवून घ्यावे.<br>• मोठ्या गोलात छोटे छोटे गोल क्रमाने काढणे व या गोलांवर कडधान्ये ठेवण्याचा सराव करून घ्यावा. | • परिसर अभ्यास भाग १ : निसर्गनिर्मित आकारांचे सोपे आकार, विविध रंग माध्यमे.<br>• भाषा : चित्राविषयी संवाद साधतात. |

**उपघटक :** ठिपक्यांची मजा (लहान ठिपके, मध्यम ठिपके, मोठे ठिपके)

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • एकसारखे ठिपके काढता येतात.<br>• ठिपक्याच्या साहाय्याने चित्रे रंगविता येतात.<br>• कागदावर ठिपक्यांची रांगोळी काढून रंग भरता येतात. | मुलांना सहा चौकोन काढण्यास सांगावे व त्या चौकोनात लहान ठिपके, मध्यम ठिपके, मोठे ठिपके हे भरीव व पोकळ क्रमाने काढून घ्यावेत. यामध्ये एकसारखे आणि समान अंतरावर ठिपके काढून घ्यावेत. | • ठिपक्याच्या सहाय्याने रंगीत पेन्सिल, स्केचपेन किंवा मार्कर पेन वापरून ठिपके काढण्याचा सराव करून घ्यावा.<br>• ठिपके जोडून नकाशा तयार करून घ्यावा. | • गणित : लहान, मध्यम, मोठे ठिपके समजणे. रेषेचा जन्म बिंदूपासून झाला आहे. बिंदू हा चित्रासाठी मूलभूत घटक आहे. |
| **घटक :** स्मरण चित्र | **उपघटक :** सोप्या वस्तूंचे रेखाटन | | |
| • आवडीप्रमाणे आठवून चित्र काढतात.<br>• स्मरणचित्राच्या रेखाटनामुळे मुलांची स्मरणशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि निरीक्षणशक्ती वाढते. | स्मरण चित्र हा चित्रकला विषयाचा आत्माच आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला भरपूर वाव मिळतो. चित्र मन:चक्षूपुढे आणण्यास सांगणे. आवडीप्रमाणे आठवून वेगवेगळी चित्रे काढून घ्यावी. उदा. माझे घर, माझ्या अंगणातील फुले, माझी मनीमाऊ, माझे दप्तर, मी पाहिलेले ढग, मी पाहिलेला हत्ती, माझे आवडते फळ, माझा आवडता पक्षी इत्यादी. मुले चित्र बघून काढणार नाहीत असे पहावे. चित्रात चुका काढू नयेत. ते चित्र म्हणजे त्याची नवनिर्मिती असते. चित्रातील भावना ओळखाव्यात. मुलांची चित्रे इतर मुलांना दाखवून त्यांचे कौतुक करावे. | • मुलांना वारली चित्र प्रकार समजून सांगून चित्रे काढून घ्यावीत. | • परिसर अभ्यास भाग १ : मुलांची स्मरणशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि निरीक्षणशक्ती |

| **घटक :** कल्पना चित्र | **उपघटक :** एक विषय घेऊन त्यावर वेगवेगळ्या कल्पना करणे. | | |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • एक विषय घेऊन त्यावर वेगवेगळ्या कल्पना करतात.<br>• स्वतः निर्मिती करतात व निर्मितीचा आनंद घेतात.<br>• आपल्या चित्रातील कल्पनेची इतरांशी चर्चा करतात.<br>• चित्रांच्या माध्यमातून व्यक्त होतात. | चांदोबा हा विषय घेऊन त्यावर चर्चा घडवून आणावी. चर्चेतून मुले त्यांच्या मनात असणाऱ्या चंद्राविषयी कल्पना सांगतील व चित्रबद्ध करतील. चंद्राला बोलके डोळे, गोल नाक, हसणारे तोंड काढल्यास आपोआपच मुलांच्या कल्पनेतील चित्र वाटू लागेल.<br>• ढग हे पाणी समजून चंद्र होडी असेल अशी कल्पना करणे.<br>• चंद्र झोपाळा झाला तर<br>• चंद्राला फुटले पाय<br>• चांदोबा लपला झाडीत<br>• चांदोबा राजा व चांदणी राणी<br>• चांदोबाचा गाव<br>• चांदोबाला आले हसू<br>• चंद्राची कोर<br>• चंद्रावरची सफर<br>• पौर्णिमेचा चंद्र<br>• अमावस्येचा चंद्र<br>• चंद्राचे लगीन<br>• झोपी गेला चंद्र<br>• चांदोबाची टोपी.<br>• चांदोबाचा बंगला | • कोणताही एक विषय घेऊन त्यावर चर्चा घडवून आणावी. चर्चेतून मुले त्यांच्या मनातील कल्पना चित्रबद्ध करतील. उदा. सूर्यबाप्पा, चिऊताई, माझी बाहुली, परिराणी, माझं आवडतं व्यंगचित्र (कार्टून) इत्यादी. | • परिसर अभ्यास भाग १ : स्वतःच्या कल्पकतेने चित्र काढणे, परिसर निरीक्षण करणे.<br>• भाषा : चित्रांच्या माध्यमातून विविध भावनिक संकल्पना स्पष्ट होतात. उदा. हसणे, रडणे, रुसणे, आनंद, दुःख इत्यादी.<br>• भूगोल : चंद्र, चंद्रकला, पौर्णिमा ते अमावस्या<br>• नाट्य : भावना व्यक्त करणे. |

| **घटक :** नक्षीकाम | **उपघटक :** भौमितिक आकार वापरून नक्षीकाम करणे. | | |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • भौमितिक आकार वापरून नक्षीकाम करतात.<br>• सौंदर्य निर्मितीचा पाया तयार होतो. | • चांदोबा रडला अशा अनेक चंद्रावर कल्पना करून साधी, सोपी चित्रे काढून घ्यावीत.<br>आपण कोणतीही वस्तू विकत घेताना त्याचा आकार (घाट) पाहतो, सुंदरता पाहतो, डौलदारपणा पाहतो, सुरेख नक्षीकामही पाहतो. वस्तू सुंदर दिसावी म्हणून केलेले अलंकरण म्हणजेच नक्षीकाम. यालाच संकल्प चित्र असे म्हणतात. संकल्प चित्र आपण वेगवेगळ्या प्रकारे काढू शकतो. त्यामधील एक प्रकार म्हणजे त्रिकोण, चौकोन, गोल इत्यादी भौमितिक आकार वापरून नक्षीकाम करून घ्यावे. | • कोणकोणत्या वस्तूंवर नक्षीकाम असते याची चर्चा करून यादी गटात करून घ्यावी.<br>• कोणत्याही एका आकाराचे टेन्सिल तयार करून तो आकार एकसारखा पुन्हा पुन्हा काढून घ्यावा. | • गणित : भौमितिक आकार<br>• परिसर अभ्यास भाग १ : निरीक्षण करणे व नवीन आकारांचा शोध घेणे. |
| **घटक :** रंगकाम | **उपघटक :** रंगांची विविध माध्यमे | | |
| • रंगकामासाठी वापरात येणाऱ्या विविध रंग माध्यमांबद्दल माहिती करून घेतात.<br>• विविध रंग माध्यमांचा आपल्या चित्रामध्ये वापर करतात.<br>• रंग माध्यमाबद्दलची जाण वाढते.<br>• निरीक्षण कौशल्य या गुणात वाढ होते. | सुंदर चित्रनिर्मिती करण्यासाठी अनेक प्रकारची रंग माध्यमे वापरली जातात. मुलांना विविध रंग माध्यमांचा परिचय करून द्यावा. मुलांकडे उपलब्ध असणारे किंवा आवडीप्रमाणे रंग वापरण्यास सांगावे.<br>उदा.<br>• वॅक्स क्रेयॉन्स किंवा पेस्टल्स | • मुलांच्या आवडीनुसार भौमितिक आकार वापरून सोपे संकल्प चित्र काढण्यास सांगावे व मुलांच्या उपलब्धतेप्रमाणे, आवडीप्रमाणे कोणतेही एक रंग माध्यम वापरून मुलांस ते संकल्प चित्र पूर्ण करण्यास सांगावे. प्रत्येक माध्यमामध्ये काय वेगळेपणा आढळतो. याबद्दल मुलांमध्ये चर्चा घडवून आणावी. | • पर्यावरण : विविध रंग माध्यमांबद्दल ज्ञान होणे. आपल्या चित्रात विविध रंग माध्यमांचा वापर करता येणे. निसर्गातील घटकांचे विविध रंग व आपल्या जवळचे रंग यांमध्ये सारखेपणा शोधण्याचा प्रयत्न करतात. |

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| | • ऑईल पेस्टल्स<br>• ड्राय पेस्टल्स<br>• प्लॅस्टिक क्रेयॉन्स<br>• जलरंग (वॉटर कलर) पोस्टर्स कलर इत्यादी. | • परिसरातील उपलब्ध घटकांपासून नैसर्गिक रंग तयार करून घेणे.<br>• आपल्या परिसरात/निसर्गात उपलब्ध होणाऱ्या गोष्टींपासून नैसर्गिक रंग तयार करून चित्रनिर्मितीसाठी रंग वापरण्यास सांगावे. | |
| **घटक :** मुद्राचित्र (ठसेकाम) **उपघटक :** हाताचा ठसा | | | |
| • हातावरील रचनेचे निरीक्षण करतात.<br>• कल्पनाशक्तीचा वापर करतात.<br>• ठशांचा उपयोग सुंदर चित्र निर्मिती–साठी करतात. | प्रथम सर्व विद्यार्थ्यांना आपल्या हातांचे निरीक्षण करण्यास सांगावे व त्यांना आपल्या हातांकडे पाहिल्यावर काय काय दिसते हा प्रश्न विचारून त्यांच्यात विषयासंबंधी कुतूहल निर्माण करावे. हाताला एक किंवा अनेक रंग लावून मुलांकडून हाताचा ठसा उमटवून घ्यावा. मुलांच्या कल्पनेने आणि आवडीने हातांच्या ठशांपासून चित्रनिर्मिती करून घ्यावी. मुलांनी केलेली कामे सर्वांना वर्गात दाखवून प्रोत्साहन द्यावे. | • ओपन आर्ट गॅलरी : वर्गाबाहेरील भिंतीवर मोठा कागद लावून घ्यावा. त्यावर सर्व मुलांना आवडतील तसे हाताचे ठसे घेण्यास सांगावे. ठसे घेऊन झाल्यावर मुलांना काही अंतर मागे उभे राहून सर्वांच्या ठशांचे निरीक्षण करण्यास सांगावे व नंतर कोणत्याही हाताच्या ठशावर त्यांच्या कल्पकतेने सुंदर चित्रनिर्मिती करण्यास सांगावी. | • परिसर अभ्यास भाग १ : हाताच्या पोताची रचना अभ्यासणे. |
| **उपघटक :** चुरगळलेल्या कागदाचे ठसेकाम | | | |
| • चुरगळलेल्या कागदाचा वापर करून ठसेकाम करतात. निरीक्षणशक्ती, कल्पनाशक्ती, एकाग्रता या गुणांचा विकास होतो. | मुलांना आपल्या सोयीनुसार कुठलाही कागद घेऊन तो चुरगळण्याचा अनुभव घेऊ द्यावा. चुरगळताना येणारा आवाज, त्या कागदाचा बदलणारा आकार, बदलणारा स्पर्शजन्य व | • गटकार्य : मुलांचे काही गट करून मुलांना चुरगळलेल्या कागदाच्या ठशांपासून चित्रनिर्मिती करण्यास सांगावी. उदाहरणार्थ : झाड, घर, फूल, फुलदाणी इत्यादी. | – |

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| | दृश्यजन्य पोत यांचे निरीक्षण करावयास सांगावे. चुरगळलेल्या कागदाला रंग लावून ठसेकाम करण्यास सांगावे. तयार झालेले ठसेकाम कोठे कोठे वापरता येईल याबद्दल छोटी चर्चा घडवून आणावी. मुलांच्या आवडीने व कल्पकतेने चित्रनिर्मिती करण्यास सांगावी. | | |
| **घटक :** कोलाज काम | **उपघटक :** समअंगी चिकट चित्र | | |
| • परिचित प्रकारापेक्षा वेगळा प्रकार वापरतात.<br>• कोलाज पद्धतीचा वापर करून समअंगी चित्रण करतात.<br>• कौशल्य आणि सौंदर्य दृष्टिकोनात वाढ होते. | एक आयताकृती आकाराचा रंगीत कागद घ्या. तो कागद मध्यावर घडी घाला व घडी उघडा. या कागदाच्या अर्ध्या आकाराचा दुसऱ्या रंगाचा कागद घ्यावा. विविध सौंदर्यपूर्ण आकार चित्रात दाखवल्याप्रमाणे कापून घ्यावेत. कापलेला कागद उलट बाजूस चिकटवून घ्यावा. मुलांकडून टप्प्याटप्प्याने एकेक कृती करून घ्यावी. | • रंगीत कागद घ्या. कागदाला एक किंवा अनेक घड्या घाला. त्यावर कोणताही एक आकार काढून कापून घ्या. एकसारखे अनेक आकार मिळतील ते आकार एकसारखे कागदावर चिटकवून घेण्यास सांगावे. | • गणित : मुलांना समअंगी म्हणजेच एकसारखे दोन आकार हे समजणे. |

| **घटक :** सुलेखन | **उपघटक :** लेखनापूर्वीचा रेषा सराव | | |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • लेखनापूर्वीच्या जास्तीत जास्त सरावाने अक्षर सुंदर होण्यास मदत मिळते.<br>• सुंदर हस्ताक्षरामुळे आत्मविश्वास निर्माण होतो. | हस्ताक्षर हा व्यक्तीच्या मनाचा आरसा असतो. म्हणून हस्ताक्षर सुधारण्यासाठी, अक्षर वळणदार येण्यासाठी रेषा व आकारांचा नियमित सराव घेणे आवश्यक आहे. पुस्तकात दिलेले लेखनापूर्वीचे सराव घटकांचा मुलांकडून जास्तीत जास्त सराव करून घ्यावा. त्या घटकांची लय, वळण मुलांकडून काढून घ्यावीत. विविध माध्यमांमध्ये रेषांचा सराव करून घ्यावा. उदा. पेन, पेन्सिल, स्केच पेन, रंगीत पेन्सिल, रंगीत खडू पक्ष्यांची पिसे आणि शाई, बोरू, काडी आणि रंग धूळपाटी इत्यादी. बोट, हात, हाताचे स्नायू यांच्या पद्धतशीर लयबद्ध हालचाली होऊन सुलेखनास उपयुक्त ठरतात. | • यामध्ये रंगांऐवजी विविध प्रकारच्या रेषांचा वापर करून एक सुंदर संकल्प चित्र तयार करून घ्यावे. | • सर्व विषय : अक्षरलेखन अधिक सुंदर होण्यास मदत होणे.<br>• शारीरिक शिक्षण : हाताचे स्नायू, हाताची बोटे यांची मुक्तपणे हालचाल होणे. |
| **विषय :** शिल्प<br>**उपघटक :** कागदाचे मुखवटे तयार करणे. | **घटक :** कागदकाम | | |
| • हातांची, डोळ्यांची लयबद्ध हालचाल निरीक्षण, कल्पनाशक्ती वाढीस लागते.<br>• गुंडाळणे, चुरगळणे, फाडणे, घडी घालणे या क्रिया सहज करतात. | घडीकामाच्या साहाय्याने मुखवटे तयार करून घ्यावेत. आकृतीत दिल्याप्रमाणे कागदाची घडी घालून घ्यावी. अर्ध्या भागावर आकार काढून कापून घ्यावेत. | • प्राणी, पक्षी यांचे मुखवटे तयार करून घ्यावेत.<br>• धूळपाटीचा वापर करून रेषांचा सराव करून घ्यावा.<br>• काठीने/काडीने जमिनीवरील मातीमध्ये गिरगिटण्यातून रेषांचा सराव करून घेणे. | • गणित : कागदाची घडी घालणे. (दोन भाग) गोल व त्रिकोणी आकार. |

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • कागद मापन करता येते.<br>• नव–निर्मितीचा आनंद घेतात. | आणि काही आकार चिकटवून वेगवेगळे मुखवटे तयार करून घ्यावेत. मुखवटा कशाचा करायचा याचे स्वातंत्र्य मुलांना द्यावे. | | |
| **घटक :** मातीकाम | **उपघटक :** मातीपासून भांडी व खेळणी तयार करणे. | | |
| • मातीपासून भांडी व खेळणी तयार करतात.<br>• माती चाळतात, मळतात व मातीपासून विविध आकारांची निर्मिती करतात.<br>• निरीक्षणशक्ती व एकाग्रता यामध्ये वाढ होते. | परिसरातील उपलब्ध माती चाळून ती मळून घेण्यास सांगावे. मुलांच्या आवडीप्रमाणे मातीपासून विविध प्रकारची भांडी व खेळणी तयार करून घ्यावीत. मुले स्वतः वस्तू तयार करतील असे पहावे. सहजरित्या व प्रत्यक्ष केलेले काम कायमस्वरूपी लक्षात राहते. शिक्षकांनी मुलांनी केलेल्या वस्तूंचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन द्यावे. | • वस्तूंना गेरू, काव किंवा उपलब्ध रंगाने रंगवण्यास सांगावे.<br>• विद्यार्थ्यांना हडप्पा येथे सापडलेली खेळणी, भांडी, दागिने यांचे फोटो दाखवावे. पूर्वीची आणि आताची भांडी व खेळणी यांमधील फरक त्यांना समजावून सांगावा.<br>• जो किल्ला तयार करावयाचा आहे त्याची प्रतिकृती दाखवावी. मातीचा किल्ला शाळेत गटात तयार करून घ्यावा. गटात काम करून प्रत्येकाचा सांघिक कामाकडे ओढा वाढवावा. प्रत्येक गटांची कृती वेगळी कशी होईल यांकडे लक्ष द्यावे. | • परिसर अभ्यास भाग २ : माती व मातीचा किल्ला तयार करणे. तट, दरवाजा, भुयार, गुहा, पायऱ्या इत्यादी, पूर्वकालीन मातीची खेळणी, भांडी, दागिने इत्यादी.<br>• शारीरिक शिक्षण : सांघिक कामात सहभाग, गटकार्य, निरीक्षण, हात, मान व डोळे यांच्या लयबद्ध हालचाली.<br>• गणित : लांबी, रुंदी, उंची व आकारमान यांचा अंदाज करणे. विटा, वाळू, माती इत्यादी घटक किती प्रमाणात लागतील याचा अंदाज येणे. |

**घटक :** अन्य माध्यमांचे शिल्प **उपघटक :** टोपणापासून अन्य माध्यमांची शिल्पनिर्मिती.

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • टोपणापासून शिल्पकृती करतात.<br>• कल्पनाशक्तीचा विकास, नवनिर्मितीचा आनंद मिळतो.<br>• स्वावलंबन गुण वाढीस लागतो.<br>• आत्मविश्वास निर्माण होतो. | घरातील, परिसरातील उपलब्ध निरुपयोगी साहित्याचे निरीक्षण करून त्यापासून कोणते शिल्प करता येईल याची चर्चा करावी. प्रत्येकास बोलण्याची संधी द्यावी. जेणेकरून प्रत्येकाची स्वतंत्र अभिव्यक्ती दिसून येईल. एक कागद किंवा जाड पुठ्ठा घेऊन त्यावर बाटलीच्या टोपणापासून फुलांचा आकार आकृतीत दिल्याप्रमाणे रचना मांडून पहावी. योग्य कृती वाटल्यास ती टोपणे चिकटवावीत. कागदाच्या बारीक पट्टीचा देठ तसेच पानांचे आकार कापून चिकटवावेत. त्यांच्या कृतीचे कौतुक करावे. जेणेकरून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल. | • वरीलप्रमाणे मुलांच्या कल्पनेने व आवडीने अजून वेगळी कलाकृती तयार करून घ्यावी.<br>• विविध गोष्टींचा कल्पकतेने वापर करून ब्रश बनवून घ्यावे. उदाहरणार्थ : काठीला एका बाजूस लोकर, कापूस, वेगवेगळे दोरे, पिसे इत्यादी. | • गणित : जेवढी झाकणे तेवढी आकडेमोड करता येते. टोपणाचा गोल आकार.<br>• शारीरिक शिक्षण : बैठक, एकाग्रता वाढीस लागते.<br>• पर्यावरण : पुनर्वापर वृत्ती लहानपणापासून वाढीस लागते.<br>• भाषा : भाषिक विकास होतो.<br>• परिसर अभ्यास भाग १ : शोधकवृत्ती |

**विषय :** संगीत (गायन) **घटक :** गायन

**उपघटक :** बडबडगीत, बालगीते (मानवनिर्मित गोष्टींशी संबंधित कथा सांगणारी गीते)

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • स्वर, ताल व लयीचे ज्ञान होते.<br>• श्रवण क्षमता वाढते.<br>• उत्स्फूर्तता व कल्पकता वाढते. | गीताची संकल्पना समजण्यासाठी गीतातील गोष्टींशी संबंधित प्रश्न विचारावेत. गीतातील पात्रांची नक्कल करण्यास सांगावी. विशिष्ट सवयी, | • मानवनिर्मित गोष्टींचा तसेच विज्ञान तंत्रज्ञान नवनिर्मितीचा उल्लेख असणारी गीते साभिनय सादर करणे. | • मराठी : नवीन शब्दप्रयोग<br>• गणित : स्मरणशक्ती वाढते.<br>• परिसर अभ्यास भाग १ : सवयी, हालचाली, कृती |

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| | हालचाली कल्पकतेने सादर करून घ्याव्यात. स्वर–तालबद्ध व साभिनय गीत गायनाचा सराव घ्यावा. यासाठी स्वतःच्या कल्पकतेने उपक्रम योजावेत. मानवनिर्मित गोष्टींशी संबंधित कथा सांगणाऱ्या बालगीतांचा सराव घ्यावा. | • दैनंदिन जीवनाशी समानता असणारी बालगीते सादर करणे. | • आरोग्य व शारीरिक शिक्षण : हालचालींमधील विविधता. |
| **उपघटक :** समूहगीत, देशभक्तीपर गीत, निसर्ग गीत, वेगळ्या भाषेतील गीत | | | |
| • जाणीव जागृती वाढते.<br>• देशभक्ती निर्माण होते.<br>• लयबद्ध गीत गातात. | गीतांच्या अनुषंगाने प्रश्न विचारावेत. देशभक्तीची भावना जागृत होईल अशी माहिती द्यावी. पर्यावरण जागृती संदर्भात चर्चा करावी. गीताचा, कवितेचा भावार्थ सांगावा. गाण्यातील शब्दांची गेयता (गोडवा) स्पष्ट करावी. हाताने टाळी वाजवून गाण्याचा सराव घ्यावा. उत्स्फूर्तपणे गाण्यासाठी प्रवृत्त करावे. | • आवडीचे देशभक्तीपर गीत आणि निसर्ग गीतांचे सादरीकरण करणे. | • परिसर अभ्यास भाग १ : निसर्ग, पर्यावरण याविषयी माहिती मिळते.<br>• परिसर अभ्यास भाग २ : देशभक्तीची माहिती मिळते.<br>• भाषा : कवितेविषयी आवड निर्माण होते. |
| **उपघटक :** लोकगीत, धनगरगीत, कोळीगीत | | | |
| • संस्कृतीचे संवर्धन करतात.<br>• लोकगीतांची भाषा समजतात. उत्स्फूर्तता दाखवितात. | लोकगीतातील भाषेच्या सौंदर्याविषयी माहिती द्यावी. गीतातील व्यक्तिरेखे–विषयी चर्चा करावी. वेशभूषेविषयी व सांस्कृतिक परंपरेविषयी माहिती सांगावी. माहीत असणाऱ्या किंवा स्थानिक भाषेत रचलेल्या लोकगीतांचा तालासुरात सराव घ्यावा. मुलांना कृतीतून लोकगीतातील आनंद द्यावा. | • धनगरगीत, कोळीगीत यांसारखी इतर लोकगीते सादर करणे. | • परिसर अभ्यास भाग २ : सांस्कृतिक परंपरा व वारसा यांविषयी माहिती.<br>• मराठी : लोकगीतातील भाषेचे सौंदर्य समजते. त्यामुळे भाषेचा विकास होतो. |

**उपघटक :** स्वरालंकार

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • स्वर समूहाची मांडणी समजते.<br>• श्रवणक्षमता वाढते व कल्पकता येते. | शुद्‌ध व कोमल स्वरांची माहिती द्यावी. स्वर सप्तकाची ओळख करून द्यावी. व्याख्या व प्रकार सांगावे. कोमल स्वरांचे अलंकार हार्मोनियम बरोबर म्हणून घ्यावेत. यासाठी स्व–कल्पकतेने उपक्रम घ्यावेत.<br>१) आरोह : साग रेम गप मध पनि धसां<br>अवरोह : सांध निप धम पग मरे गसा<br>२) आरोह : सागरेसा रेमगरे गपमग मधपम पनिधप धसांनिध निरेंसांनी सांगरेंसां<br>अवरोह : सांगरेंसां निरेंसांनी धसांनिध पनिधप मधपम गपमग रेमगरे सागरेसा<br>३) आरोह : सारेगसारेगम रेगमरेगमप गमपगमपध मपधमपधनी पधनीपधनीसां<br>अवरोह : सांनिधसांनिधप निधपनिधपम धपमधपमग पमगपमगरे मगरेमगरेसा या स्वरालंकारांचा सराव शक्यतो हार्मोनियम बरोबर घ्यावा. | • स्वरालंकाराची नवीन रचना स्व–कल्पकतेने करून सादर करणे. | • गणित : स्मरणशक्ती वाढते. एक आड एक संख्या मोजतात.<br>• भाषा : जिभेच्या योग्य हालचालीमुळे बोलणे सुधारते. आवाजात चढउतार येतो. |

**विषय :** संगीत (वादन) **घटक :** वादन

**उपघटक :** वादन परिचय.

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • वाद्यांची ओळख होते.<br>• वाद्याची रचना समजून घेतात. | वाद्यांचा प्रत्यक्ष परिचय करून द्यावा. तबला व हार्मोनियमच्या रचनेबद्दल माहिती सांगावी. साथसंगत कशी करावी याबद्दल चर्चा करावी.<br>हार्मोनियमवर स्वरालंकार व तबल्यावर बोल वाजवण्यासंदर्भात मार्गदर्शन करावे.<br>वाद्य वाजवण्याची संधी द्यावी. | • हार्मोनियमवर स्वरालंकार वाजविणे.<br>• तबल्यावर दादरा ताल वाजवणे. | • शारीरिक शिक्षण : शिस्तबद्धता येते. |
| **उपघटक :** पार्श्वसंगीत | | | |
| • अंकाद्वारे तालाची रचना करतात.<br>• वाद्यांची साथ देतात. | तालाची संकल्पना सांगावी.<br>तालाविषयी अधिक माहिती द्यावी.<br>गीत, नृत्याला अनुसरून ताल रचना निर्माण करावी. दादरा तालाचा ठेका, टाळी, खंड या विषयी माहिती द्यावी.<br>तबला वाजवण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>तबल्यावर दादरा ताल वाजवण्याचा सराव घ्यावा. | • तबल्यावर ताल दादरा वाजवण्याचा सराव करणे. | • भाषा : शब्दसंग्रह वाढतो.<br>• गणित : १ ते १६ अंकांच्या विविध रचना करतात. |
| **विषय :** संगीत (नृत्य) **घटक :** नृत्य<br>**उपघटक :** हालचाली, हस्तमुद्रा : १) संयुक्त २) असंयुक्त | | | |
| • आशयानुसार हस्तमुद्रांचा वापर करतात.<br>• दैनंदिन व्यवहाराशी हस्तमुद्रांची | शास्त्रीय नृत्यातील हस्तमुद्रांच्या संस्कृत नावांचा अर्थ व परिचय करून द्यावा. गाण्यातील आशयानुरूप | • गाण्याच्या ठेक्यावर आशयाला अनुसरून उत्स्फूर्तपणे नृत्यमय हालचाली करून घ्याव्यात. | • परिसर अभ्यास भाग १ : विविध आकार व त्यांच्या रचना. |

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| सांगड घालतात.<br>• भावनांची अभिव्यक्ती होते. | हस्तमुद्रांचा वापर कसा करायचा किंवा दैनंदिन व्यवहाराशी हस्तमुद्रांची सांगड कशी घालायची याबद्दल चर्चा करावी. एखादे गीत किंवा कविता हस्तमुद्रांचा वापर करून म्हणून घ्यावे. भावना अभिव्यक्त करण्यासाठी हस्तमुद्रांचा वापर करण्यास प्रोत्साहित करावे. स्वत:च्या कल्पकतेने नृत्यरचना करण्यास प्रोत्साहन द्यावे. समन्वय साधण्यास मदत करावी. | | |
| **उपघटक :** नृत्य परिचय (धनगरी नृत्य) | | | |
| • आत्मविश्वास व कल्पकता वाढते.<br>• साहित्य व इतरांबरोबर समायोजन करतात.<br>• जोशपूर्ण हालचाली करतात. | नृत्य परंपरेतील लोकनृत्याचे महत्त्व सांगावे. स्थानिक लोकनृत्याची माहिती द्यावी. लोकनृत्य व शास्त्रीय नृत्यातील फरक सांगावा. नृत्यासाठी लागणारी वाद्ये, वेशभूषा, साहित्य यांची माहिती द्यावी व याविषयी चर्चा करावी. नृत्यामध्ये मनोरे, उड्यांचे वेगवेगळे प्रकार, विविध शारीरिक हालचालींचा समावेश करावा. योग्य सरावानंतर सादरीकरणाची संधी द्यावी. | • ध्वनिफितीवरील गीतावर लोकनृत्य सादर करणे.<br>• गजी–ढोल नृत्याची माहिती मिळवून सादर करणे. | • परिसर अभ्यास भाग १ : भौगोलिक परिस्थिती, स्थान, व्यवसाय इ.<br>• परिसर अभ्यास भाग २ : सामाजिक परंपरा, पोशाख इ.<br>• मराठी : लोकगीताच्या काव्यातील भाषेचा वापर, यमक यांची माहिती मिळते. |

| उपघटक : अभिनयगीत | | | |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • निसर्गाविषयी जनजागृती करतात.<br>• गोष्टीतून बोध व समूहशिस्त राखतात. | महाराष्ट्रातील संस्कृती, व्यक्तिरेखा, वेशभूषा इत्यादी विषयांवर चर्चा करावी. सामाजिक समतेचे महत्त्व समजावून सांगावे. प्राणी-पक्षी, पर्यावरण, निसर्ग, नीतिकथा इत्यादी घटकांवर आधारित गोष्टीरूप गीते अभिनयासह सादरीकरण करून घ्यावीत. पाठ्यपुस्तकातील कविता, रचलेली गाणी, स्थानिक परिसरातील लोकगीते अभिनयासह सादर करण्यास प्रवृत्त करावे. | • गोष्टीरूप गाणी अभिनयासह उत्स्फूर्तपणे सादर करणे. | • परिसर अभ्यास भाग १ : निसर्गनिर्मित व मानवनिर्मित गोष्टींचा परिचय. पर्यावरणातील समस्या व त्यावरील उपाय. |
| **विषय :** नाट्य<br>**उपघटक :** पायाभूत हालचाली | **घटक :** नाट्य | | |
| • संवादाशिवाय कृती करतात.<br>• कृतीतून स्वतंत्र विचार दर्शवतात. | कुटुंबातील व्यक्तींचे निरीक्षण करून त्यांच्या हालचालींचे अनुकरण करावे. संवादाशिवाय कृती करावी. याविषयी चर्चा करावी. परिसरातील प्रसंगांचे निरीक्षण करण्यास सांगावे. स्वतंत्रपणे विचार करून कृती करण्यास प्रोत्साहन द्यावे. संवादाशिवाय विविध कृती करून घ्याव्यात. | • उन्हाळा, हिवाळा, पावसाळा, आनंद, दुःख इत्यादी भावभावना संवादाशिवाय कृतींतून व्यक्त करणे.<br>• भावभावना संवादाशिवाय हावभाव व कृतीतून व्यक्त करतील. | • परिसर अभ्यास : कुटुंबाविषयी माहिती मिळते. परिसरातील प्रसंगांचे निरीक्षण करतात.<br>• शारीरिक शिक्षण : विविध कृती करतात.<br>• भाषा : स्वतंत्र विचार करतात. |

| **उपघटक :** वाचिक अभिनय/अनुभव कथन | | | |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • अनुभव कथन करतात.<br>• गोष्ट सांगतात.<br>• आशयानुरूप वाचन करतात. | पाठाचा, कवितेचा आशय लक्षात घेऊन वाचन करण्याबद्दल माहिती द्यावी. संवाद सादर करण्याविषयी चर्चा करावी. एखादी गोष्ट किंवा कविता वाचिक अभिनयातून सादर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. वाचनातील लयीचा सराव घ्यावा. | • पाठ्यपुस्तकातील कवितेचे आशयानुरूप वाचन करणे.<br>• एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचे आशयानुरूप वाचन करणे. | • भाषा : वाचन सुधारते, शब्दोच्चारातून भाव प्रकट होतात.<br>• शारीरिक शिक्षण : वाचनात शिस्त येते. |
| **उपघटक :** नेपथ्य व तांत्रिक अंगे | | | |
| • साहित्य संकलन करतात.<br>• वेशभूषा व रंगभूषा करतात. | नेपथ्याविषयी माहिती सांगावी. एखादी वस्तू किंवा वाहन करण्यासाठी मुलांची रचना करून घ्यावी. विविध व्यावसायिकांचे राहणीमान व पोशाखांचे निरीक्षण करण्यास सांगून त्याबद्दल चर्चा करावी. रंगभूषा व वेशभूषा यांबाबत माहिती द्यावी. नाट्य प्रसंगानुसार साहित्याचा वापर करून घ्यावा. | • बाग, बाजार, मंदिर, जंगल इत्यादी दृश्ये उभी करणे. | • परिसर अभ्यास : विविध व्यवसायांची माहिती होते. व्यवसायानुसार पोशाख समजतात.<br>• गणित : अंतर, भौमितिक आकारांचा वापर करतात.<br>• चित्रकला : रंगांची माहिती होते. |

■■■

## मूल्यमापन निर्देश

- निरीक्षण, तोंडीकाम, प्रात्यक्षिक, कृती, उपक्रम इत्यादी.

**संदर्भ सूची :**

- खेळू, करू, शिकू (इ. पहिली ते तिसरी)
- कला शिक्षण शिक्षक-पालक हस्तपुस्तिका (इ. पहिली ते आठवी)
- कलानिर्मिती व इतिहास (इ. आठवी)
- कला समेकित (Integrated) अधिगम (एनसीईआरटी)
- चित्रकला व रंगकाम कार्यशिक्षण हस्तपुस्तिका (इ. नववी)
- चित्रकला व रंगकाम कार्यशिक्षण हस्तपुस्तिका (इ. दहावी)
- स्व-विकास व कलारसास्वाद (इ. नववी व दहावी)
- Alternative Academic Calendar for Students April-2020 (NCERT)

**महत्त्वाच्या सूचना :**

- मुलांच्या चित्रात चुका काढू नये. ती त्यांची स्वत:ची चित्रनिर्मिती असते. त्यातील भावना समजून घ्याव्यात. अधिक आवश्यकता वाटल्यास आवश्यक तेथे माहिती सांगावी.
- कोणतेही चित्र हे कमी दर्जाचे अथवा चुकीचे नसते. प्रत्येक कलाकृती ही उत्तमच असते हे मुलांमध्ये आपल्या कृतींतून व विचारांतून समजायला हवे.
- मुलांच्या कलाकृतींचे योग्य ते कौतुक व्हावे याकरिता **ओपन आर्ट गॅलरी व मुक्त भिंत** हा उपक्रम आपल्या वर्गाबाहेरील रिकाम्या जागेत राबवावा. जेथे मुले उत्स्फूर्तपणे कलानिर्मिती करू शकतील.
- मुलांसाठी त्यांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनासाठी स्वतंत्र असा प्रदर्शन फलक (भित्तीफलक) असावा. जेथे मुलांच्या कलाकृतींचे नियमित प्रदर्शन होईल.
- मुलांना कलाकृती निर्माण करताना माध्यमांचे अथवा इतर कोणतेही बंधन घालू नये. त्यांच्या आवडीनुसार मुक्तपणे निर्मिती करण्यास त्यांना प्रोत्साहन द्यावे.
- कला ही मुलांमधील गुण विकसित करण्याचे प्रभावी माध्यम आहे. त्यांना कलाकृती ही स्वयंप्रेरणेने व स्व-कल्पकतेने करू द्यावी. अति मार्गदर्शन, सूचना व बंधनामुळे कलाकृतींमधील व निर्मिती प्रक्रियेतील नैसर्गिकता व सहजता निघून जाण्याचा संभव असतो.
- काही वेळा कलाकृती निर्माण करताना आपणांस विविध टोकदार, धारदार साहित्याचा वापर करावा लागतो. अशा वेळी शिक्षकांनी आवश्यक ती काळजी घेण्यासंबंधीच्या सर्व सूचना मुलांना द्याव्यात.

- टोकदार, धारदार वस्तू वापरत असताना कामाव्यतिरिक्त त्या हातात घेऊ/देऊ नये अथवा उगीच इतरत्र फिरवू नये. या वस्तूंशी खेळू नये. अशा सूचना मुलांना द्याव्यात.
- चित्रणाच्या बाबतीत बघून काढणे येथे अपेक्षित नाही, तरी चित्रण करताना स्व–कल्पना, स्वयंप्रेरणा, स्व–निर्मितीस वाव द्यावा.
- एखादी चांगली कृती केल्यावर मुलांचे कौतुक झाले नाही, तर कृती चांगली असूनही कदाचित शेवटची असू शकते. याउलट भरभरून कौतुक झाले तर त्यांच्या मनी ती पुन:पुन्हा करण्याची उर्मी तयार होईल, चांगल्या गोष्टींची जाणीव होईल. एखादी चूक झाली, तर आपण लगेचच आक्रमक होता. चांगले काम केले तर मुलांचे कौतुक करतोच असे नाही. सतत चांगल्या गोष्टींच्या कौतुकातून सकारात्मक विचारांची बीजे पेरली जातात. कौतुक करणे म्हणजे जीवन संजीवनीच असते.

■■■

# पूरक साहित्य विकसन निर्मिती गट : यादी

**मराठी : अभ्यासगट सदस्य**

- डॉ. जगराम भटकर, प्र. प्राचार्य, भाषा विभाग प्रमुख, — सदस्य सचिव
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- सविता वायाळ, विशेषाधिकारी, मराठी विभाग, — सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.
- अजित राक्षे — अभ्यासगट समन्वयक
- संदीप वाक्‌चौरे — सदस्य
- सचिन लोखंडे — सदस्य
- डॉ. नंदा भोर — सदस्य
- अभय गावडे — सदस्य
- चैताली भोसले — सदस्य

**इंग्रजी : अभ्यासगट सदस्य**

- डॉ. उज्ज्वल करवंदे, वरिष्ठ अधिव्याख्याता, — सदस्य सचिव
  प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद.
- संतोष पवार, विशेषाधिकारी, इंग्रजी विभाग, — सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- संजीवनी नंदमित्र पवार — अभ्यासगट समन्वयक
- डॉ. श्रुती प्रकाश चौधरी — सदस्य
- राहुल काशिनाथ सुरवसे — सदस्य
- मानसी मिलिंद भोसले — सदस्य
- हर्षा विजय चव्हाण — सदस्य
- मंजुषा सिद्‌धार्थ नंदेश्वर — सदस्य
- प्रदीप मनोहर पाटील — सदस्य
- ऊर्मिला साहेबराव शेळके — सदस्य
- गजानन बबन बोढे — सदस्य

**गणित : अभ्यासगट सदस्य**

- वृषाली गायकवाड, अधिव्याख्याता, गणित विभाग, — सदस्य सचिव
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

- उज्ज्वला गोडबोले, विशेषाधिकारी, गणित विभाग, सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- आण्णापा रावसाहेब परीट अभ्यासगट समन्वयक
- रवींद्र महादेव येवले सदस्य
- रामा विठोबा व्हन्याळकर सदस्य
- संदीप पंचभाई सदस्य
- सुवर्णा विश्वास देशपांडे सदस्य
- सागर कृष्णराव काळे सदस्य
- विशाल प्रकाश शेटे सदस्य
- मायावती महादेव पाटील सदस्य
- सज्जन श्रीधर मागाडे सदस्य

**परिसर अभ्यास – भाग १ : अभ्यासगट सदस्य**

- तेजस्विनी सदानंद आळवेकर, उपविभागप्रमुख विज्ञान विभाग सदस्य सचिव
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- राजीव पाटोळे, विशेषाधिकारी (विज्ञान) सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- रविकिरण जाधव, विशेषाधिकारी (भूगोल) सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- श्रीमती वर्षा सरोदे, प्र. विशेषाधिकारी (इतिहास) सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- प्रशांत पंडितराव कोळसे अभ्यासगट समन्वयक
- डॉ. इरफान अजिज इनामदार (भूगोल) सदस्य
- डॉ. प्राची राहुल चौधरी (विज्ञान) सदस्य
- गजानन नागोरावजी मानकर (विज्ञान) सदस्य
- दयाशंकर विष्णू वैद्य (ना. शास्त्र) सदस्य
- सचिन परशुराम आहेर (भूगोल) सदस्य
- गौरीशंकर दत्तात्रय खोबरे (भूगोल) सदस्य
- भाऊसाहेब शिवाजीराव उमाटे (ना. शास्त्र) सदस्य
- सुनिता महादेव पाटील (विज्ञान) सदस्य
- सुधीर यादवराव कांबळे (विज्ञान) सदस्य
- श्रावणी सदाशिव सावंत सदस्य
- सुधीर आप्पया आमनगी सदस्य

**परिसर अभ्यास – भाग २ : अभ्यासगट सदस्य**

- डॉ. दत्तात्रय बाळकृष्ण थिटे, उपविभागप्रमुख (सामाजिक शास्त्र) — सदस्य सचिव
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- वर्षा सरोदे, विशेषाधिकारी (इतिहास) — सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- डॉ. शुभांगना अत्रे — सदस्य
- डॉ. शिवानी लिमये — अभ्यासगट समन्वयक
- रामदास दशरथ ठाकर — सदस्य
- डॉ. नागनाथ अप्पासाहेब येवले — सदस्य
- वैजनाथ भीमराव काळे — सदस्य
- सुनिता दळवी — सदस्य
- सदानंद काशिनाथ डोंगरे — सदस्य
- डॉ. सचिन गुंडीराम डेंगळे — सदस्य

**खेळू, करू, शिकू : अभ्यासगट सदस्य**

- डॉ. शोभा खंदारे, उपसंचालक, — सदस्य सचिव
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- डॉ. अजयकुमार लोळगे, विशेषाधिकारी, कार्यानुभव विभाग, — सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- विद्याधर सदानंद म्हात्रे — अभ्यासगट समन्वयक
- मुकुल माधवराव देशपांडे (गटप्रमुख : खेळू) — सदस्य
- प्रकाश कारभारी पारखे (गटप्रमुख : करू) — सदस्य
- सुनिल हिंदुराव देसाई (गटप्रमुख : शिकू) — सदस्य
- निलेश बाळाभाऊ झाडे — सदस्य
- शंकर जनार्दन शहाणे — सदस्य
- नागसेन नरहरी भालेराव — सदस्य
- डॉ. अश्विन सुधाकरराव किनारकर — सदस्य
- रश्मी मिलिंद राजपूरकर — सदस्य
- अमोल अंबादास बोधे — सदस्य
- निताली संभाजी हरगुडे — सदस्य
- प्रकाश भाऊसाहेब नेटके — सदस्य
- प्रवीण शांताराम माळी — सदस्य
- प्राजक्ता प्रकाश ढवळे — सदस्य
- प्रणिता कुमावत — सदस्य